म. ग्रं. मं. ठाणें
विषय नाटक
सं. नं. ५५४
२५-१९८८

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
संग्रहालय क्रमांक
लेखक देसाई ग. वि.
सन
पुस्तकाचें नांव पाडि पु प्रहसन

५१

नाटक

नं.
ता.
[illegible]

मराठी ग्रंथ संग्रहालय.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

# षड्रिपु प्रहसन.

AN INTERESTNG
AND COMICAL FARCE OF THE SIX FOES,
IN MARATHI.

PRO BONO BUBLICO

# SHÁDRIPOO PRÁHASON

## A COMICAL AND INTERESTING FARCE

## OF THE SIX FOES,

## IN MARATHI.

BY

**GANPUTRAO VISHRAM DESAI,**

SIGNALLER PARELL STATION, B. B. & C. I. Ry.

---

*(Registered under Act XXV of* 1867.*)*

---

**All Rights Reserved.**

---

BOMBAY:

PRINTED AT THE INDIAN PRINTING PRESS.

1885

*Price* 1 *Rupee.*

PRO BONO PUBLICO.

# षड्रिपु प्रहसन.

हें पुस्तक,

सर्व लोकांच्या हिताकरितां

गणपतराव विश्राम देसाई,

सिग्नलर, परळ स्टेशन,

बी. बी. आणि सी. आय. रेलवे,

यांनीं रचून,

मुंबईंत

"इंडियन प्रिंटिंग" छापखान्यांत छापिलें.

(हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून सर्व हक्क मालकानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.)

सन १८८५ इसवी.

किंमत १ रुपया.

# प्रारंभ.

## मंगलाचरण.

( शिखरिणीवृत्त )

नमः श्रीचिद्ब्रह्मा, शिव शिव शिवा ॐ स्वविभुतें ॥
नमो अंकोल्हास,—प्रभु गणवरा सिद्ध लभतें ॥
नमो वाग्देवीतें, मधुवच कुचाग्रा—नवरितें ॥
नमो धामेंद्रेतें, कुलरमणितें चित्त वरितें ॥ १ ॥

जो केवळ शुद्धज्ञानरूपी आत्मा, जो कल्याणशिवेचा शिव, ॐकाररूपी धन, त्या विभूला नमितों; ज्याच्या अंकाचा उल्हासकर्ता गणपति, सकल कार्यसिद्धि करणारा, त्याला नमस्कार करितों; वचोरूपी मधूनें युक्त जीचीं कुचाग्रें अशा नवरी ह्मणजे नूतन सरस्वतीला वंदितों; आणि शेवटीं माझी धामापुरवासिनी कुलस्वामिणी भगवती हिलाही मी नमस्कार करितों.

---

## मातृस्मरण.

( पृथ्वीछंद )

प्रसन्न उदरीं जिया सुतनु हे गणेंद्रार्पणीं ॥
प्रसन्न सुविदैश्वरें नच जिया श्रमा मापणीं ॥
प्रपंच पथ शिक्षितां धजालि मृत्युच्या मापणीं ॥
प्रभा मजहि ते करो रविपणीं कृतीं मापणीं ॥ १ ॥

जिच्या उदरांत गणपति या नामें ही श्रेष्ठ मानवी तनु उत्पन्न झाली; विद्यारूप महा ऐश्वर्याच्या योगें [मी] संपन्न होण्याला जिचे श्रम अगणित; प्रपंच मार्गाचें शिक्षण देत असतां जी मृत्यूच्या महा मापाला धजली; आणि जी मायापणानें माझी जननी; ती रविरूप होत्साती माझ्या कृत्यास प्रकाशो.

# प्रस्तावना.

---oo---

हिंदुस्थानांत दयाळू इंग्रज सरकारचें राज्य झाल्यापासून दिवसेंदिवस आपल्या राजनिष्ठ प्रजेस विद्यामृत पाजण्याचा त्यांनीं बराच उद्योग चालविला. तेणेंकरून फक्त रयतेसच फायदा झाला असें नाहीं, तर रयतेस राजाकडे कोणत्या रीतीनें वागावें हें समजूं लागल्या कारणानें त्यांच्या राज्यासही बळकटी येऊं लागली. विद्याखात्यांत त्यांनीं मन घातल्यामुळें बरेच लोक विद्वान होऊन लोकांस उपयोगी पडणारीं व उपदेशपर अशीं कादंबऱ्या, नाटकें, प्रहसनें, वगैरे रचून प्रसिद्ध करूं लागले. त्याप्रमाणेंच मी एक " षड्रिपु प्रहसन " या नांवाचें पुस्तक माझ्या फुरसतीचेवेळीं लिहून लोकांचे उपयोगाकरितां छापून प्रसिद्ध केलें आहे. आतां " प्रहसन " यापासून लोकांस उपयोग आहे किंवा कांहीं तरी लिहून लोकांचें मनरंजन व्हावें एतदर्थ हा एक नवीन बूट काढिला असावा, याविषयीं लोकांचे निरानिराळे ग्रह आहेत. जरी " प्रहसन " हें प्रथमारंभीं सभ्य लोकांस उपहासकारक भासतें तरी खरोखर त्यापासून मोठाच फायदा आहे, यांत संश नाहीं. ज्याप्रमाणें नाटक पाहिल्यापासून कोणत्याही गोष्टीचें स्वरूप घटकाभर डोळ्यांसमोर दृष्टीस पडतें, तद्वतच " प्रहसन " वाचल्यानें वाचणारास त्याच्या कोणत्या तरी स्वभावाचें त्यांत निरूपण आढळून त्यास त्याच्या स्वभावाबद्दल हसूं येऊं लागतें, व त्याविषयीं त्यास खेद-ही होतो. कारण त्यांतील गोष्ट त्याच्या पथ्यावर पडते व ह्मणूनच तशा वर्णनास " प्रहसन " हें नांव शोभतें.

सदर्हू प्रहसनामध्यें लहानापासून तों थोरापर्यंत यांतील विषय चांगला समजून त्यांचे मनावर ठसा उमटावा ह्मणून भाषेंत सोप्या शब्दांची योजना केली आहे व वाचतांना वाचकांस कंटाळा न यावा ह्मणून प्रत्येक विषयाच्या भागापुढें त्याच्याच अनुसंधानानें मनास आल्हाद देणारा एक निराळाच भाग लिहिला आहे. हल्लीं विशेष चालू भाषा मराठी, गुजराथी व हिंदुस्थानी असल्यामुळें त्या भाषांचाही थोडासा समावेश यांत केला आहे.

एकंदरींत हें पुस्तक जितकें मनोरंजक, उपदेशपर व स्वल्प होईल तितकें करण्याचा मी यत्न केला आहे. या पुस्तकांतील मुख्य उत्पादक नीरेश्वर हा योजिला असून याचा अर्थ साधारणपणें पाणी असा घेऊन, त्यांत जसा एकादा रंग मिसळला असतां त्याप्रमाणें त्याचा रंग होतो, तद्वत् या नीरेश्वरास अनुक्रमें मदन ( काम ), कोपेश्वर ( क्रोध ), लोभेश्वर ) ( लोभ), मोहक ( मोह ), मादक ( मद ), व द्वेषक ( मत्सर ), या व्यावहारिक षड्रिपूंनीं त्याशीं मैत्री दाखवून त्याची कशी दुर्दशा उडविली हें दर्शविलें आहे. व शेवटीं यांपासून दूर राहाण्यास संसारांत कसें वागलें पाहिजे, व त्यास कोणाची मदत कोणत्या रीतीनें मागितली पाहिजे हें स्पष्ट करून दाखविलें आहे. या गोष्टींच्या अनुसंधानानें येणाऱ्या कथाभागांत भटांचा दक्षणेविषयीं हावरेपणा, बालविवाहापासून नुकसान, पुनर्विवाहाची आवश्यकता, बायकांची दुसऱ्याच्या घरची पंचाईत करण्याची संवई, विरही स्त्रीचें प्रेम, बुवांची सोदेगिरी, किमयेवाल्यांची लुच्चेगिरी, भगतांची ठकबाजी व देवभोळेपणा, दोन स्त्रिया केल्यापासून नुकसान,

दारू पिण्यापासून नुकसान, पातिव्रत्य, इत्यादि विषयांवर निरूपण केलें आहे.

शेवटीं माझी सुज्ञ लोकांस एवढीच प्रार्थना आहे कीं त्यांनीं यांतील सूक्ष्म दोष काढीत न बसतां सारांशावर नजर फेंकावी. म्हणजे मी त्यांचा फार आभारी होईन.

## सुज्ञांस विनंती.

( चामरवृत्त )

सुज्ञ–सज्ज–पंडितादि यांसि हस्त जोडिले ।
सुप्रसन्न ग्रंथदृष्टि हेंच भाग्य जोडिलें ॥
सूक्ष्म दोष वर्जुनी वरोत सार मोडिलें ॥
सुज्ञ हंस आदरी पयासि वारि मोडिलें ॥

ग. वि. देसाई,
पुस्तककर्ते.

# षड्रिपु प्रहसन.

## भाग पहिला.

( शंकर शास्त्री व नारायण शास्त्री यांचा संवाद. )

शंकर शास्त्रीः—नमो नमः, नमो नमः. नारायण शास्त्री, यावें. आपली स्वारी आज लाल होऊन कोणीकडे झुकली? आज कोठें तरी कमर ताजी करून आलां खरे.

नारायण शास्त्री—वाः! कमाल केली बुवा तुह्मी! अहो, कोणी एखादा बाहेरील गृहस्थ जर ऐकेल तर आपणास काय बरें ह्मणेल! "लाल होऊन झुकणें" असे शब्द आपणांसारख्या ब्रह्मनिष्ठ शास्त्र्यांस उच्चारण्यास देखील कठीण, मग तुह्मी तर बोललेत, हें मोठें नवल होय.

शं० शा०—तुमच्या पांडित्याची बाबा शर्थ आहे! आज होळीच्या सणांत तुमचे सर्व कपडे रंगानें लाल झालेले पाहून मी असें ह्मटलें. एकंदरींत अर्थाचा अनर्थ करणें हा तुमचा आपला नियमच ना!

ना० शा०—असें काय? मला आज समजलें, कीं कोणत्याही गृहस्थाचे कपडे रंगानें लाल झाले, कीं त्याची स्वारी लाल होत असते. असो. आज आपणाकडे सणानिमित्य काय थाट उडवला बरें?

शं० शा०—बुवा तुह्मी लहान सहान थट्टेच्या गोष्टींचें पण स्पष्टीकरण करीत बसूं लागलां तर मग आह्मांस तुमचेपाशीं फारच जपून बोललें पाहिजे. कोठें आहे तो पां-

डू? रे पांडू, तुला तबक आणावयाचें समजत नाहीं काय? शास्त्रिबुवा केव्हांचे आले आहेत ते!

( पांडू तबक आणतो व नारायण शास्त्री व शंकर शास्त्री पानतंबाखू खातात.)

ना० शा०—हा तंबाखू पुण्याचा जर्दा आहे वाटतें. फार उत्तम आहे. शंकर शास्त्री, आपण पण खूप दिसतां! कारण मी तुह्मांस आज काय पक्वान्नें केलीं ह्मणून विचारलें, तें एकीकडे ठेवून माझी पानतंबाखूवरच समजूत केलीत अँ!!

शं०शा०—बाबा, माझ्यानें तुमच्याबरोबर बोलवत नाहीं. अहो, तुह्मीं व आह्मी कां दोन आहोंत, किंवा पाहुणे आहोंत! एकच. मग मी कां बरें त्याविषयीं चुकवाचुकव करीन? तुह्मी बासुंदी पुऱ्या चापण्याचें सोडून आह्मांकडील पांढरे पोळ्यांच्या पाहुणचारास येणार काय? लोकांस मात्र उगीच दूषण द्यावें. ओहोहो! पण नारायणबुवा, तें सर्व असो. बरी आठवण झाली. तुह्मी बाहेरून आलांत. काय नवी जुनी गप्प ऐकिली असेल तर सांगा पाहूं! तुमची थट्टा तर नेहमींचीच आहे.

ना०शा०—होय, ऐकली खरी. कालच्या तारेच्या ताज्या बातमीवरून असें समजण्यांत येतें कीं चिनी लोकांची व फ्रेंच लोकांची मोठी लढाई होणार आहे.

शं०शा०—अहो! आपणांस अशा बातम्या काय करावयाच्या? भटांस लढाया ह्या काय रडावयाच्या आहेत? आपल्या शहरांतील कांहीं गप्प सांगा.

ना०शा०—शहरांतील होय? वाः काय विचारावें! आज तर शहरांत जिकडे तिकडे रंगानें व गुलालानें आपला प-

गडा बसवून काळ्या मनुष्यास देखील लाल करून सोडलें आहे. व आनंदानें दोन्ही हात तोंडावर मारून शंखध्वनि ऊर्फ बोंबा मारताहेत.

शं०शा०—अहो बुवा, ह्या गप्पा तर सर्वांसच ठाऊक आहेत, परंतु त्या गीरेश्वर सावकाराविषयीं कांहीं माहिती असेल तर सांगा.

ना० शा०—शास्त्रिबुवा, खूपच. असें जर पहिल्यानेंच विचारतां तर मग एवढा वेळ आमचा फुकट गेला नसता. असो. ऐका तर मग. गीरेश्वर सावकार हे आमच्या यजमानांपैकीं पहिल्या नंबरचे यजमान असून परमेश्वराचे कृपेनें त्यांजवळ धनही बरेंच आहे. आजकाल ह्या एवढ्या शहरांत त्यासारखा सावकार कोणीच नसेल. त्याशिवाय आपल्या सरकारांतही त्याचें बरेंच वजन आहे. बहुत दिवसांनीं व अनेक धर्मकृत्यांनीं त्यास एक पुत्र झाला आहे. त्याचें नांव नीरेश्वर. ह्याचें वय आज सुमारें १४ वर्षांचें असून ऐन उमेदींत आला आहे. त्यास दोन तीन भाषांचें ज्ञान असून थोडी आंग कसरतही माहीत आहे. सतार वाद्य तर अगदीं गंधर्वाप्रमाणें वाजवितो. असा एकंदरींत हा मुलगा बहुगुणी निघाला आहे. परंतु अलीकडे जें कांहीं त्यास वेड लागलें आहे तें सांगतांच येत नाहीं? कोणीही गृहस्थ त्याजवळ गेला तर त्यास तो 'आपणास एक मित्र करावयाचा आहे, तर मित्रत्वास योग्य असा कोणी तरी आपणास मिळवून द्या' ह्मणून सांगत असतो. असें हें भलतेंच वेड आजपर्यंत आपण बुवा कधींच ऐकलें नव्हतें.

शं० शा०—मग नारायणबुवा, आपला सद्या नाहीं का

त्याच्या मैत्रीस योग्य? तो तर असा हुशार आहे कीं रोज निदान ४ आण्यांच्या खालीं दक्षणा आणीतच नाहीं!

ना० शा०—वाहवा! शास्त्रिबुवा, त्या सावकारपुत्रास कांहीं दक्षणा मिळविण्याकरितां किंवा लाडू खाण्याकरितां मित्र नको. तर ह्या व्यवहारांत नेहमीं त्यास उपयोगी पडणारा, मदत करणारा, व जीवास जीव देणारा, असा मित्र पाहिजे. माझे ऐकण्यांत असेंही आलें आहे कीं दूरदेशचा कोणी मदन या नांवाचा एक राजपुत्र आहे त्याजबरोबर याची मैत्री फारच जमत चालली आहे व त्यालाच तो आपला मित्र करणार. तुमच्या "सद्या" सारखे खादाड भट्ट मित्र असले, मग भिकेस काय तोटा!!

शं० शा०—खरेंच बुवा, "मोठ्यास मोठे आणि खोट्यास खोटे." आमच्या गरिबाबरोबर मैत्री करून काय उपयोग? उगीच त्याच्या पैशास मात्र काळ. एकंदरींत यांत कांहीं आमचें वळत नाहीं. नारायणबुवा, आज संध्याकाळीं रंगोपंतांचे घरीं कीर्तन आहे, आपण दक्षणेस याल का?

ना० शा०—अहो, हें काय विचारतां? पण दक्षणा काय मिळणार तें तरी ऐकूंद्या कारण नुकतेंच चार आण्यांचे दक्षणेचें आमंत्रण मला आलें आहे.

शं० शा०—अहो, रंगोपंतांचे घरीं सहा आणे मिळणार आहेत.

ना० शा०—होय का! तर मग मी रंगोपंतांचे घरीं येईन. सवड साधल्यास चार आण्याची दक्षणा मिळवून सहा आण्यासही साधेन. शंकर शास्त्री, मला विसरूं नका हो. नमस्कार, येतों आतां. एकीकडे भोजनाचें आमंत्रण आहे, उशीर झाला.

# भाग दुसरा.

## शिखरिणी.

न हे काया कामा,-प्रति भुवनिका मात्र सजली ॥
न वा रम्या रामा, निरखुनि सुरामा उपजली ॥
शिवेंद्राब्जस्थाना, ऽसुरपति पथा न उमजती ॥
अकीर्तीच्या कामा अझुनि मति कां मा उमजती ॥

अर्थ-हे भुवनिका, हे जीवा, ही तुला प्राप्त झालेली काया, कामाचे तुष्टीकरितां नव्हे; किंवा मनोरम विश्रांतीचे उपभोगार्थ सुंदर स्त्रीचें निरखण करण्याकरितांही नव्हे. कां ह्मणशील तर, शिव, इंद्र, ब्रह्मदेव, रावण यांच्यासारखे महान मार्गभ्रष्ट झाले; हें जाणत असतांही, बाबा, दुष्कीर्तीला कारणभूत अशी मायामति तूं अझून कां सोडीत नाहींस ?

प्रिय वाचक हो, येथपर्यंत ह्या पुस्तकाची प्रस्तावना झाली. आतां ह्या भागापासून मुख्य विषयास आरंभ, हें सहजच पुढील गोष्टीवरून तुमच्या लक्षांत येईल.

हिंदुस्थानाचे उत्तरेस नेपाळ देशापासून सुमारें ६० कोसांवर मानस या नांवाचें मोठ्या भरभराटीस आलेलें व भरवस्तीचें असें एक शहर होतें. तेथील राजा आपल्या प्रजेचें पुत्रवत् पालन करीत असे. त्याच्या राज्यांत श्रीमंतापासून तों गरीबापर्यंत एकसारखी दाद लागे, ह्मणून त्याच्या राज्यास रामराज्य असें ह्मणण्याचा परिपाठ असे. ह्मणजे त्या राज्यांत गाय व वाघ एके ठिकाणीं पाणी पीत. तेथें गोरगरिबांस जुलमी मारवाड्यासारख्या सावकारांपासून त्रासमुक्त होण्याकरितां एक राजपेढी स्थापली होती व त्या-

त्यांचा मधुर सुवास मधून मधून येत होता. अशा वेळेस नीरेश्वरास जरा हुशारी वाटून तो इकडे तिकडे पाय मोकळे होण्याकरितां बागेंत फिरूं लागला. फिरतां फिरतां त्याची नजर त्या बागेची रखवाली करण्याकरितां जो माळी ठेविला होता त्याचे झोंपड्यावर गेली. तेव्हां तो तेथून तसाच जवळ बोलण्यास कोणी मनुष्य नाहीं ह्मणून हळू हळू त्या झोंपड्याजवळ जाऊन पोंहचला तों बाहेरूनच त्यास आंत मोठा गोंगाट चाललेला ऐकूं आला. अशा वेळीं आपण आंत न जातां दुरूनच कशाच्या तरी आड राहून गुप्तरूपें तो गोंगाट ऐकावा ह्मणून झोंपडीच्या पाठीमागें एक झाड होतें त्याच्या आड झोंपडीस कानोसा देऊन ऐकत राहिला, व खालीं लिहिल्याप्रमाणें त्या माळ्याचें व त्याच्या बायकोचें भाषण त्यानें ऐकिलें.

*माळी*—एकंदरींत तुझ्यासारख्या बायकांस मित्र ह्मणजे काय व ज्यास आपण मित्र ह्मटलें त्यासाठीं आपण काय केलें पाहिजे हें बिलकुल समजत नाहीं. पहा बरें, अशा वेळीं जर मी त्यास मदत करणार नाहीं तर उद्यां मला त्यास तोंड तरी दाखवितां येईल काय ?

*माळीण*— ( त्याची बायको ) हो, हो, ठाऊक आहे. मित्र झाले ह्मणून काय झालें ? आपण काय ह्मणून त्यांचे पंचाइतींत पडा! तुह्मांस मी खरेंच सांगत्यें. मजजवळ कांहीं पैसे नाहींत, व मी कांहीं माझ्या गळ्यांतली वज्रटीका द्यावयाची नाहीं.

*माळी*—अगे, असें काय, तुला मघांपासून सामोपचारानें सांगून पाहिलें; आणि अजून तूं हट्ट धरिशील तर तुला चवदावें रत्न दाखविणें भाग पडेल, हें तूं खूब समज.

वर गीरेश्वर या नांवाचा एक सदय मनाचा सावकार मुनीम नेमला होता. त्याचें काम गरीबगुरिबांस अडचणींचे वेळीं थोड्या व्याजानें किंवा विनव्याजीं पैसे देण्याचें होतें. शिवाय त्याचा हिरे मोत्यांचा व्यापारही होता. हा सावकार स्वभावानें सुशील असून दयाळू होता. यास पुष्कळ दिवसांनीं एक पुत्ररत्न झालें, त्याचें नांव नीरेश्वर. त्यास लहानपणींच विद्याभ्यास शिकवून, थोडीशी अंगकसरत व वाद्यकलाही शिकविली होती. नीरेश्वर हा सुमारें १४ वर्षांचा होईपर्यंत विद्या शिकण्यावांचून त्याच्या मनांत दुसरे कोणतेच विचार येत नसत. त्यानें विद्याभ्यासाकरितां बापास सांगून आपल्या घरापासून एक मैलाचे अंतरावर एक गर्द झाडी लागली होती तींत एक सुंदर बंगला बांधून त्याच्या सभोंवतीं रमणीय बाग करविला होता; त्यांत तो नित्य जाऊन एकाग्रतेनें वाचीत बसे. एके दिवशीं तो आपल्या नवीन बागेंतल्या बंगल्यांत खिडकीजवळ खुर्चीवर बसून वाचीत असतां मित्राविषयीं कांहीं विषय त्यास आढळला. तो फारच मनोरंजक असल्यानें सकाळपासून तों संध्याकाळपर्यंत त्यास तें पुस्तक ठेवावेंसें वाटे ना! शेवटीं फार वाचण्यानें श्रमून विसावा घेण्याकरितां पुस्तक बंद केलें व खिडकीवाटे आजुबाजूस मौज पाहूं लागला. या वेळेस नुकताच सायंकाळ होऊन सूर्याचीं प्रखर किरणें नाहींशीं होत होतीं. आकाशांत एका बाजूस नारिंगी, हिरवे, तांबडे, असे तरतऱ्हेचे रंग दिसत होते. झाडी दाट असल्यानें चिमण्यांनीं झाडांवर चिंव चिंव अशा शब्दांचा एकच गोंगाट उडवून दिला होता. बागेंतील गुलाब, मोगरा, पारिजातक इत्यादि फुलें फुलून

माळीण—असा कोणता प्रसंग त्या बिचाऱ्यावर आला आहे कोणास ठाऊक. आणि त्याला पैशाचीच गरज असली तर तो आपल्या शेटपासून उसने कां आणीत नाहीं? सरकारानें त्याला या कामाकरितांच मुद्दाम ठेवलें आहे.

माळी—अगे, खरोखरच त्यावर प्रसंग आला आहे. तो कांहीं कारणावरून फौजदारी खटल्यांत आला आहे, व जरकरितां त्यास दहा रुपयांची मदत मिळेल तर तो अलग त्या खटल्यांतून मुक्त होतो, व अब्रूचा बचाव होतो. आमच्या गीरेश्वर सावकाराजवळ जर मागण्यास गेलें तर सरकारास सहजच संशय आल्यावांचून रहाणार नाहीं. याकरितां तुजजवळ पैसे नसल्यास ती वज्रटीका गहाण ठेवण्यास तुला दिलीच पाहिजे. याशिवाय तुला निक्षून सांगतों कीं मी त्याच्याकरितां प्राण देखील देण्यास चुकणार नाहीं.

माळीण—तें कांहीं असो. तुह्मांस मी वज्रटीका ह्मणून द्यावयाची नाहीं.

माळणीचे हे शब्द ऐकतांच माळ्यास मोठा संताप आला, आणि त्या रागासरसा उठून तिच्या दोन तीन श्रीमुखावर चढवणार तोंच नीरेश्वर पुढें येऊन आणि त्यास थांबवून ह्मणाला, अरे, हें तूं काय मांडलें आहेस! जरी तुझें ह्मणणें खरें आहे तरी अज्ञान मनुष्यास मारणें हें ठीक नव्हे. मजबरोबर बंगल्यांत चल ह्मणजे लागतील तेवढे तुला पैसे देतों. त्यास पाहून माळी मनांत लाजला व हातांत पेटलेला कंदील घेऊन नीरेश्वरास बंगल्यांत पोंहचविण्याकरितां त्याजबरोबर निघाला.

नीरेश्वर त्या माळ्याबरोबर जात असतां त्याचे मनांत

मित्राविषयीं विचार एकामागून एक येऊं लागले. एक तर त्याविषयीं त्याणें पुस्तकांत वाचलें होतें; व दुसरें, ह्या माळ्याचें प्रत्यक्ष उदाहरण पाहून आपणासही एखादा सद्गुणी व वेळेस उपयोगी पडणारा मित्र असावा असें त्याच्या मनांत वरचेवर येऊन, तो मिळविण्याच्या प्रयत्नासही लागला. कांहीं वेळानें ते दोघे बंगल्यांत येऊन पोंहचले. नीरेश्वरानें त्यास दहा रुपये देऊन व त्याची मित्रत्वाचे पूज्यतेविषयीं तारीफ करून, स्त्रीबरोबर पुन: कधीं न भांडण्याविषयीं उपदेश केला. माळी गेल्यावर नीरेश्वर जेवण आटोपून बिछान्यावर जाऊन पडला. पण त्यास नीज येईना. तो आपणास मित्र कोण करावा ह्याच विचारांत गढून गेला. बिछान्यावर इकडून तिकडे लोळावें, चैन न पडल्यास परत तें पुस्तक घेऊन वाचावें, एकेक दोन दोन तासांनीं बाहेर गच्चीवर जाऊन दिवस वर आला किंवा नाहीं तें पहावें, असें होतां होतां पहांट झाली. मुखमार्जन वगैरे प्रातर्विधी आटोपून परत तो चिंतातूर अशा स्थितींत फिरण्यास गेला. पण त्याचे मनास स्थिरता नसल्याकारणानें तो तसाच फिरत फिरत आपले बापाचे घरीं गेला. पुत्रास पहातांच गीरेश्वरास अत्यानंद झाला; आणि त्य दिवशीं उत्तम भोजन करण्यास आज्ञा दिली व दुसरे इा मित्रांसही निमंत्रणें केलीं. मंडळी भोजनास बसली असतां नीरेश्वराची मुखचर्या पूर्वीप्रमाणें प्रफुल्लित नाहींशी पाहून बापास आश्चर्य वाटलें व भोजन वगैरे आटोपल्यावर एकांतीं नेऊन बापानें त्याचें कारण त्यास विचारलें. त्याणेंही पित्यास सर्व निवेदन केलें. तो ह्मणाला, बाबा, प्रसंगीं सहाय करणारा व उपयोगी पडणारा खरा

व उत्तम मित्र मला मिळवून द्या ह्मणजे झालें. नीरेश्वर याचा परशुराम पंडित ह्मणून एक प्रीतींतिल कारकून होता त्यास त्याणें ही सर्व हकीकत सांगितली. कारकून ही हकीकत ऐकून ह्मणाला, शेट साहेब, आपण यविषयीं बिलकूल काळजी करूं नये. उद्यां सुंदर नगरीचा मदन या नांवाचा कोणी राजपुत्र कांहीं हिरे खरेदी करण्याकरितां आपणाकडे येणार आहे; तो आल्यास आपल्या धाकट्या रावसाहेबांची आणि त्याची गांठ घालून देतों. दुसरे दिवशीं परशुरामानें नीरेश्वरास सुंदर पोशाक करून त्याचे बापाचे गादीवर बसण्यास सांगितलें. दोनप्रहरच्या सुमारास तो राजपुत्र मदन पूर्ववत् सांगितल्याप्रमाणें बरोबर एक कारकून व दोन शिपाई घेऊन आला. नीरेश्वर आपल्या परशुराम कारकुनासह त्यास सामोरा जाऊन मदन राजपुत्राचा हात धरून त्यास मोठ्या नम्रतेनें आपल्या आसनावर आणून बसविलें. पान, सुपारी, अत्तर इत्यादिक झाल्यानंतर, नीरेश्वरानें, आपली स्वारी आज गरिबाचे घरीं कोणत्या कारणानिमित्त आली, ह्मणून हळूच प्रश्न केला. मदन ह्मणाला, शेटजी, आपणाजवळ उत्तम प्रकारचे हिरे असतात ह्मणून देशोदेशीं आपली ख्याती पसरलेली आहे; आणि मी मुशाफरी करण्याकरितां घरांतून बाहेर पडलों; ह्मणून परत जातां जातां आपल्याकडे येऊन कांहीं हिरे, मोतीं, माणकें, लाल, इत्यादि मौल्यवान चिजा खरेदी कराव्या या हेतूनें आपणाकडे आलों आहें. आपण ते दाखविण्याची मेहरबानी कराल तर आह्मांवर आपण मोठे उपकार केलेसें होईल. नीरेश्वरानें उत्तम उत्तम हिरे वगैरे चिजा राजपुत्रास दाखविण्यास परशुराम कारकु-

नास आज्ञा केली. त्यानें एका लहानशा पेटींतून कांहीं हिरे, मोतीं, माणकें इत्यादि आणून तीं मदन राजपुत्रा-समोर ठेविलीं. राजपुत्रानें त्यांतून निवडक कांहीं खरेदी केलीं आणि त्यांची वाजवी किंमत त्यास दिली. खरेदी झाल्यावर राजपुत्र जाण्यास निघाला पण नीरेश्वर व परशुरामपंत या उभयतांनीं आपल्या घरीं एक दिवस रहाण्याचा त्यास फारच आग्रह करून राहवून घेतलें. नीरेश्वर ह्मणाला, महाराज, आमच्या घरीं आपल्या सारख्यांचें येणें फार दुर्मीळ, आणि प्रवासाच्या निमित्तानें आपलें आज येथें अनायासें येणें झालें आहे, तर आपण गरीबावर मेहरबानी करून आजची रात्र आमच्या येथें राहाल तर आह्मांवर आपले मोठे उपकार होतील. राज-पुत्रानें न रहाण्याविषयीं बरीच अट घेतली परंतु शेवटीं त्याचा नाइलाज होऊन त्यास रहाणें भाग पडलें. त्यास आपल्या दिवाणखान्यांत घेऊन जाण्याविषयीं आपल्या कारकुनास सांगितलें. दिवाणखाना पूर्वसंकेताप्रमाणें फार उत्तम रीतीनें शृंगारला होता. सर्व दिवाणखाना मौल्यवान गालिच्यांनीं आंथरून त्यावर मखमालीनें व मशरूनें मढविलेल्या खुरच्या व कोचीं असून, दिवाणखान्याच्या मध्यभागीं एक मोठें वाटोळें टेबल होतें. त्यावर कांहीं मासिक पुस्तकें, वर्तमानपत्रें, व इतर शास्त्रीय विषयांचीं पुस्तकें ठेवलीं होतीं; भिंतीस मोठमोठे स्वच्छ कांचेचे आरसे असून भिंतीच्या मुलामा दिलेल्या खांबास मेणबत्तीचे दिवे लावले होते. त्याच्या मध्यभागीं एक मोठा झुंबर असून त्याचे सभोंवार हंड्यांचीं मोठी गर्दी उडवून दिली होती. चाऱ्ही बाजूंस चार नकशीचीं शिसवी मेजें असून त्यांजवर चित्र-

विचित्र सुंदर चित्रें व लहान लहान कृत्रिम झाडें होतीं. चांदीच्या नकशीदार ताटांत गुलाबदाण्या व तुरे घालून तीं मेजाचे बाजूस ठेविलीं होतीं. नीरेश्वराचा बाप गीरेश्वर हातांत एक पुस्तक घेऊन मखमालीच्या मऊ कोचीवर वाचीत बसला असतां गीरेश्वराच्या हुजऱ्यानें राजपुत्र मदन आल्याचें कळविलें. गीरेश्वर उठून त्यास सामोरा गेला व त्यास हातीं धरून आपल्या दिवाणखान्यांत घेऊन आला. तेथें अगोदर गुलाब अत्तर वगैरे होऊन मग परस्परांनीं एकमेकांचें क्षेमकुशल विचारलें. त्यानें राजपुत्रास त्याच्या येण्यानें आपणास आनंद झाल्याचें प्रदर्शित करून आह्मांवर आपले फार उपकार झाले असें बोलून दाखविलें. कांहीं वेळानें सावकारपुत्रही तेथें आला. त्याचें आणि राजपुत्राचें आतां थोडेंसें सख्य झाल्याकारणानें त्यांचें अनेक विषयांवर बोलणें चाललें. बोलतां बोलतां मदन राजपुत्राचा कल गायनकलेवर फार दिसला व त्या कलेंत तो बराच अवगतही होता ह्मणून आजची रात्र, ज्या अर्थीं हा येथें आहे त्या अर्थीं आपण त्याचें मनरंजन करणें हें आपलें कर्तव्यकर्म होय, असें मनांत आणून नीरेश्वरानें त्या रात्रीं गायन करण्याचा बेत करून तो आपल्या पित्याला कळविला. त्यास त्याचा (पित्याचा) सल्ला मिळाल्यावर त्या शहरांत गुलाबी या नांवाची एक वेश्या उत्तम गाणारी होती; आणि तिजपेक्षां तिची मंजरी या नांवाची मुलगी चौदा वर्षांची अति लावण्य व रूपवान असून गाण्यांत केवळ अप्सराच होती ह्या दोघांसही नीरेश्वरानें गायनाकरितां त्या रात्रीं आमंत्रण केलें. रात्रीचा समय होऊन सुमारें नऊ वाजण्याचा समय झाला. रस्त्यांत शुभ्र चांदणें पडून शोकी लोक

इकडून तिकडे व तिकडून इकडे फिरूं लागले, शिमग्याचा सण असल्यामुळें मुलें आट्यापाट्यांच्या खेळांत गोंगाट करूं लागलीं, कलिंगडवाले, गंडेरीवाले, मिठाईवाले, यांचें आपापला माल खपावा ह्मणून मधून मधून ओरडणें चालतें होतें, अशा वेळेस नीरेश्वरानें दिवाणखान्यांतील सर्व बेत बरोबर ठेवून खिडकींत त्या वेश्यांची वाट पहात बसला. सुमारें अर्ध्या तासानें त्या दोन्ही वेश्या आल्या. दिवाणखाना इष्टमैत्रांनीं गच्च भरला होता. मदन व नीरेश्वर हे गाणें ऐकण्यास एकेच ठिकाणीं बसले होते. पहिल्यानें गुलाबीचें गाणें ऐकून मदनास फारच संतोष झाला; पण जेव्हां त्या मंजरीनें गाण्यास प्रारंभ केला व रात्रीं ऐन बारांवर दोन वाजण्याच्या सुमारास मंजुळ आलाप घेऊं लागली तेव्हां मदन अतिशय हर्षभरित होऊन कांहीं वेळ देहभानही विसरला. अगोदर ती भर तारूण्यांत आलेली असून रूपानें सुंदर, गायनकलेंत अप्सरेसारखी चतुर, आणि त्यांत ते तिचे हावभाव, मग काय विचारतां! विश्वामित्रासारखा कडक तपस्वी त्या अप्सरेच्या मोहजाळ्यांत पडून लंपट होऊन गेला, मग हा मदन त्या मंजरीस पाहून भुलला यांत नवल तें कोणतें! चार वाजण्याच्या सुमारास तें गाणें संपत आलें. ऐकणाऱ्या मंडळींपैकीं कित्येकांनीं आपल्या शक्त्यनुरूप बिदागीदाखल त्या वेश्यांस कांहीं देणग्या दिल्या. मदन राजपुत्रानेंही पन्नास मोहरा व एक मोठ्या किंमतीचा हिरा बिदागींत तिला दिला. याप्रमाणें गाणें आटपलें. मदन व नीरेश्वर हे जरा निजण्याकरितां आपापल्या खोलींत गेले. परंतु त्या दोघांसही कांहीं केल्यानें नीज येईना. मदन राजपुत्राच्या डोळ्यासमोर रात्रीस ऐ-

कलेलें गाणें, पाहिलेली मौज, तिचे ते नखरेबाज हावभाव, अप्रतिम सौंदर्य, हें सर्व मूर्तिमंत उभें असल्यानें त्याच्या मनाची जी स्थिति झाली ती येथें लिहितां येत नाहीं. त्याचा प्रत्यक्ष अनुभवच घेतला पाहिजे. ज्या कामदेवानें प्रत्यक्ष शंकरास देखील आपल्या शरानें जिंकलें तो अशा बिचाऱ्या मदनासारख्या पामरास सोडील काय? तेव्हां त्या रात्रीं त्यास झोंप कशी बरें येईल? आतां ती मंजरी मिळविल्यावां-चून येथून परत घरीं जाणें हें आपणास धिःकारास्पद आहे असें तो समजूं लागला. ह्या कामांत आपला नवीन मित्र जो नीरेश्वर याची मदत घेतल्यास आपला कार्यभाग लवकर सिद्धीस जाईल असा मनांत विचार करून तो नीरेश्वराच्या खोलींत गेला. नीरेश्वराचीही तीच स्थिति असल्यामुळें तो आपल्या बिछान्यावर माशासारखा तळम-ळत पडला होता. त्याणें मदनास पहातांच उठून बसला, आणि ह्या वेळेस निजण्याचें सोडून येथें कां येणें झालें ह्मणून मोठ्या विचारांत पडला. मदन फार उतावीळ हो-ऊन त्याणें आपल्या मनाची स्थिति कोणत्या प्रकारें झाली व आपण कामज्वरानें कसा पीडिलो गेलों हें सर्व नीरे-श्वरास सांगितलें. त्याचीही स्थिति त्याप्रमाणेंच होती पण तो जरा विचारी व सुशिक्षित असल्यामुळें त्यास कामज्वरा-ची फार पीडा झाली नाहीं. आपल्या मित्राची अशी अवस्था पाहून त्यास फार वाईट वाटलें. तो मदनास ह्मणाला, मित्रा, मला कोणी तरी चांगला मित्र मिळावा ह्मणून आजपावेतों माझा सतत यत्न चालला असतां, आपली दो-घांचीही मैत्री अनायासें झाली. यापूर्वी तुला कोणताही छंद नसून या मोहपाशांत तुला पाडण्यास मीच कारण

झालों ह्मणून याविषयीं तुला दोन गोष्टी सांगणें हा माझा धर्म होय. पहा, हा स्त्रीनाद फारच वाईट असून त्याचा परिणामही फार भयंकर आहे. या स्त्रीनादास लागून कोणाचें बरें कल्याण झालेलें आहे? प्रत्यक्ष ज्याचा स्वामी शंकर, ज्यानें सर्व देवांस जिंकून कारागृहांत टाकलें, नवग्रहांस जिंकून आपल्या चाकरीस ठेविलें, व ज्याच्या पुत्रानें मोठ्या पराक्रमानें इंद्रादि देवांस जिंकलें, असा जो रावण, त्याणें रामस्त्री सीता हिला पापरूपानें हरण केल्यामुळें पुत्रपौत्रादिकांसह त्याचा व त्याच्या सर्व संपत्तीचा नाश झाला. तसेंच सती द्रौपदीविषयीं दुर्योधनानें दुष्टबुद्धि मनांत आणल्यामुळें त्याचाही नाश झाला. ह्या स्त्रियांचे नादीं लागून आजपावेतों कोणीही मनुष्य मोठेपणास न चढतां उलट आपल्या अब्रूस मुकले आहेत. येणेंकरून आपल्या शरीराची, द्रव्याची व अब्रूची हानि होते. परस्त्री आणि वेश्या ह्या केवळ पारध्याच्या जाळ्याप्रमाणें होत. पारधी ज्याप्रमाणें पक्ष्यांस जाळ्यामध्यें येण्याकरितां कांहीं खाण्याचा पदार्थ ठेवून त्यांस त्यांत येण्याविषयीं भुलवितो व ते पक्षी खाण्यास आले असतां जीवास मुकतात, तद्वत् स्त्रियांचें रूप, यौवन व नखरा इत्यादि, त्या जाळ्यांतल्या खाण्याच्या पदार्थाप्रमाणें आहेत. त्यांस पाहून जो पुरुष भुलतो तो त्या पक्ष्यांप्रमाणें प्राणास मुकतो. साधूंनीं ह्मटलें आहे:—

दर्शनात् हरते चित्तं, स्पर्शनात् हरते बलं ।
संभोगात् हरते वीर्यं, नारी प्रत्यक्ष राक्षसी ॥

ह्मणून हे मदना, आपल्या व दुसऱ्या साधुजनांनीं आह्मां तरुणांस या मोहपाशापासून जितकें दूर रहावेल तितकें दूर रहाण्यास उपदेश केला आहे; तसेंच मी तुला मित्रत्वाच्या

नात्यानें असें स्पष्ट सांगतों कीं हें जें तूं मनांत आणलें आहेस यास माझ्यानें अगदीं रुकार देववत नाहीं.

ज्याणें हें अवाढव्य जग उत्पन्न करून त्यांत हरएक प्रकारच्या घडामोडी चालविल्या आहेत; जो मानवरूपी मायावी बाजार चालविण्याकरितां त्यांच्या प्रकृतींत एका निमिषमात्रांत गुणावगुणांचें रूपांतर नेहमीं करतो, त्यानेंच नाद हा एक विशेष गुण त्यांच्यांत ठेविला आहे. त्याचें एवढें कांहीं प्राबल्य असतें कीं, जोंपर्यंत मनुष्य एकाद्या वाईट अथवा चांगल्या नादाच्या स्वाधीन असतो तोंपर्यंत त्यास कोणी किती जरी उपदेश केला तरी त्यापासून त्याचें मन न फिरतां त्याचे ते नाद (हरएक प्रकारचे ) तसेच कायम रहातात, आणि केलेल्या उपदेशाचा दाब त्यावर न बसतां तो व्यर्थ जातो; तद्वत् नीरेश्वरानें मदनास उपदेश केला परंतु त्याचें कांहीं फल न होतां, तो उलट नीरेश्वरास ह्मणाला, मित्रा, तूं सांगतोस ती गोष्ट खरी, पण हें तुझें पांडित्य जोंपर्यंत तुला त्या गोष्टीची गोडी लागली नाहीं तोंपर्यंतच. अरे, आपण आतां तरुण असून या जगांत ईश्वरानें शौकी लोकांकरितां ज्या कांहीं वस्तु उत्पन्न केल्या आहेत, त्या भोगण्याचे आमचे हे दिवस. या वयांत जर आपण सुखवस्तु चैन करणार नाहीं तर वृद्धापकालांत आपणास त्याचा पश्चात्ताप झाल्यावांचून रहाणार नाहीं. अशी जनरूढीच आहे कीं, बाळपणांत बाळपणचें, तरुणपणांत तरुणपणचें सुख भोगून, नंतर वृद्धापकालांत त्या सर्वांचा पश्चात्ताप करून व पापाची क्षमा मागून ईश्वराचें ध्यान करीत बसायाचें. कारण मग सर्व गात्रें शिथिल झाल्याकारणानें त्या कालीं पाप होऊं शकत नाहीं. ह्मणून

मित्रा, हे तुझे प्रौढ विचार तुझ्या वयास शोभत नाहींत. चल, उठ आतां. माझ्यानें बिलकूल धीर धरवत नाहीं. कसेंही करून त्या सुहास्यवदना मंजरीची व माझी एकदां गांठ घालून दे, म्हणजे त्वां मित्रधर्मास अनुसरून माझे प्राण वांचविल्यासारखे होतील. नीरेश्वरानें मदनास या प्रकारें आणखी पुष्कळ बोध केला पण तो सर्व व्यर्थ जाऊन त्यास त्याच्या ( मदन ) बरोबर मंजरीच्या घरीं जाण्याचें वचन देणें भाग पडलें. त्या दोघांचें बोलणें चाललें आहे तों प्रभात झाली. कोंबड्यानें आपल्या दीर्घ स्वरानें उद्योगी लोकांस, रानांतील घातुक वनचर प्राणी, घुबडें इत्यादिकांस, सर्व पृथ्वीस उजेड देणारा जो सूर्य तो आपल्या सहस्र किरणांनीं येत आहे असें कळविलें. कावळे, चिमण्या इत्यादि पक्षी काव काव–चिंव चिंव इत्यादि शब्दांनीं जणूं काय ईश्वराचे गुणानुवाद गाताहेत, दळणाऱ्या बाया ईश्वराच्या मायिक सृष्टिरचनेच्या खेळावर निरनिराळीं गाणीं गाऊं लागल्या आहेत, तों बाहेरून " सरकार, उशीर झाला, उठावें " ह्मणून राजपुत्राच्या चाकरानें हांक मारली. त्याबरोबर ते दोघेही खोलीच्या बाहेर येऊन पाहूं लागले तों दिवस बराच वर आला. मदन राजपुत्रानें तेथून बाहेरगांवीं जाण्याचा बेत रहित करून कांहीं दिवसपर्यंत त्याच शहरीं मुक्काम करण्याचें ठरविलें, आणि त्या दिवशीं सायंकाळीं त्या वेश्येचे घरीं जाण्याचा त्यांनीं बेत केला.

सायंकाळीं जेवणखाण आटोपून सुमारें सात वाजण्याचे सुमारास ते दोघेही सुंदर पोशाक करून त्या वेश्येच्या घरीं जाण्यास बाहेर पडले. शुक्लपक्षींचें चांदणें

स्वच्छ पडल्यानें त्यांच्या त्या भरजरी गुलाबी इजारी, आंगांत वेलबुट्टीच्या मोतीया रंगाच्या पैरणी, डोक्यास मोतीया रंगाचे जरी फेंटे, व हातांत कोंदण केलेल्या हिऱ्याच्या आंगठ्या यांनीं त्यांस इतकी शोभा आणली होती कीं, ते दोघेही प्रत्यक्ष मदनासारखे सुंदर दिसूं लागले. अशा पोशाखानें ते हातांतील काठी फिरवीत व आकाशांतील चंद्र व तारे यांजकडे पहात व त्यांविषयीं कांहीं संभाषण करीत रस्त्यानें चालले असतां त्या वेश्येच्या घराच्या जरा अलिकडे नीरेश्वराची नजर सहज वर गेली, तों त्यानें एका बंगल्यांतील खिडकींत मंजरीपेक्षांही अतिशय सुंदर एक तरूण स्त्री पाहिली. तिनें नीरेश्वरास पहातांच हास्यवदन करून आपल्या माथ्यांतून एक गुलाबाचें फूल त्याचे आंगावर फेंकलें; परंतु मदन राजपुत्र आपल्या विचारांत गर्क असल्यानें त्यानें हें कृत्य पाहिलें नाहीं.

साधारण असा नियम आहे कीं, कोणत्याही मनुष्याचा कल चांगल्यापेक्षां वाइटाकडे पहिल्यानें जातो. त्याप्रमाणें नीरेश्वराच्या मनांत त्याचा नवीन प्रिय मित्र मदन यानें केलेल्या बोधाची आठवण होऊं लागली. त्यांतही नवीन मैत्री झाल्यामुळें "संगती संग दूषणं" या म्हणीप्रमाणें त्याच्या सोबतीचें त्यास जरा वारेंही लागूं लागलें. नीरेश्वरानें तिचें तें मोहक रूप पहातांच त्याचे मनाची वृत्ति कांहीं विलक्षणच झाली. तो जरी मदनाबरोबर चालला होता तरी त्याचें सर्व मन तिजकडे गुंतून गेलें होतें. अशा स्थितींत ते दोघेजण एकदांचे त्या मंजरी वेश्येचे घरीं पोंचले. मंजरीची आई गुलाबी हिनें त्यांचा चांगला आदरसत्कार करून येण्याचें कारण विचारिलें. तेव्हां नीरेश्वरानें तीस एके

बाजूस नेऊन येण्याचें कारण सांगितलें. मग तिकडे काय विचारावयाचें! "आधींच नाचरी, त्यांत पायांत बांधली घागरी" या ह्मणीप्रमाणें ती बोलून चालून वेश्याच, आणि त्यांत राजपुत्रासारखा यजमान मिळाल्यावर ती कां कबूल होणार नाहीं! तिनें मंजरीस उत्तम प्रकारचा शृंगार करून मदन राजपुत्राचे समोर गायन करण्यास सांगितलें. नीरेश्वराचें सर्व लक्ष दुसरीकडे असल्यानें आतां आपण येथें राहूं नये असा विचार करून त्यानें मदनाची रजा घेतली; आणि परत आलेल्या वाटेनें निघाला. मदनास मंजरीचें तें शृंगारयुक्त गाणें ऐकून व तीस समोर पाहून त्याच्यानें काडीमात्र देखील धीर धरवेना. त्यावेळीं तेथें त्या दोघांशिवाय दुसरें कोणीही नाहीं असें पाहून एकदम मंजरीच्या पदरास त्यानें जाऊन धरिलें, आणि तीस आपल्याजवळ बसण्यास सांगितलें. मंजरी, मदन आपल्यावर अतिशय लुब्ध झाला असें पाहून त्यास ह्मणाली:—

**मंजरी**—अग बाई, असं काय तरी करावं हें! असं मला आवडत नाहीं बाई. पुरुषजातीस लाज ह्मणून बिलकूल नसते. जर एखाद्यानं पाहिलं तर ह्मणेल तरी काय?

**मदन**—अग, येथें आपणा उभयतां शिवाय दुसरें कोणी तरी आहे काय? तर मग त्यांत शरम ती कसली? तशांत तुह्मां वेश्यांस इतकी लाज ती कशास पाहिजे?

**मं०**—वेश्या झालें ह्मणून काय झालं, पण जात एकून स्त्रियांचीच ना! इतकं मेलं मन उतावळं कसं कोण जाणें!

**म०**—मंजरी, तूं ह्या वेळेस कांहीं जरी बोललीस तरी तुझे हे शब्द केवळ पुष्पवत् भासतात. असो. आतां एक वेळ * * * तरी दे बघूं!!

मं०—काय तरी बाई ! आपल्या गरजेपुरतं मात्र प्रेम दाखवायाचं! उद्यां कोणी मजपेक्षां जरा चांगली मिळूं दे एखादी, ह्मणजे हें बोलणं सर्व येथल्या येथंच !

म०—नाहीं; नाहीं, मी कांहीं तसा नाहीं. अग, एक वेळ जीवर प्रेम बसलें तें परत फिरायाचें काय?

मं०—कोणी ह्मणेल खरंच. घ्या तर बघूं माझ्या गळ्याची शपथ.

म०—अग, तुझ्या गळ्याची शपथ ! आतां तरी झालेंना! आलिंगन दे पाहूं कसें.

याप्रमाणें त्या दोघांचा विनोद होऊन परस्पर प्रेम बसलें आणि त्या दिवसापासून मदन हा नेहमीं तिजकडेस जाऊं लागला.

इकडे नीरेश्वर घरीं जाण्याकरितां त्याच वाटेनें परत जात असतां पुन्हा, ज्या खिडकींत त्यानें ती दुसरी स्त्री पाहिली होती तिकडे वर नजर करून पाहूं लागला. तों ती त्याच खिडकींत बसली असून यास पहातांच तिनें एक हस्तलिखित चिठी खालीं टाकली, व लाजल्यासारखें करून पदर सांवरून चालती झाली. नंतर नीरेश्वरानें ती जमिनीवर पडलेली चिठी मोठ्या आनंदानें उचलली व उघडून पुढें लिहिल्याप्रमाणें वाचूं लागलाः—

"परम प्रिय राजस्नेहांकित श्रीमंत नीरेश्वर
महाराज यांसीं प्रती

कामिला दासीचा चरणाप्रत नमस्कार असो. पत्र लिहिण्यास कारण कीं या मानस सरोवरांतील एक कमलिनी फुलून अगदीं मदानें भरून गेली आहे, व सूर्य तिकडे पहात नसल्याकारणानें भ्रमर त्यांतील

मद खाण्यास व तिजबरोबर गुंजारव करण्यास धजत नाहीं, ह्मणून ती जागचे जागीं कोमेजून जाते, यास्तव तिजवर आपण दया करून ती सदोदित प्रफुल्लित राहील अशी तजवीज कराल अशी आशा धरून ही विनंती केली आहे. तर ती पूर्ण करणारा आपल्याशिवाय दुसरा या जगांत मिळणें नाहीं. कळावें, ममता पूर्ण असावी ही विनंती.

आपली दासी,

कामिला."

याप्रमाणें ती पडलेली चिठी वाचून नीरेश्वर मोठ्या विचारांत पडला. तो मनांत ह्मणाला, "काय बरें ह्या स्त्रीचें चातुर्य हें! कशा अन्योक्तीनें तिनें हें पत्र लिहिलें आहे पहा! असो. ज्या अर्थी तिनें आपलें प्रेम मजवर दर्शविलें, व मीही तिला पाहून मोहित झालों, त्या अर्थी तीस भेटण्याची कांहीं तरी युक्ति काढावी हें योग्य होय. असा मनांत विचार करून तो घरीं गेला. संध्याकाळीं फिरण्यास जाण्याच्या मिषानें बाहेर पडला आणि परत त्या वाटेनें जाऊं लागला. ते दिवस चांदण्याचे असल्यामुळें चांदणें शुभ्र पडलें होतें. कामिला गच्चीवर बसलेली होती. तिणें यास पहातांच मोहित होऊन आपल्या दासीस त्याला वर बोलावण्यासाठीं पाठविलें. तो तिजबरोबर दिवाणखान्यांत येतांच, तिणें निर्भीडपणें एकदम त्याच्या गळ्यास मिठी मारून स्फुंदस्फुंदून रडूं लागली, आणि त्यास ह्मणाली, महाराज, आपलें मुखकमल पाहिल्यापासून मला बिलकूल चैन पडत नव्हतें आणि शेवटीं लज्जा टाकून आपणास पत्रही लिहिलें ह्मणून या निर्भीडपणाबद्दल मला क्षमा असावी. ज्यावेळेस तिनें त्याच्या गळ्यास मिठी मारली त्यावेळेस त्याची

जी कांहीं अवस्था झाली ती लिहितां येत नाहीं. तो जरी सुज्ञ, विद्वान व विचारी होता तरी त्याचें मन गोंधळून तो मोठ्या विचारांत पडला. त्याच्यानें एक अक्षरही मुखांतून बाहेर काढवेना. तिचे रडण्यामुळें त्याचेही डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या. आणि कामिलेच्या ह्मणण्यास रुकार देऊन तिचे मनोरथ पूर्ण केले.

याप्रमाणें मदन मंजरीस, व नीरेश्वर कामिलेस भुलून त्यांचे अगदीं अंकित होऊन गेले. गीरेश्वरास हें समजतांच त्याणें ( नीरेश्वरानें ) वाईट चालीस लागूं नये व घर संसार अब्रूनें पहावा ह्मणून त्याचें एका सुंदर व सभ्य कुलांतील मुलीशीं लग्न लावून दिलें. तरी व्यर्थ. त्याचा कांहीं केल्यानें तो नाद सुटेना. हें पाहून त्यास फार वाईट वाटे. तो आपल्या मनांत ह्मणे, हे परमेश्वरा ! तुझी लीला अगाध आहे. पहा, वृद्धपणीं त्यानें माझे उपयोगीं पडून मजप्रमाणेंच पुढें दिगंतरीं अब्रू मिळवून संसारगाडा सुरक्षीत चालवावा व मी बाकीचें आयुष्य तुझे सेवेंत घालवावें असा माझा हेतु होता, पण तुझी इच्छा निराळीच ! सर्व वेदपुराणशास्त्रांत तुजविषयीं असें ह्मटलें आहे कीं "तुझे इच्छेविरुद्ध झाडाचें पान देखील हालत नाहीं" असें असतां तुझे मनांत माझेकडून सेवा घेण्याची नाहींना ! हा दोष मी तुजकडे देत नाहीं तर माझें पूर्वसंचित त्याप्रमाणें हा सर्व प्रकार घडून आला. प्रसिद्ध साधु रामदास याणें दुसऱ्याचे हितास्तव व आपणास बाधे व्हावा याकरितां जो मनास उपदेश केला आहे त्यांत ते असें ह्मणतात—

मना त्वांचि रे पूर्व संचीत केलें ।
तया सारिखें भोगणें प्राप्त झालें ॥

त्याप्रमाणें मागें माझे हातून कांहीं वाईट गोष्टी घडल्या असतील म्हणून हें दुःख मजवर आलें असावें. मी जी यास विद्या शिकविली ती एवढ्याकरितां कीं त्याणें या जगांत सन्मार्गानें चालून गोरगरिबांस मदत करावी व लोकांवर उपकार करावे. याविषयीं त्या साधूनें त्याच श्लोकांत लिहिलें आहे–

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावें ।
परी अंतरीं सज्जनां नीववावें ॥

तर त्यानें तिचा उपयोग असा करावा काय? तेव्हां माझेंच नशीब ! मध्यें मध्यें काय त्यास "मित्राचें" वेड लागलें. मदन राजपुत्र नीतिवंत व चांगल्या स्वभावाचा असेल म्हणून त्याची मैत्री करून दिली. परंतु तो काय विचारतां ! त्यानें तर आपल्या नांवाप्रमाणें कीर्ति केली. आपण स्वतः मोहपाशांत पडला तो पडलाच, पण आपल्या बरोबर माझ्या पुत्रासही त्याच पाशांत पाडलें. आतां यास काय उपाय योजावा बरें ? हो, हो ! पण बरी आठवण झाली. त्याचा एक लहानपणचा लंगोटीयार शाळेंतील सोबती कोपेश्वर या नांवाचा आहे. तो जरी अमळ रागीट आहे तरी चतुर आहे; एकादेवेळेस तो माझ्या पुत्राचें मन अशा वाईट कृत्यापासून वळवूं शकेल; त्यास आतां बोलावून याजविषयीं सांगावें हें बरें. असें म्हणून गड्यास हाक मारून म्हणतो, कोण आहे रे तेथें! रामा, रे रामा—

रामा गडी–जी, सरकार, काय आज्ञा है ?

गीरेश्वर–अरे, त्या कोपेश्वराकडे जा आणि त्यास मी

कांहीं कामास्तव बोलावलें आहे ह्मणून सांग. समजलास ना? जा लवकर.

रामा गडी—जी, सरकार, ह्यो आलों पघा त्यांसनीं वेऊनशेनीं.

---

## भाग तिसरा.

### ( मानस सरोवर. )

( राधाबाई, काशीबाई, साळूबाई, लक्ष्मीबाई, सरस्वतीबाई, आणि अन्नपूर्णाबाई यांचा संवाद. )

काशीबाई—कां! राधावैनी, तुमचं काम ह्मणजे आपलं बाई नेहमीं आहेच ना! जेव्हां पहावं तेव्हां कामांतनीं कामांत. अहो, तळ्यावर धुण्यास जावयास दुपार नाहींका झाली!

राधाबाई—काय तरी बाई बोलतात कोणास ठाऊक. घरांतलं काम आपण नाहीं पहावं तर दुसरं का पहाणार आहे! तरी बाई आमच्या साळूबाई आहेत ह्मणून एखादवेळेस बसण्यास फुरसत तरी मिळते. ह्या एवढ्या मोठ्या मुली झाल्या, पण आहेत का कांहीं कामाच्या! उद्यां नवऱ्याच्या घरीं जातील तेव्हां बऱ्या काम करतील!

लक्ष्मीबाई—नवऱ्याच्या घरीं गेल्या आणि मोठ्या झाल्या ह्मणजे करावयाचें तें करतीलच; त्याची पंचाईत आतां कशास पाहिजे! अगोदर त्यांचं लग्न तर होऊंद्या, मग पुढच्या गोष्टी. पण राधावैनी, तुह्मी येतां कीं नाहीं तळ्यावर? आह्मांस फार वेळ करतां कामास नये. आमच्यानं बाई मग भरउन्हांतून जाण्याचं जिवावर येतं.

**राधाबाई**—अग पण हो! किती तरी नाजुक! मोठ्याच कामास फार लांब जायाचं आहे वाटतं! मी हीच आल्यें बघ.

( इतक्यांत सरस्वतीबाई व अन्नपूर्णाबाई हातांत धुण्याचे गंज घेऊन येतात ).

**सर० व अन्न० बाई**—चलाहो, चला उशीर झाला, चला लौकर.

**राधाबाई**—आल्या का ह्या कैदासिणी? नशीब माझं, आतां ह्या कसल्या मला काम करण्यास देतात! काशीबाई, चला, हें माझं धुण्याचं घंगाळ घेतलं! तुह्मी मला फुरसत का देणार आहांत!

( सर्वजणी मानस सरोवरावर जातात व धुणीं धुतांना एकमेकी गोष्टी करतात ).

**राधाबाई**—सरस्वतीबाई, तुमच्या गळ्यांतलं पुतळ्यांचं गांठलं अत्तांसि कुठं दिसत नाहीं तें! गहाणबिण नाहींना ठेवलं!

**सर०**—काय तरी तुह्मी बोलतां बाई कोणास ठाऊक, तें तुह्मांस ह्मणून शोभतं. आह्मांस ईश्वरानं काय कमती केलं आहे का? पोटापुरतं मिळवून आणतात तेवढं ईश्वरानं सदोदित चालवावं ह्मणजे झालं; गहाण ठेवण्याचा प्रसंग आह्मांवर कधींही न येवो.

**अन्नपूर्णाबाई**—हो हो, राधावैनी, बरी आठवण झाली. ती कामिला संवगडीण ठाऊक आहे का आपली! काय बाई अत्तांशी तिचा तोरा! सारा दिवस आपली गवांतच असते, आणि तिच्याच गळ्यांत मी सरस्वतीबाईंचं गांठलं पाहिलं होतं. कां सरस्वतीबाई, खोटं बोलूं नका.

**सरस्वतीबाई**—अग मी खोटं कशास बोलूं? ती कामिला किनई, परवांचे दिवशीं मजकडे आली, आणि

मला ह्मणाली कीं, तिचा भाऊ आज बाहेरगांवाहून येणार आहे तेव्हां तें गांठलं दाखवून त्यासारखं ती त्याजजवळून करवून घेणार. दोन दिवस जवळ असूंदे, ह्मणून मी दिलं, समजलीस का ?

दुसरी संवगडीण साळू–हो, आहे ठाऊक. निर्लज्ज रांडांस शरम देखील नाहीं. मी आज तीन दिवस तिचे ढंग पहात आहें; तो नीरेश्वर आणि ही नाक कातरी एके ठिकाणीं बसून गप्पा करीत असतात !

काशीबाई–खरंच गडे, तरीच ती अत्ताशीं धुण्यास येत नाहीं आपल्या बरोबर, आणि जेव्हां पहावं तेव्हां बाई तिचं तोंड कनई पानसुपारी खाऊन लाल नी लाल, जणूं काय आमच्यांच्या पायांतला जोडाच !

राधाबाई–साळू, तूं किती तरी चावट आहेस ! जर कोणी हें तुझं बोलणं ऐकलं तर काय ह्मणेल ! उगीच गरती बायकोस भलतंच बोलावं हें काय ?

साळू०–अहाहा, काय ह्मण आहे नव्हे–" बाजारांत * * * आणि घरांत सांगूं नको" तशांतली अवस्था ! सर्व शहरभर बोंब झाली आणि आतां चोरून तें कसलं राहणार ? नीरेश्वरास रात्रंदिवस तिजवांचून दुसरं कांहीं सुचतच नाहीं.

काशीबाई–साळू, तूं काय समजत्येस, राधावैनीस ठाऊक नाहीं अशी गोष्टच होणार नाहीं. पण मुद्दाम आमच्या तोंडीं ऐकविण्याकरितां वेड घेतात. मीं मघाशींच नाहीं का ह्मटलें कीं दादांचा आणि यांचा स्वभाव एक. तूंच पहा. प्रत्यक्षास प्रमाण नको. दादांचं तरी असंच, आपल्या मनांतलं कोणास न कळवितां दुसऱ्याचं मात्र बाहेर ओकवायाचं.

राधाबाई—तुह्मी बाई हवें तें बोला, मला त्या मंजरी व मदनाबद्दल ठाऊक होतं, परंतु ह्या कामिलेवि- षयीं बिलकूल माहीत नाहीं. जरा गुणगुण मात्र ऐकिली खरी, कोणास ठाऊक खरी कीं खोटी !

सरस्वतीबाई- काय मेल्या ह्या बायका आणि हे पुरुष तरी ! एक तर बोलून चालून नायकीणच, परंतु त्या कामिलेनं असं ढोंग मजजवळ सांगून परपुरुषास नादीं लावावें ना ! ! ! ह्यांस हिजड्यांचंच नांव शोभतं ! ! ! आतां त्यांच्या त्या बिचाऱ्या लग्नाच्या बायकांनीं ह्यांच्या नावानं का दगड फोडावेत ? मला बाई असं बिलकूल सोसत नाहीं.

अन्नपूर्णाबाई—पुरे, पुरे हो, फार गर्व नका करूं—ह्मणून- च मला वाटतं रोज आमचे रात्रीस बाहेर जातात ह्मणून गाणं करतां, आणि नवऱ्याजवळ फुगून रोज तंटा कर- तां, बोलत नाहीं तोंपर्यंत.

साळू—बाहेर गेले ह्मणून काय झालं ? पण ते कांहीं ह्यांच्यासारखे वेडे होऊन रात्रंदिवस त्यांच्याच घरांत नाहीं ना बसलेले ? पुरुष आहेत, कधीं काळीं बाहेर गेले ह्मणून आपण बोलावं हें योग्य नाहीं.

सरस्वतीबाई—साळू, मी . तुला पुरी ओळखत्यें हो, पण असो, आतां बोलत नाहीं; ज्यानं त्यानं आपली अब्रू सांभाळावी हें बरं; काय बाई नाककातऱ्या तरी !!

राधावैनी—अग तुमचं दोघांचं आहे तरी काय ! जेव्हां पहावं तेव्हां आपलं सवतीसारखं भांडण ! अग, मग त्या नीरेश्वराचे बापास हें कळलं नाहीं काय ?

काशीबाई—कळलं नाहीं तर का अजून राहिलं आहे ? पण बिचारा करतो काय ! काल कनई, दादा ओ-

त्यावरच्या खोलींत बसले असतां त्या रामास हांक मारून त्याचा कोपेश्वर का धोपेश्वर—मला बाई नांव देखील आठवत नाहीं—त्यास बोलावून आणण्याकरतां पाठविलं, आणि त्यासच तिकडे उपदेश करण्याकरितां पाठविणार आहेत. पाहूं आतां हे काय दिवे लावतात ते !

**राधावैनी**—कायग साळू, त्या कामिलेचा नवरा आहेना, मग ती असं वाईट कृत्य कसं बरं करत्ये ?

**साळू**—राधावैनी, तुह्मास नाहीं का ठाऊक ! ती कनई मोठ्या श्रीमंताची मुलगी आहे हो. बिचारीचं बापानं पैशाच्या लोभाकरतां, एका थेरड्या साठ वर्षांचे पत्याबरोबर बारा वर्षांची असतांना मोठ्या डामडौलानं लग्न करून दिलं !! शेवटीं हीस न्हाण येण्याचे वेळेस ते राजश्री यमाजीपंतांचे भेटीस गेले; त्याच्या मागून तिचे वडीलही गेले; आतां सासू मात्र आहे पण तीही आंधळी ! राधावैनी, खरंच सांगा, ह्या हल्लींच्याना बायका ! त्यांच्यानं दुसऱ्यांचे सुखसोहळे पाहून कसं राहवेल ! ! खाण्यापिण्यास काय कमी आहे, पुरूषांचं सुख तर तिनं बिलकूल पाहिलं नाहीं. बरं दुसरं लग्न करावं तर धर्मभोळीं माणसें आपलीं आहेत पुढें अडवायाला. खरंच बाई, माझ्या मतं अशांनीं पुनर्विवाह केल्यास फारच चांगलं. एरवीं तरी अन्न जायाचीच ना; त्याअर्थी कामिला त्या नीरेश्वरास भुलली यांत तिचा अपराध तो काय !

**सरस्वतीबाई**—काय पण बोलते ! कोणी ह्मणेल पंडितीणच जशी ! मोठी सुधारणुकेच्या गोष्टी सांगत्ये ! ! राधावैनी, तुह्मास दुसऱ्यांची पंचाईत कशास पाहिजे, मरेनात त्या रांडा. 'करतील तशा भरतील.' आपणांस काय करा-

यचं, आपणांस धुवावयास येऊन बराच वेळ नाहीं का झाला ? हो, हो, केवढी तरी दुपार झाली ! चला, चला, आटपा लौकर.

अन्नपूर्णाबाई–खरंच गडे, किती तरी उशीर झाला, घरीं आतां रागें भरतील.

राधाबाई–चला तर चला, आपापलीं सर्व वस्त्रें बरोबर घेतलींत ना, विसराल एखादें. नीट पहा हो.

( सर्वजणी धुण्याचे गंज घेऊन परत घरीं जातात. )

---

## भाग चवथा.

### शिखरिणी.

त्रिलोकांचा साचा हरिजन कसा चालक खरा ॥
तिथें कोपें वाचा, कवणि तुज वाचाल विखरा ॥
नृपर्षी शाद्यांचा, मुनि सुतनयाचा न फळला ॥
तुतें जीवा याचा, अनुभव न या त्रांग कळला ॥

अर्थ–त्रैलोक्याचा उत्पन्नकर्ता आणि चालक श्रीहरि असून सर्वांचा जनकही तोच आहे; मग, तेथें प्रखर बुद्धीचें कोपयुक्त भाषण अन्यावर प्रेरणारा तूंच कोण, व कोणावर प्रेरितोस? अरे, विश्वामित्रासारखे महान्, इंद्र, दुर्वास यांना काय काय फलें मिळालीं याचा, हे जीवा, तुला पूर्ण व यथायोग्य अनुभव कळलेलाच आहे.

दुसऱ्या भागांत सांगितल्याप्रमाणें रामा केपिश्वराचे घरीं गेला आणि त्यास बरोबर घेऊन गीरेश्वराकडे परत आला. गीरेश्वरानें त्यास खोलींत एकीकडे नेऊन आपल्या पुत्राविषयीं सर्व हकीकत सांगितली. आणि ह्मणाला, प-

हा, जर करतां तुह्मी त्यास चार गोष्टी सांगून ताळ्यावर आणाल, तर तुमचे उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं. कोपेश्वरानें आपल्या हातून होईल तेवढा प्रयत्न करण्याविषयीं वचन दिलें; आणि तेथून निघाला तो त्या कामिलेच्या घरीं गेला. नीरेश्वर तेथें होताच. त्यानें आपला बाळमित्र फार दिवसांनीं भेटण्याकरितां आला ह्मणून त्याचें चांगलें आगतस्वागत करून येण्याचें कारण विचारिलें. कोपेश्वर ह्मणाला, दादा, तूं का आतां आह्मांस विचारणार? माझें भाग्यच समजायाचें कीं त्वां ओळख तरी दिलीस. आतां तूं मोठा झालास, शिवाय चैनी गडी, मग काय विचारतोस! इतका वेळ बोललास हे तरी तुझे मोठे उपकारच समजले पाहिजेत. याप्रमाणें त्याचें बोलणें ऐकून त्यास फारच वाईट वाटलें. तो कांहीं वेळ स्तब्ध राहिला, आणि नंतर त्यास ह्मणाला, अरे, जे आपण एके ठिकाणीं खेळलों, फिरलों, जेवलों, इत्यादि सहवास केले, त्या मी तुला कसा विसरेन सांग बरें?

को०—अरे, तूं जर पूर्वींचा असतास तर माझ्या तोंडांतून असे शब्द येते काय! नसते खचीतच नसते.

नीरे०—तर मग माझ्यामध्यें कोणता फेरफार झाला तो सांग पाहूं.

को०—मी जर बोललों तर तुला राग येईल; मी नाहींच बोलत. तुला ती ह्मण ठाऊक आहेना "मौन्यं सर्व साधनं."

नी०—अरे, तूं वेडा तर नाहींस ना? मी तर कधींच रागावणार नाहीं, तूंच मात्र रागावशील. कारण तुझी नांवाप्रमाणें करणी. तर सांग पाहूं.

को०—तुझ्यांत फेरफार हाच कीं, पूर्वीं तूं आमच्या घरीं नेहमीं येत होतास. मध्यें मध्यें तुला मित्राचा नाद लागून मदन नांवाचा राजपुत्र आपणाकरतां उत्तम मित्र शोधून काढलास. तो तर आपण स्वतः विषयासक्त झाला एवढेंच नाहीं, तर तुलाही त्यानें तसल्या नादीं लाविलें. मित्र तर चांगला शोधून काढलास! त्यामुळें आपल्या आईबापांस, व्यापारधंद्यास व इष्टमित्रांस सोडून तूं इकडेच निमग्न झालास. अरे, तुला काय ह्मणावें, ज्या आईबापांनीं आपणांस लहानाचा मोठा केला, विद्या शिकविली, ती, तूं कृतघ्न होऊन रंडीबाजी करण्यास काय? हर, हर, हर! त्या बिचाऱ्यांस यामुळें किती वाईट वाटत असेल बरें! तूं जरी आह्मांस सोडलेंस तरी आह्मीं तुला कधीं सोडणार नाहीं. तूं जरी आमच्याकडे न आलास तरी आह्मी तुझ्याकडे येऊंच. मी हा दिवसपर्यंत वाट पाहिली पण तूं आला नाहींस ह्मणून आज मी तुझ्याकडे मुद्दाम आलों आहें. तुला भेटून दोन शब्द बोलावे आणि परत घरीं जावें हाच माझा उद्देश, दुसरा कांहीं नाहीं. पण गड्या, तूं बरा तरी आहेस ना?

नी०—मित्रा, अद्याप पावेतों क्षेम आहें. पण हल्लीं मजबरोबर बोलाचालावयास माझ्या जुन्या खेळगड्यांपैकीं कोणी जवळ नसल्याकारणानें अगदीं चैन नसतें; याकरतां रोज निदान दोन तास तरी मजकडे करमणूक करण्यास येशील तर मोठी मेहरबानी होईल.

को०—(मनांत) हें तर माझ्या पथ्यावर पडलें खरें, पण जरा ओढून तर धरावें.(उघड) अरे, तुह्मी दोघें असतां मी येथें येऊन तुजशीं बोलावें कसें? तशांत तुजसारखा मी थोडाच स्वतंत्र आहें.

नी०-अरे, तूं तर माझी थट्टाच आरंभिलीस. तूं जर माझी थट्टा करणार नाहींस तर काय तुझीं मुलें करणार !

को०-वाः तूं आपली थट्टाच समजतोस, पण खरोखर ही कांहीं थट्टा नव्हे.

नी०-तें कांहीं असो. तुला तर आलेंच पाहिजे.

को०-जर तुझा आग्रह असेल तर मग कसेंही करून मला आलेंच पाहिजे. बरें आतां निरोप घेतों.

नी०-अरे, आला नाहींस तोंच निरोप !

को०-मला आज बावानें ( बापानें ) दुकानांत जाऊन कांहीं ग्रंथ व पुस्तकें आणण्यास सांगितलें आहे, ह्मणून बोललों, नाहीं तर तुजप्रमाणें माझी वाट पहाणारी दुसरी कोणी नाहीं.

याप्रमाणें त्याचा निरोप घेऊन कोपेश्वर घरीं गेला. घरीं गेल्यानंतर तो आपल्या मनांत विचार करूं लागला कीं, जी स्त्री एकदां बहकली तिचा व्यवहार शुद्ध असण्याचा बहुधा संभव नसतो. त्याचप्रमाणें या कामिलेचा आचार कशावरून बरें नसेल ? हिचें नीरेश्वराकडे शुद्धांतःकरण आहे किंवा नाहीं हें पहिल्यानें पाहिलें पाहिजे; त्यांच्या प्रीतींत अंतर येण्याजोगा कांहीं प्रकार आढळल्यास आपणांस यांचा विजोड करण्यास फार प्रयास पडणार नाहींत. असा विचार करून एके दिवशीं संध्याकाळीं मुद्दाम त्याच रस्त्यानें जात असतां एक उमदा पुरुष डोक्यास मंदील बांधलेला, आंगांत भरजरी पोषाख, आणि हातांत काठी फिरवीत फिरवीत त्याच्या जवळून लवकर लवकर जात असतां त्यानें पाहिला. हा पुरुष इतक्या घाईनें कोठें जातो हें पहावें, असा बेत करून कोपेश्वर त्याचे पाठोपाठ जरा

सावकाश जाऊं लागला. हा मंजरीच्या मोहपाशांत पड-णारा मदन होता. त्याणें नीरेश्वराच्या पाठीमागें लाग साधून कामिलेचें मन आपणावर प्रसन्न करून घेतलें, व नीरेश्वर घरांत नसण्याचे वेळेस तो तिजकडे जात असे. याप्रमाणें पुष्कळ दिवस चाललें होतें; तरी याविषयीं कोणास कांहीं ठाऊक नव्हतें. कोपेश्वरानें त्यास तिजकडे जातांना पाहून सर्व जाणलें, व या दोघांच्या प्रितींत अंतर पाडण्यास ही एक बरीच गोष्ट आपणास अनुकूळ झाली ह्मणून तो आनंद मानूं लागला. कोपेश्वर दोन तीन वेळां त्याची खरी प्रचीति पहाण्याकरितां तिच्या घरांत नीरेश्वर नसण्याचे वेळेस त्या रस्त्यानें आला व त्या त्या वेळेस मदनही त्यास तेथें आलेला आढळला. याप्रमाणें कामिलेच्या प्रीतीविषयीं त्याची खात्री झाल्यावर, आतां हा प्रकार आपला मित्र जो नीरेश्वर यास कळवावा ह्मणजे सहजच यांचा विजोड होईल असा विचार करून दुसरे दिवशीं कोपेश्वर नीरेश्वराबरोबर फिरण्यास गेला असतां बोलतां बोलतां स्त्रियांविषयीं या दोघांचा संवाद चालला. नीरेश्वर ह्मणाला, मित्रा, स्त्रीजात ही पुरुषास फारच मोहक असून एक वेळ जर त्यांची खरी प्रीति आपणावर बसली तर त्यांस अंतर देणें हें दोषास्पद होय. त्याचप्रमाणें या प्रिय कामिलेचीही मजवर अत्यंत प्रीति पाहून माझ्यानें तिला बिलकूल अंतर देववत नाहीं. अहाहा! काय तें तिचें सुहास्य मुखकमल! पाहिल्याबरोबर मनास आल्हाद वाटल्यावांचून रहात नाहीं. बोलणें तरी किती मंजुळ, केवळ मैनाच जशी! अशी ती सर्व गुणांनीं निपुण असून मजवर तिचें खरोखरच प्रेम आहे यांत संशय नाहीं. हें ऐकून

कोपेश्वर ह्मणाला, बा नीरेश्वरा, तुलां ही सर्व भूल पडली आहे. कामानें अंध झाल्याकारणानें तुला सर्व नीट भासत आहे. अरे, ह्या स्त्रियांची जात मूळचीच कपटी होय. जो पुरुष त्यांजवर विश्वास ठेवून त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें चालतो तो खरोखर ह्या व्यवहारांत उपहासास पात्र होतो. ही स्त्री जर चांगल्या स्वभावाची असती तर आपल्या मृत पतीच्या पश्चात् तुजवर प्रेम करतीच ना; कारण ज्या साध्वी आहेत त्या आपल्या लग्नाच्या पतीवांचून इतर पुरुष भावाप्रमाणें मानतात. तुला वर वर प्रेम दाखवून तुझ्या पश्चात् दुसऱ्यावरोबर रत होण्यास ही कामिला कधींही चुकावयाची नाहीं. स्त्रिया जें गोड बोलतात त्यांत नेहमीं कांहीं तरी कपट आहे असें समजावें. हें भाषण ऐकून नीरेश्वरास मोठा क्रोध आला. तो रागानें लाल होऊन मोठ्या संतापानें कोपेश्वरास ह्मणाला, अरे, तूं ही काय बडबड करतोस ! जी मजवर इतकें प्रेम करत्ये ती मजशिवाय परपुरुषाशीं रत कशी बरें होईल? तर ह्याची प्रचीति दाखवीपर्यंत तुझें तोंड देखील पहाण्यास मी इच्छीत नाहीं. जीस मजवांचून एक क्षणभर सुद्धां करमत नाहीं, तिच्या हातून असें कदापि घडावयाचें नाहीं. कोपेश्वर ह्मणाला, नीरेश्वरा, "हातच्या कांकणास आरसा कशास पाहिजे," याची प्रचीति पहाण्यास लांब जाणें नको. उद्यां सायंकाळीं तूं नेहमींप्रमाणें फिरावयास जाण्याचे निमित्तानें बाहेर पड, आणि फिरण्यास न जातां आपण दोघेजण तिच्या घराच्या समोरच्या झाडावर लपून बसूं. मग तुझ्या दृष्टीस काय चमत्कार पडतो तो पहा.

याप्रमाणें त्यांनीं बेत करून दुसरे दिवशीं सायंकाळीं ते दोघेही झाडावर लपून बसले. सुमारें पाव घटिकेनंतर मदन

नित्याप्रमाणें नीरेश्वर फिरावयास गेला असें समजून कामिलेच्या घरीं गेलेला त्यांनीं पाहिला. त्याला पहातांच नीरेश्वरास मोठा आचंबा वाटला. तो मनांत ह्मणाला, हा आपला मित्र असून मला इतके दिवस भेटण्याचें देखील याचे मनांत न येतां उलट ज्या स्त्रीस मीं विवाहित स्त्रीप्रमाणें ठेविलें तिजवर यानें दुष्ट नजर ठेवून मित्राबरोबर कृत्रिम करणें हें त्यास किती बरें अयोग्य? अशास योग्य शासन झाल्याविना राहणार नाहींच; परंतु आतां याचा पुरा शोध करावा हें चागलें. असा विचार करून त्यानें कोपेश्वरास याविषयीं मसलत विचारली. कोपेश्वर ह्मणाला, मित्रा, ज्या अर्थीं त्वां मदनास वर जातांना पाहिलेंस त्या अर्थीं त्याच्या दुष्टकृत्याविषयीं संशय ह्मणून राहिला नाहीं, व तेंही तुला पाहणें असल्यास दृष्टीस पडेल; मात्र असें कृत्य करणारास फिरून जिवंत पहाणें हें तुजसारख्या वीरास शोभत नाहीं असें मला वाटतें. हें त्याचें बोलणें ऐकल्याबरोबर त्याच्या आंगाचा अगदीं तिळपापड होऊन गेला. त्याणें कोपेश्वरास परत जाण्यास सांगून आपण एकटाच स्वतःचे घरीं जाऊन प्रवाशी पोशाख केला व कमरेस एक तरवार लटकावून बाहेर पडला, तो थेट कामिलेच्या घरांत मागच्या दरवाज्यानें शिरून माळ्यावर चढून एकदम खोलींत आला, व पहातो तों काय विचारावें—कामिला व मदन हीं अगदीं ऐन रंगांत आलीं असून एकमेकांस आलिंगन देत आहेत, तोंच नीरेश्वरानें जाऊन मदनास धरिलें, आणि रागाच्या आवेशांत एकदम आपल्या कमरेंतील तरवारीनें त्याचे दोन तुकडे केले. मदनाच्या रक्तानें तरवार भिजलेली पाहून त्यास अतिशयच चेव चढून त्याच तरवा-

रीनें, कामिलेकडे वळून, तीसही त्यानें मदनाच्या मागोमाग यमसदनीं पाठविलें. हें भयंकर कृत्य पाहून लोभ्या ह्मणून त्याचा एक अत्यंत प्रीतींतला चाकर होता, त्यानें नीरेश्वराचे दोन्ही हात दोरीच्या फांसानें अडकावून त्याची तरवार हिसकून घेतली आणि त्यासह आपण एका गाडींत बसून घोर अरण्याचा मार्ग धरिला. इकडे असे खून झालेले पाहून लोकांनीं ठाणेदारास कळविलें. ठाणेदार आपल्या शिपायांसह येऊन पहातो तों एक पुरुषाचें व एक स्त्रीचें अशीं दोन प्रेतें पडलेलीं आहेत. त्यांचीं शरीरें तरवारीचे घावांनीं छिन्नभिन्न होऊन रक्तानें भरलीं आहेत. परंतु खुनी मनुष्य कोठें मिळेना. त्यानें तेथील कित्येकांस धमकावून विचारलें, परंतु सर्वच याविषयीं आपणांस बिलकूल माहीत नाहीं ह्मणून ह्मणूं लागले. तेव्हां तो इकडे तिकडे बारीक चौकशी करूं लागला. इतक्यांत कोपेश्वर कसली गडबड आहे ती पहाण्याकरितां तेथें आला, व तीं प्रेतें पाहून मनांत चरकला; आणि आल्या मार्गानें पळत सुटला. कोपेश्वरास पळतांना पाहतांच ठाणेदारास त्याजविषयीं संशय येऊन त्याणें त्यास आपल्या शिपायांकरवीं पकडविलें, आणि त्यास व कामिलेच्या चाकरास कैद करून तीं दोन्हीं प्रेतें एका मेण्यांत घालून शहरच्या चावडीवर पाठविलीं. कांहीं वेळानें ठाणेदारही चौकीवर गेला. ती वेळ रात्रीची असल्याकारणानें त्यानें त्यांजवर चांगले हुशार पाहरेकरी ठेवून आपण त्या झालेल्या हकीकतीची कच्ची नक्कल करण्यास माडीवर गेला. नंतर त्यानें त्या दोघां कैद्यांस वर बोलावून त्या खुनाविषयीं तुह्मांस काय माहिती आहे ह्मणून विचारलें. पहिल्यानें कामिलेच्या चाकरानें सांगण्यास आरंभ केला. तो ह्मणाला,

सरकार, मी जातीचा मराठा, माझें नांव सोनू; मी आज पांच वर्षे ह्या बाईसाहेबांजवळ चाकरीस आहें. ह्यांची एक म्हातारी आंधळी सासू मात्र आहे. नवरा मरून बरींच वर्षे झालीं. सुमारें एक वर्षांपासून ह्या बाई भर तारूण्यांत आल्यामुळें ह्यांची बुद्धि चंचळ झाली होती. त्यांनीं नीरेश्वर नांवाच्या एका सावकारपुत्राबरोबर आज आठ महिने सख्य केलें होतें. बाईसाहेब रूपानें सुंदर असल्याकारणानें ज्या पुरूषाचें प्रेत तुह्मी पाहतां, त्या पुरुषाचेंही प्रेम तिजवर जडलें. तो एका बाहेरील देशचा राजपुत्र आहे. त्याचें नांव मदन होय. मदन सावकारपुत्रास चोरून येत असे. आज संध्याकाळीं तो सावकारपुत्र लवकरच बाहेर गेला होता; आणि नंतर सुमारें अर्ध्या तासानें मी माझें घरकाम आटोपून बाहेर गेलों. मजबरोबरचा दुसरा कैदी हा हल्लींच सुमारें एक महिन्यापासून त्या सावकारपुत्राचा समाचार घेण्याकरितां कधीं कधीं येत असे; व हा माझा बाळमित्र आहे असें वारंवार बोलतांना मीं त्या सावकारपुत्रास पुष्कळ वेळां ऐकलें आहे. या शिवाय मला दुसरें कांहीं माहीत नाहीं. कारण हा खून ज्यावेळीं झाला त्यावेळीं मी घरांत नव्हतों. कामिलेच्या चाकराची जबानी झाल्यावर ठाणेदारानें कैदी नंबर २ कोपेश्वर यास त्याविषयीं काय माहिती आहे ह्मणून विचारलें. कोपेश्वर ह्मणाला, महाराज, मी जातीचा क्षेत्रिय आहें. माझें नांव कोपेश्वर. नीरेश्वर सावकारपुत्राची व माझी शाळेंतील मैत्री. मी त्यास भेटण्याकरितां कधीं कधीं ह्या कामिलेच्या घरीं येत असें. ज्या स्त्रीचें हें प्रेत पडलेलें आहे ती कामिलाच होय. दुसऱ्या प्रेतास मी ओळखत नाहीं, व हे खून कोणी केले हें मला ठाऊक नाहीं. गडबड

झालेली ऐकून मी पाहण्यास आलों व हीं प्रेतें माझ्यानें पहावेनात ह्मणून लवकर लवकर घरीं जात असतां मला निरपराधी कैद केलें.

ठाणेदार-बरें तर, तुझा मित्र नीरेश्वर आतां कोठें आहे हें तुझ्यानें सांगवेल काय ?

कोपेश्वर-नाहीं सरकार, आतां तो कोठें आहे हें मला माहीत नाहीं.

ठाणे०-(धमकी देऊन) तुला सर्व कांहीं माहीत आहे पण तूं सांगत नाहींस याबद्दल तुला कैद केला आहे. उद्यां सरकाराजवळ निवाडा होईल तेव्हां कळेल.

याप्रमाणें ठाणेदारानें त्यांस दम देऊन दोघांसही परत चौकींत ठेवलें; आणि त्या दोघांच्या जबान्यांचा खरडा करून त्यावर आपला अनुमोदनाचा शेरा ( रपोट ) लिहून तो न्यायाधिशाकडे नेण्यास तयार ठेविला.

दुसरे दिवशीं सदर अदालतींत, ह्मणजे मुख्य न्याय इनसाफ होण्याचे ठिकाणीं, ते दोघे कैदी व तो प्रेतांचा मेणा घेऊन ठाणेदार न्यायाधिशाकडे गेला. त्यावेळीं दरबारचा दिवाणखाना मोठमोठे मानकरी, सरदार, अमलदार व ग्रामस्थ वगैरे लोकांनीं भरून गेला होता. सर्वांत उच्च स्थलावर एक सुशोभित सिंहासन असून त्यावर खुद्द राजेसाहेबांची स्वारी एका हातांत दंड व दुसरे हातांत तरवार घेऊन विराजमान झालेली होती. उजवेकडे प्रधान व डावे बाजूस सेनापति बसले होते. त्यांचे पुढें जरा सखोल व वांकणदार अशी एक आगाशीसारखी संगमरवरी दगडाची कमान असून त्याच्या खालीं न्यायासनावर न्यायाधिशांची स्वारी बसली होती. त्याच्या बाजूस एक

दुभाषी उभा होता. समोर कैदी लोकांस उभें रहाण्याकरितां एक निराळीच जागा होती, त्यांत कामिलेच्या चाकरास व कोपेश्वरास आणून उभें केलें होतें. त्यांचे शेजारीं फिर्यादी व साक्षीदार लोकांकरितां एक वाटोळी लांकडाच्या कठड्याची जागा केलेली होती, त्यांत ठाणेदार आपले रपोटासह फिर्यादीकरितां न्यायाधिशा समोर उभा राहिला होता. गीरेश्वर सावकार, मदन राजपुत्राबरोबर आलेले सरदार, व दुसरे मानकरी लोक आजुबाजूस बसले होते. शहरांतील कित्येक प्रेक्षक लोक याचा कसा न्याय होतो तो पहाण्याकरितां उभे राहिले होते. मधून मधून लोकांस चूप रहाण्याविषयीं शिपाई दम देत होते. याप्रमाणें न्याय सदर अगदीं भरगच्च भरून गेली होती. सर्वांचे डोळे या खटल्याचा काय निवाडा होतो तें पहाण्याकडे लागले होते. जिकडे तिकडे लोक चूप झाले तेव्हां ठाणेदारानें रपोट न्यायाधिशापुढें ठेवून आपली जबानी देण्यास आरंभ केला. तो ह्मणाला,-काल रात्रीं नऊ वाजण्याच्या सुमारास गस्त चालीत रस्त्यानें जात असतां, कामिलाबाईच्या घरांत कांहीं गडबड चाललेली ऐकूं आली, ह्मणून तिच्या घरांत गेलों आणि पहातों तों त्या बाईचें व दुसऱ्या एका पुरुषाचें अशीं दोन प्रेतें रक्तानें भरून अगदीं छिन्नभिन्न पडलीं आहेत; जवळ दुसऱ्या वाटसरूंची फार गर्दी होती परंतु खुनी मनुष्य त्यांत कोठें दिसला नाहीं. तो मी जाण्याचे पूर्वीच पळाला असावा असा अदमास आहे. तिचा चाकर व कोपेश्वर नांवाचा दुसरा एक मनुष्य अशा दोघांस संशयावरून कैद करून आणलें आहे; व त्यांच्या जबान्या माझ्या रपोटा सोबत लिहिल्या

आहेत. यावर सरकारांतून जो हुकूम होईल तो बजावण्यांत येईल. न्यायाधिशानें ठाणेदाराची जबानी ऐकून व कैद्यांची लिहिलेली जबानी तपासून ठाणेदारास प्रश्न केला.

न्यायाधीश—ठाणेदार, तीं प्रेतें कोठें आहेत ?

ठाणेदार—जी सरकार, तीं मेण्यांत घालून एथें आणलीं आहेत.

न्या०—तो मेणा एथें मध्यभागीं आणून, महाराजांस व सर्व लोकांस दाखवा.

( ठाणेदार तो मेणा मध्यभागीं आणून पडदा उघडून महाराजांस व सर्व सरदार, मानकरी वगैरे लोकांस दाखवितो, व लोक तीं प्रेतें पाहून डोळ्यांतून आसवें गाळून हळहळूं लागतात. )

न्या०—बरें, ठाणेदार, तुह्मीं ह्यांचा दुसऱ्यानें खून केला असें कशावरून ह्मणतां? यांनींच अपापसांत मारून कशावरून घेतलें नसेल ?

ठा०—सरकार, पुरुषाचे प्रेताचे दोन तुकडे झालेले आहेत, त्यावरून असें सिद्ध होतें कीं त्यास स्वत: आपले दोन तुकडे करतां येणार नाहींत किंवा कोणत्याही स्त्रीच्यानें अशी तरवार चालवणार नाहीं. तशांत त्या स्त्रीचेही साधारण तसेच हाल केले आहेत व तेथें तरवारही नाहीं यावरून असें खास सिद्ध होतें कीं, खून करणारा कोणी तरी दुसरा असावा.

न्या०—त्या खुनी मनुष्याचा तुह्मी पुरा शोध कां केला नाहीं ? खुनी आपल्या राज्यांतून पळून जावा हें तुह्मांस दूषणीय नव्हे काय ?

ठा०—तेथें अतिशय गर्दी व रात्रीची वेळ अस-

त्याकारणानें शोध लागला नाहीं, तरी दोन शिपाई फक्त त्याचेच शोधाकरितां पाठविले आहेत.

न्या०-बरें, ते दोघे कैदी आणलेले कोठें आहेत?

ठा०-सरकार, त्यांस आपल्या समोरच उभें केलें आहे. त्यांत नं. १ ला हा कैदी कामिलेचा चाकर आणि नं. २ रा हा कोपेश्वर.

(न्यायाधिशाचा शिपाई नं. १ ला कैदी कोठें आहे ह्मणून पुकारतो आणि ठाणेदाराचे शिपाई त्यास कठड्यांत उभे करतात.)

न्या०-तुझें नांव काय ?

कै०-जी सरकार, माझें नांव सोनू.

न्या०-ठाणेदारानें लिहिलेल्या तुझ्या एकंदरीच्या जबानीवरून असें दिसतें कीं तुला याविषयीं बहुतेक माहिती आहे.

कै०-खून करतांना मी पाहिलें नाहीं सरकार.

न्या०-तरी तो अमक्यानें केला, असा वहीम तुझा कोणावर तरी असेलच.

कै०- माझ्यानें खात्रीनें सांगवत नाहीं.

न्या०-पहा, तूं या खटल्यांत गुन्हेगार नाहींस असें स्पष्ट दिसतें तरी न्यायाचे कामांत जें आपणास खरें ठाऊक असेल तेंच सांगावें, नाहीं तर दडवादडवी केल्यास दुप्पट गुन्हा होतो समजलास ? तर खरें सांग, तुझा वहीम कोणावर आहे ?

कै०-सरकार, मला नीरेश्वराचा वहीम येतो, तो कालपासून कोठें दिसत नाहीं.

न्या०-त्याचा वहीम येण्यास कांहीं कारण दाखवशील काय?

न्या०–होय सरकार. आज सुमारें आठ दिवस नीरेश्वराचें चित्त स्थिर नव्हतें व तो भलभलतेवेळेस घरीं एकदम येत असे, यावरून त्याचा हेतु या खून केलेल्या मनुष्यास पकडण्याचा होता असें दिसतें.

न्या०–तुला नीरेश्वराची व या मयत पुरुषाची मैत्री असल्याबद्दल कांहीं ठाऊक आहे काय ?

कै०–नाहीं सरकार, पण मजबरोबरच्या दुसऱ्या कैद्यास माहीत असेल, कारण हा हल्लीं नीरेश्वरास भेटण्यास वरचेवर येई. ( कोपेश्वर संतापून मोठ्यानें ह्मणाला कीं तुला माझें नांव घेण्याचें काय काम ! तूं आपल्याविषयीं पाहिजे तें सांग. )

न्या०–ठाणेदार, हा दुसरा कैदी फार फाजील दिसतो तर यास मर्यादेनें रहाण्यास सांगा. नाहींपेक्षां न्याय सदरेची बेअदबी केल्याचा गुन्हा त्याजवर लागू होईल.

न्या०–बरें, सोनू, खून झाल्यावर तूं किती वेळानें त्या जागीं आलास ?

कै०–सरकार, ठाणेदार आणि मी संगतींच त्या ठिकाणीं पोंहचलों. खून केव्हां झाला हें मला ठाऊक नाहीं.

( न्यायाधिशाचा शिपाई कैदी नं. २ कोठें आहे ह्मणून पुकारतो, आणि ठाणेदाराचे शिपाई त्यास न्यायसभेच्या कठड्यांत उभा करतात. )

न्या०–तुझें नांव काय ?

कै०–सरकार, मला कोपेश्वर ह्मणतात.

न्या०–तूं काय धंदा करतोस ?

को०–मी व्यापार करून आपलें पोट भरीत असतों.

न्या०–तुला या खटल्याविषयीं कांहीं माहिती आहे काय?

को०–याबद्दल मला कसली माहिती असणार ? ( रागावून ) सरकार, मला या शिपायांनीं उगीच धरून माझी अब्रू घेतली.

दुभाषी–तुला सरकारानें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर मात्र दे. आणि मग, तुझी जी कांहीं फिर्याद असेल ती सरकारांत जाहीर कर.

न्या०–तूं नीरेश्वरास ओळखतोस काय ? आणि तो कोणाचा मुलगा ?

को०–होय सरकार, तो माझा बाळमित्र; आणि त्याच्या बापाचें नांव गीरेश्वर.

न्या०–बरें, तूं या मेलेल्या मनुष्यास ओळखतोस काय?

को०–नाहीं सरकार, ऐकून मात्र ठाऊक होतें कीं हा मदन राजपुत्र.

न्या०–तुला या खटल्यांत कांहीं माहीत नाहीं तर तूं पळत कां होतास ?

को०–माझ्यानें तीं प्रेतें पाहवेनात व उगीच मज गरीबावर संशय घेतील ह्मणून पळत होतों सरकार.

न्या०–मला वाटतें, तुझा या कामांत संबंध असावा. तरी तूं खरें सांग. या मदनास मारण्याबद्दल तुजजवळ नीरेश्वरानें कधीं तरी गोष्ट काढली होती कीं नाहीं ?

को०–नाहीं सरकार. मदन हा तिजकडे येतो हें त्यास माहीत झाल्यापासून तो रागांत मात्र नेहमीं असे.

न्या०–मदन येतो, हें त्यास कसें कळलें ? तूंच सांगितलेंस कीं नाहीं ?

को०–नाहीं सरकार, मी त्यास सांगितलें नाहीं. त्यास कसें कळलें कोण जाणें.

न्यायाधीश तेथील सभासदांकडे व प्रमुख मंडळीकडे वळून ह्मणाला कीं, या साक्षीपासून कांहीं विशेष निपजेल असें वाटत नाहीं; तरी त्यांत हा होता किंवा नव्हता एवढेंच सिद्ध करणें आहे तें आणखी एकदा उलट तपासणी केली ह्मणजे कळेल.

न्या०—कोपेश्वरा, काल संध्याकाळीं तूं कोठें होतास ?

को०-चौकबाजारांत कापसाचा भाव करण्यास गेलों होतों.

न्या०—ठाणेदार, तुह्मी यास पहिल्यानें येतांना पाहिला तो कोठल्या रस्त्यानें येत होता ?

ठा०—होय सरकार, तो बाजारच्या रस्त्यानें आला.

न्या०—नीरेश्वराचा, त्याचे बापाचे घरीं व दुसरे ठिकाणीं शोध केलात काय ?

ठा०—होय सरकार, तो कोठें या शहरांतच नाहीं.

न्यायाधिशानें एवढेच प्रश्न विचारून त्यांच्या लिहून घेतलेल्या जबान्यांचे कागद इकडून तिकडे चाळून याजवर आपला काय अभिप्राय द्यावा याचा विचार करूं लागला. व शेवटीं सर्व खटला बरोबर ध्यानांत घेऊन त्यानें पुढें लिहिल्याप्रमाणें त्याचा निवाडा दिला.

तो ह्मणाला, या दोघां कैद्यांचे जबानीवरून एवढें स्पष्ट दिसून येतें कीं हा खून गीरेश्वराचा मुलगा नीरेश्वर यावांचून झाला नाहीं, आणि ज्या अर्थीं तो या शहरांत सांपडत नाहीं त्या अर्थीं तो पळून गेला असावा आणि ह्मणूनच कायद्याप्रमाणें तो खुनी ठरून त्याजवर खुनाचा गुन्हा शाबीत होतो. तर महाराजांनीं ठाणेदारास शिपायांची मदत देऊन तो जेथें गेला असेल तेथून त्यास पकडून आणण्यास हुकूम द्यावा व त्याबद्दल कांहीं बक्षीसही देण्याचें करावें.

आतां कैदी नं. १ ला, कामिलेचा चाकर सोनू, हा ह्या गोष्टींत जरी निरपराधी आहे तरी धन्याची चाकरी करण्यास नालायक ठरतो, कारण त्यास याविषयीं संशय असतांना तो स्वामीभक्तींत तत्पर राहिला नाहीं. तरी त्यास अत:पर सावध रहाण्यास बजावून सांगून सोडून द्यावें.

कैदी नं. २ रा, व्यापारी कोपेश्वर, ह्यास या खटल्यांत कांहीं तरी माहिती असावी असा संशय येतो तरी त्याजवर न्यायसभेस जसा पुरावा पाहिजे तसा नसल्यानें त्याजविषयीं जास्त चौकशी करवत नाहीं. हा स्वभावानें शीघ्रकोपी दिसतो व त्यामुळें त्यानें न्यायसभेची एकदां बेअदबी केली, याबद्दल त्याजजवळून पांच रुपये दंड घ्यावा व तीन दिवस कैदेंत ठेवून, पुनः त्यास तसें न करण्याविषयीं ताकीद देऊन सोडून द्यावें.

हुजूरास आणलेला प्रेतांचा मेणा याबद्दल मी महाराजांस सुचवितों कीं हें प्रेत राजपुत्राचें असल्याकारणानें कामिलेसह त्या प्रेतास राजसन्मानानें स्मशानांत नेऊन मोठ्या समारंभानें पुरावें व वरती समाधी बांधून त्यावर एक संगमरवरी दगडाची शिळा बसवून वर, " जे कोणी परस्त्रीचे नादीं लागतात त्यांस अशी शिक्षा भोगावी लागते, " असा लेख लिहावा; आणि त्याचे सरदार, मानकरी लोकांस समजावून त्यांची माफी मागावी.

न्यायाधिशाचें असें बोलणें ऐकून राजास फार वाईट वाटलें, तरी न्यायाचे कामांत सर्व सारखे मानले पाहिजेत असें जाणून तो सिंहासनावरून उठून सर्व लोकांस ऐकूं येईल एवढ्या मोठ्यानें बोलूं लागलाः-" हे सर्व सभासद, सरदार, मानकरी वगैरे लोकहो, आज ज्या खटल्याचा

न्याय ह्या न्यायसभेंत झाला, त्याप्रमाणें खटला आपल्या राज्यांत कधींही न होवो. पहा, गीरेश्वराचा एकुलता एक पुत्र जो नीरेश्वर त्यानें कामाच्या व क्रोधाच्या आधीन हो-ऊन अंधपणानें असें वाईट कृत्य करून आपल्या व आपल्या बापाच्या कीर्तीस बट्टा लाविला. मीही त्यास पुत्राप्रमाणें मानीत होतों, तरी न्यायास ज्या अर्थी सर्व सारखे त्या अर्थी न्यायाधिशाच्या ह्मणण्यास मला रुकार देणें भाग आहे. आतां त्याच्या वृद्ध पित्यास जरी महत् दुःख होणार आहे तरी त्यानें ईश्वरावर पूर्ण भरंवसा ठेवून स्वस्थ बसावें, हें बरें. कारण त्या जगदीश्वराचा त्यास अशी बुद्धि देण्याचा काय हेतु असेल हें आपणासारखे तुच्छ मानवी प्राणी जाणूं शकत नाहींत.

आतां ठाणेदारानें प्रत्येक दिशेस त्यास लागतील तितके हुशार शिपाई नीरेश्वरास शोधण्यास पाठवावे.

पहिल्या नंबरचा कैदी–कामिलेचा चाकर सोनू–यानें इतःपर स्वामिभक्तींत सावध असावें; नाहीं तर त्यास शिक्षा दिली जाईल.

दुसऱ्या नंबरचा कैदी–कोपेश्वर–यास पांच रुपये दंड मंजूर करून आणखी ३ दिवसांची कैदही बहाल केली आहे.

चला आतां, कचेरी बरखास्त करून कारभाऱ्यास तीं प्रेतें स्मशानांत नेण्यासाठीं राजमानास योग्य अशी तयारी करण्यास सांगा. आणि इतःपर सर्व लोकांनीं हें उदाहरण ध्यानांत ठेवून काम, क्रोध, यांच्या स्वाधीन न व्हावें, एवढी माझी सूचना आहे.

( कचेरी बरखास्त होते व सर्व लोक त्या प्रेतांच्या पाठीमागून हळहळत जातात. )

# भाग पांचवा.

( सदबा आणि ह्मादबा रस्त्यानें जातांना एकमेकांस भेटतात व गोष्टी करतात. )

सदबा–राम राम ह्मादबा, तुह्मासनी आलिकड लई काम लागलया!!

ह्मादबा–काय बिव्या, कसल काम लागलया, उगाच भरमाचा भोपळा. आपल शेत हाई, आन् त्याचच काम चाललया. आपला हा जन्माचा धंदाच हाय की.

सदबा–ह्मादबा, आर ह्ये तर खरच हाई, पन गड्या तुला मी एक गोष्ट इच्यारतुया, तुह्मासनी हाईत आसलच.

ह्मादबा–आर व्हई, आपल्या गावामंदी आठ दिसावर दंवडी आयकली व्हती, योक राजपुतर आनी योक त्याची रांड या दोघांस्नी ठार मारूनशेनी कोनी योक मनुक्ष पळून गेला हाई, आन् त्या मनुक्षास जो धरून दिल त्यास आपल राज सरकार पाच विसा रूपय यीनाम द्येनार हाईत.

सदबा–आर बिव्या, गावामंदी सीपाई न् प्याद इतक मायंदळ फिरत्याति, त्यांच्या हातासनी तो गवसना, मंग आपनासारख्या गरिबाच हाती तो लागतुया? आर तो गडीबी लय खंभीर असल न्.

ह्मादबा–सदबा, आपनासनी काय करायच हाई? जाऊं द्या की!

सदबा–काय आपुन ह्यांदाड शिपायावानी माग सरायच! यू तिच्या भैन!!

ह्मादबा–छे अस काय व! माजा बी इरादा त्योच हैन्.

सद्‌बा–अस राव दंड थोपटूनशानि झोर व्हा की, अता मातर आपला इच्यार बेगुनशेनि चालू द्या.

ह्मादुबा–इच्यार इच्यार तो कसला र! आपुन शेतामंदी जायासनी लागल की बेच्या रानामंदी होऊनशी हुडकाव, आन जर का त्यो रांडल्योक गवसला तर मंग आपल्या कारभारनीच नशीबच ह्मनायच.

सदबा–व्हय, त्ये खर राव, पुन माजा योक इच्यार हाई त्यो गड्या मला तर लय ग्वाड दिसतोया. आपना दोघामंदी कोनासनी त्यो खुनी रांडल्योक गवसलिया तर पांच विसा रूपया अपनामंदी सारख वांटूनशेनी घेयाच, ह्मज दोन विसा आन धा. योक योकाचे भागीस येत्याल, नी आपना दोघांच्या कारभारनी खुसनी खुस!

ह्मादुबा–हाथीच, एवढच कीर, लय–लय–ग्वाड इच्यार, पर सदबा, तुमच बोलन जनूं आक्षी खडीसाकरच्या खड्यावानी गुळच्याट पघा.

सदुबा–बर ह्मादबा, त्यो दोन इसा आन धा रूपाय घेऊनश्यानि कारभारनीस काय करशीलर!

ह्मादुबा–आर बेच्या, ए तूं इच्यारायास नगच; माज्या कारभारनीस मंग गोट, न् पुतळ्याची माळ न् मोती, न् काळी चंदरकळा, योक लय उचा चोलीचा खन घेऊनशी देईन, आन मग जनु ती इंदरची अपेसरा दिसल ह्मज मी राजावानी तिच्या पायासनी पाय लावून बसन!

सदुबा–लय ग्वाड ह्मादबा, अर पन त्यो पघ कोन पळतुया, आर त्यो आपल्या सरकारचा चोर न् काय? पळ–हान–मारूं नुको हो पन, त्यास बांधूनशेनी घेऊन जायाच.

[ दोघेही जण, नीरश्वर समजून धांव मारतात, आणि दुसराच गृहस्थ पाहून चपापतात. ]

सदबा—कायर ह्यादबा, गड्या आज आपल तर वारा वाजल होत!

ह्यादबा—तरी मी म्हुतल, अगोदर पक्क ओळखूनशान मंग शिकार मार; त्यो तुज आपल घे बोंगडी न् टाक खांद्यावर!

सदबा—देवाच्यान् त्याला पाहूनशी तर माझ क्या-काटच मोडल कीं, आन् त्यो चोर तर ह्या मनुक्षा पक्षी खंद्या गडी असलन्.

ह्यादबा—तूंच कार त्यो कागदी पैलवान माजनी दंड थोपटूनशी बोलवित व्हतास.

सदबा—नग, मला त्ये यीनाम नग, पन गड्या आपन येढोळ इथ बोलत राहलिया, चल घरामंदी, कारभारीन वाट पाहिल कीं.

ह्यादबा—हाथ विच्या. आमासारख्यासनी 'अस चोर गवसून जर यीनाम मिलत तर त्ये शिपाय कशासर पाहिजे व्हत. चल, चल, लय पार दिस आलिया.

( दोघेही घरीं जातात. )

---

## भाग सहावा.

### शिखरिणी.

पराभ्याजी लोभी नरसुमति लोभीगणिं असे ॥
परस्त्रीचा लोभी, खल कुमति लोभी नच असे ॥
बलींद्रा धंदाभी, कलति विविधा भी मनिं वसो ॥
तुझ्या जीवा, लाभीं, समसुमति लाभी मनिं असो ॥

अर्थ—पराच्या संपत्तीला ज्याची मति लोभी झाली तो नर लोभिगणांत गणिलेला आहे; परस्त्रीचा लोभ करणारा

तो दुष्ट व तो दुर्गतीचा लोभी, हें बुधवचन होय; बलि, इंद्र, धृतराष्ट्र इत्यादिकांनीं त्याचें बीज जाणलें, ती भीति तुझ्या मनीं वसो; जीवा, तुझ्या लाभास लाभप्रद अशी समांतर सुमति तुझेठायीं नित्य वसो म्हणजे झालें.

मागें सांगितल्याप्रमाणें लोभ्या चाकर आपल्या धन्यासह गाडींत बसून अरण्यांतून पळत चालला, तो जेथें वाट सांपडेल त्या रस्त्यानें जाऊं लागला. याप्रमाणें त्या दोघांनीं दुसरे दिवसपर्यंत सुमारें पाउणशें कोसांची मजल मारली. घोडे थकले व ह्यांसही श्रम झाले, म्हणून तेथें वाटेस लागलेल्या गांवामध्यें त्यांनीं उतरण्याचा निश्चय केला. नीरेश्वराच्या मनाची स्थिति खून केल्यापासून अगदीं उचंबळून गेली होती. दहा पंधरा कोस मजल मारी तोंपर्यंत त्याच्या आंगांत खुनाचा आवेश होताच, व प्रत्येक वेळीं लोभ्या आपणावर शेवटची पाळी येते कीं काय म्हणून काळजी करीत असे. पण मग हळू हळू त्याचा आवेश शांत होत चालला आणि एकदम दुःखाचे डोंगर आपणावर कोसळल्यासारखें त्यास वाटलें. यावेळेस लोभ्यानें नीरेश्वराच्या हातचे दोर सोडले, कारण तो अगदीं बेशुद्ध होऊन आपण केलेल्या कर्माचा पश्चात्ताप करीत होता. तो मोठ्यानें हंबरडा फोडून, कामिले, मी तुला आतां कोठें पाहूं असें म्हणून रडूं लागला. लोभ्यानें त्यास पुष्कळ समजावून, याप्रमाणें शोक करण्याची ही वेळ नव्हे, व आतां पुढें येणाऱ्या संकटांतून सुटण्याची तजवीज जितकी लौकर होईल तितकी केली पाहिजे, म्हणून सांगितलें. थोड्या वेळानें नीरेश्वर शुद्धीवर आला, आणि येणाऱ्या संकटास पाठ दिली पाहिजे असें समजून त्याप्रमाणें ऐकण्याचें त्यानें कबूल

केलें. ते जें गांव ह्मणून समजले होते तें गांव नसून शहर होतें. शहरांत शिरतांच प्रथम त्यांस एक मोठी धर्मशाळा लागली. शेजारीं लहानसा तलाव होता, तेथें हे दोघेही उतरले. गाडीचे घोडे सोडून त्यांस पाणी वगैरे पाजिलें, आणि नीरेश्वरास धर्मशाळेंत बसण्यास सांगून लोभ्या आपण शहरांत शिधासामुग्री आणावयास गेला. माध्यान्हाचा समय असल्यानें ऊन मोठें कडक पडलें होतें; रस्त्याचे दुतर्फा घरांच्या रांगा लागल्या होत्या; शहरांतून येणारे जाणारे लोक जरा पातळ झाले होते; जिकडे तिकडे पाणपोई असून मजूर लोकांची त्यांवर गर्दी झाली होती; कित्येक सधन लोक आपापलें भोजन आटोपून ओट्यावर आळस देत व झोंप घेत पडले होते; अशा वेळेस लोभ्या त्या शहरच्या बाजारांत जाऊन त्या दिवसापुरती सामुग्री विकत घेऊन परत येत असतां, आडवाटेंत त्यानें एकाएकीं मोठी गर्दी झालेली पाहिली. ही गर्दी कशाची आहे ती पहावी ह्मणून लोभ्या तेथें वळला, तों त्यास असें दिसून आलें कीं एक सरकारी शिपाई हातांत कागद घेऊन सर्व लोकांस मोठ्यानें कांहीं वाचून दाखवीत आहे. गर्दी फार असल्यामुळें पुढें जाऊन लोभ्याच्यानें सर्व बरोबर ऐकवलें नाहीं, ह्मणून त्यानें मागाहून त्या शिपायास त्याचें वाचून झाल्यावर विचारिलें, शिपाईबुवा, ही जी तुह्मी सर्व लोकांस जाहिरात वाचून दाखविली ती कशाची आहे? शिपाई ह्मणाला, बाबा, ह्या शहरांत कोणी एक गवई दूर देशाहून गाण्यामध्यें प्रतिष्ठा मिळवून आला आहे, व त्यास अतिशय गर्व असून आमच्या महाराजांस त्यानें, ह्या "शहरांत कोणी मजबरोबर सामना करणारा असल्यास आणावें, नाहींपेक्षा

वर्षासन देऊन प्रतिष्ठापत्र द्यावें " अशी विनंती केली आहे. ह्मणून आमच्या महाराजांनीं अशी जाहिरात काढली कीं, जो कोणी ह्या गवयास हरवील त्यास चांगली देणगी देऊन नेहमीं राजाश्रयास ठेवलें जाईल. ह्याकरतां मोठा दरबार भरणार आहे व तेथें पाहिजे त्या गवयास येण्याची मोकळीक आहे.

लोभ्यानें हें ऐकल्याबरोबर त्याच्या मनाची स्थिति कांहीं चमत्कारिक होऊन, तो जलदीनें वाट चालत धर्मशाळेंत जाऊन पोंचला. तेथें पोंचल्यावर लोभ्यानें ऐकलेली सर्व हकीकत नीरेश्वरास जाहीर केली. नंतर भोजन वगैरे आटोपून संध्याकाळच्या सुमारास ते दोघेही स्वस्थ झोंपीं गेले.

दुसरे दिवशीं सकाळीं उठून प्रातर्विधी केल्यावर लोभ्या नीरेश्वरास ह्मणूं लागला, दादा, आतां आपण पुढें जाऊन उगीच संकटांत पडावें, त्यापेक्षां जर तुह्मी दरबारांत जाऊन तेथें आपल्या गुणाची परिक्षा द्याल, तर त्यापासून आपले कांहीं तरी कल्याण होईल. कारण माझी तर खात्री आहे कीं, तुमच्यापेक्षां उत्तम गाणारा प्रायः कोणी नसावा. कदाचित् तुह्मी त्यास जिंकलेंत तर राजाश्रय मिळून आपला निर्वाह येथें उत्तम रीतीनें चालेल; नाहीं तर मग दुर्दैव नेईल तिकडे जाणें भागच आहे.

नीरेश्वरास गाणें, वाजवणें लहानपणापासून चांगलें शिकविलें होतें, व तो त्यांत इतका तरबेत होऊन गेला होता कीं त्या कलेंत त्याचा हात धरणारा कोणीही नव्हता. मागील गोष्टीचा पश्चात्ताप होऊन, लोभ्याच्या हुशारीनें आपणावरील एक मोठा प्रसंग टळला ह्मणून त्यानें

ईश्वराचे आभार मानले. आतां आपण स्वदेशापासून बरेच दूर आलों व येथें राहिल्यास मला कोणीही ओळखणार नाहीं, असें समजून त्यानें पुढें जाण्याचा बेत रहित केला व लोभ्यानें जी बातमी सांगितली ती खरी असल्यास आपणही तिकडे जाऊन गाणाऱ्या उमेदवारांत आपलें नांव द्यावें, मग जें होणार तें होवो, असा विचार करून तो लोभ्यास बरोबर घेऊन राजदरबारांत गेला, आणि तेथील कारकुनाची भेट घेऊन माझें नांव गाणाऱ्या उमेदवारांमध्यें घाला ह्मणून सांगितलें.

यावेळेस राजानें मोठा दरबार भरवून सर्व तयारी केली होती. मोठमोठे श्रीमान लोक ही गम्मत पहाण्याकरतां तेथें आले होते. नीरेश्वर येण्याच्या अगोदर दोन तास राजाच्या उत्तम गवयांपैकीं तीन गवयांची परीक्षा होऊन ते त्या नव्या गवयानें नापसंत केले होते; तेणेंकरून राजाची मुखचर्या कांहींशी रागीट व कांहींशी हिरमोड झाल्याप्रमाणें दिसत होती. हें शहर गायनकलेमध्यें नावाजलेलें असून आज या शहराचें नांव बुडतें ह्मणून राजा अतिशय चिंतातुर होऊन उगाच बसला होता. वरील तीन गवयांची स्थिति पाहून बाकीच्या गवयांचा धीर खचला, आणि जिकडे तिकडे सामसूम दिसूं लागलें. इतक्यांत एकाएकीं एका शिपायानें येऊन राजास वर्दी दिली कीं, महाराज, आपल्या रयतेपैकीं एका उमद्या ज्वानानें नुकतेंच गवयांच्या पटांत नांव दाखल केलें आहे; त्यास कारकून साहेबांचें असें ह्मणणें आहे कीं आपली आज्ञा झाल्यास त्याला पाठवितों. राजानें मनांत विचार केला कीं आपले उत्तम उत्तम गवई ह्याच्यापुढें हरले, तेव्हां हा कोणी साधारण गाणारा

असेल त्याची काय डाळ शिजणार? पण ह्मण आहे " को कालो फलदायकः " त्याप्रमाणें एखादेवेळेस तो उत्तम ठरल्यास आपला कार्यभाग होईल; ह्मणून त्यानें त्या शिपायास नव्या गाणाऱ्या उमेदवारास पाठवून देण्यास सांगितलें.

राजाकडून आज्ञा मिळतांच कारकुनानें नीरेश्वरास आंत जाण्यास परवानगी दिली. नीरेश्वर साध्या पोशाखानिशींच त्या दरबारांत जाऊन राजास मोठ्या नम्रतेनें लवून तीन वेळ मुजरा करून त्या नवीन गवयाच्या समोर जाऊन बसला.

यावेळेस कोणाची खात्री नव्हती, कीं हा नवीन उमेदवार त्या गवयास हरवील. कारण त्याची मुखचर्या अगदीं गरीब स्थितीप्रमाणें दिसत होती. परंतु नीरेश्वरानें गायन सुरू करतांच सर्व लोक आश्चर्यानें चकित होऊन गेले. गवयाचें तर तोंड अगदींच उतरलें, आणि गाण्यामध्यें त्याची कांहीं एक खोड नसून, आपणाहून एक कांकणभर जास्त हुशार आहे असें पाहून लज्जेनें कावराबावरा होऊन गेला. सर्वांचे तोंडून शाबास, शाबास, असे शब्द निघूं लागले; आणि राजास, आपण आज जिंकून आपल्या शहरची प्रतिष्ठा राहिली, ह्मणून अत्यानंद झाला. आणखी थोडा वेळ गायन होऊन कचेरी बरखास्त झाली. त्या गवयाची जरी अप्रतिष्ठा झाली तरी राजानें त्यास थोडेंसें बक्षीस देऊन त्याची रवानगी केली; आणि नीरेश्वरास आपल्या राज्यांत मुख्य गवई नेमून त्यास आपले पदरीं ठेविलें. याप्रमाणें त्या राज्यांत नीरेश्वराची स्तुति होऊन, राजाच्या पदरीं जागा मिळाल्यानें तो पुन्हा चांगल्या स्थितींत आ-

पल्या लोभ्या चाकरासह आनंदानें काळ क्रमूं लागला.

एके दिवशीं नीरेश्वर सकाळचे प्रहरीं राजाचे कचेरींतून नित्यप्रमाणें घरीं आला, आणि कपडे वगैरे काढून झोंपाळ्यावर विश्रांतीस्तव बसला असतां, दोन गोसावी—ज्यांच्या जटा दोन दोन हात लांब वाढल्या होत्या, सर्वांगास राख लाविली होती, भगव्या लंगोट्या नेसून त्यांच रंगाची एक एक झोळी काखेंत लटकाविली होती व हातांत एक एक तुंबा घेतला होता, अशा थाटाचे ते बोवा नीरेश्वराचे घरीं ' आलेख ' या शब्दाचा उच्चार करून, व तुझें कल्याण होवो, तूं मोठा भाग्यवान आहेस, असें बोलून त्याजसमोर भिक्षा मागावयास आले. लोभ्यानें आंतून त्यांस भिक्षा आणून घातली व तो फार देवभोळा असल्याकारणानें त्यानें आपल्या पदरचा एक पैसाही त्यांस दिला. तो त्या बुवांनीं घेऊन, मुला, तुझें व तुझ्या धन्याचें नशीब मोठें जोरावर आहे. पहा, याची प्रचीति मी तुला आतांच दाखवितों. असें ह्मणून तो तांब्याचा पैसा त्यानें त्यास कांहीं शब्द उच्चारून चांदीचा करून दाखविला. हा चमत्कार पाहून लोभ्याची वृत्ति चमत्कारिक झाली, व तो त्यांस हें कोणत्या कृतीनें केलेंत, ह्मणून विचारूं लागला. त्यावर दुसरा गोसावी ह्मणाला, बाबा, तूं हें काय विचारतोस? ते नीरंजन साधु आहेत, त्यांची कृपादृष्टि ज्यांवर झाली त्यांस आज काय उणें आहे? हें तर कांहींच नाहीं, पण ते एकपट सोन्याचें चौपट सोनें देखील करतात. तुमच्या धन्यास कळवा कीं, अशा महान् साधूचें दर्शन तुह्मास दुर्लभ आहे, तर त्याच्या इच्छेप्रमाणें त्याची सेवा केल्यास आपलें जन्मोजन्म कल्याण होईल. नीरेश्वर झों-

पाळयावर बसून हें सर्व ऐकत होताच; त्यासही त्याची ती कृति पाहून अचंबा वाटला. परंतु राजकचेरींत त्यास लक्कर परत जावयाचें असल्याकारणानें त्यानें दुसरे दिवशीं त्यांस येण्यास सांगितलें. बुवांनीं ठीक असें ह्मणून आपला रस्ता धरला, आणि नीरेश्वर राजकचेरींत जाता झाला. संध्याकाळीं नीरेश्वर घरीं येऊन, भोजन करून पलंगावर पडला असतां लोभ्या चाकर त्याजजवळ येऊन धन्याचे पाय दाबीत बसला; व दाबतां दाबतां डोळ्यांत आसवें आणून आपल्या धन्याच्या पूर्वीच्या संपत्तीविषयीं शोक करूं लागला. तो ह्मणाला, दादा, पहा, तुह्मी जर रागाचे आवेशांत असें काम केलें नसतें तर आज तुह्मी राजापेक्षांही जास्त सुखी असतां. असो. झाल्या गोष्टीस उपाय नाहीं. तरी आतां मी सांगतों एवढी माझी विनंती ऐकावी. ती ही कीं, आज सकाळीं जे गोंसावी आले होते त्यांमध्यें मी एक अप्रतिम गुण पाहिला. त्या गुणाच्या योगेंकरून आपण आपलें कल्याण करून घेण्याची संधि व्यर्थ न दवडतां त्यांस प्रसन्न करून घ्यावें ह्मणजे तुह्मी राजाचीही बरोबरी करूं शकाल. खरोखर मला वाटतें कीं, त्यांचा ईश्वरी अवतार असावा. त्याशिवाय दुसऱ्याच्यानें असें काम कधींही करवणार नाहीं. नीरेश्वर ह्मणाला, लोभ्या, तुला वेड तर लागलें नाहीं ना? अरे हे किमया करणारे धुतारे, लोकांस असेच फसवीत असल्याचें मीं पुस्तकांत वाचलें आहे, आणि जरी काल मला देखील त्यांचें आश्चर्य वाटलें, तरी माझ्यानें त्यांचा भरंवसा देववत नाहीं.

लोभ्यास नीरेश्वराचें बोलणें ऐकून फार वाईट वाटलें.

तो ह्मणाला, दादा, तुह्मांस असें बोलणें योग्य दिसत नाहीं. ते बिचारे साधु लोकांचें कल्याण करण्याकरितां नेहमीं यत्न करतात, त्यांस आपण निंदावें हें मोठें पाप होय. तरी एक वेळ त्यांजवर विश्वास ठेवून पहावा ह्मणजे काय तें उघड कळून येईल.

याप्रमाणें दोघांचें बोलणें झाल्यावर लोभ्या निघून गेला व नीरेश्वर एकटाच त्याविषयीं विचार करीत बसला. तो मनांत ह्मणाला, लोभ्या जें सांगतो तें एका अर्थी खरें असावें, कारण त्या गोंसाव्यानें माझ्या देखत तांब्याची चांदी केली, व त्यावेळेस मलाही मोठें नवल वाटलें, तरी एक वेळ लोभ्या सांगतो त्याप्रमाणें करून पहावें. दुसरे दिवशीं ते बुवा पुनः नीरेश्वराचे घरीं येऊन पूर्वदिवसाप्रमाणें भाषण करूं लागले. तेव्हां नीरेश्वर त्यांस ह्मणाला, महाराज, तुह्मांस चांदीचें, सोनें करण्याची किमया जर खरोखर येत असेल तर आतांच येथें कांहीं चमत्कार करून दाखवा. हें भाषण ऐकल्यावर त्या गोंसाव्यांनीं आपल्या कृतीची प्रचीति दाखविण्याकरितां एकानें त्याजजवळून एक वाल सोनें मागून घेतलें आणि झोळींतील कांहीं राख घालून थोड्या अवकाशानें तें वालभर सोनें त्यानें चार वाल करून दाखविलें आणि नीरेश्वरास ह्मणूं लागला, बाबा, हा सर्व ईश्वरी प्रसाद आहे. हा थोडासा तुला अनुभव दाखविला, परंतु जसजसे तुह्मी होम हवन वगैरे करून ईश्वरास संतुष्ट कराल तसतसा तुह्मांस याविषयीं जास्त अनुभव येत जाईल. हें थोडेंसें काम असल्यानें नुसत्या मंत्रानेंच झालें, परंतु हजार, दहा हजार रुपयांचें सोनें किंवा चांदी करावयाची असल्यास त्यास पुष्कळ होम हवनें वगैरे करून कांहीं आ-

हुतीही द्याव्या लागतात. तर बेटा, तूं अजून तरी डोळे उघड, आणि हे साधु कोण आहेत, व कोणत्या स्वरूपानें तुझें कल्याण करण्याकरितां आले आहेत, याचा विचार करून, तुझें चांगलें करून घेण्याची ही संधि दवडूं नको. नीरेश्वरास ह्यावेळेस राजाश्रय असल्याकारणानें त्यास थोडेंसें वैभव प्राप्त होऊन तें जास्त सुखकर करण्यासाठीं तो आपल्या स्त्रीस आणण्याच्या विचारांत होता, व तिजकरितां त्यानें सुमारें दहा हजार रुपयांच्या किंमतीचे सोन्याचे दागिनेही खरेदी करून ठेविले होते. कोणत्याही मानवी प्राण्याचे विचार सदासर्वकाळ एकच न राहतां समयविशेषीं एकदम फिरतात, त्याप्रमाणें गोसाव्यांच्या कृत्रिम भाषणाचा त्याच्या मनांत ठसा उमटून आपली संपत्ति जास्त करून घेण्याविषयीं त्यास अतिशय लोभ उत्पन्न झाला. त्यांत त्यांचें तें भस्मार्चित शरीर, लांब लांब वाढलेल्या जटा, रामनामाचें उच्चारण, मृदु भाषण, हीं पाहून तर त्यास जणूं काय आज आपणांस ईश्वर भेटला असें वाटलें. त्यानें लोभ्यास हाक मारून ते दहा हजार रुपयांच्या किमतीचे दागिने बुवांस देऊन त्याचे चौपट सोनें त्यांजकडून करून घेण्याचें ठरविलें; आणि बुवांस आपणासमक्ष तेथेंच होम वगैरे करण्याविषयीं सांगितलें. त्यांनीं तें सर्व मान्य करून बाजारांतून कांहीं वनस्पति व जिन्नस आणण्याकरितां थोडेसे पैसे घेतले, आणि तेथें दोन तीन होम मांडून आपल्या ठकबाजीचा मंत्र चालू केला. त्यांनीं बाजारांतून येतांना तीन लोटे, दोन ४० शेर सोनें मावण्याजोगे व एक १० शेर सोनें मावण्याजोगा, आणिले होते. नीरेश्वराकडील सोनें घेऊन तें त्याच्या समक्ष वितुळविलें

आणि पहिल्यानें त्या दोन्ही मोठ्या लोट्यांत थोडथोडें ओतलें. थोड्या वेळानें नीरेश्वर कांहीं कामाकरतां आंत गेलेला पाहून, तें सर्व सोनें जो लहान लोटा होता त्यांत ओतून ठेविलें व त्याचे ऐवजीं त्या मोठ्या लोट्यांत तांब्याचा रस वितळवून वर शेणी रचिल्या. तसेंच सोनें भरलेल्या लोट्यांत वर राख भरली, आणि नीरेश्वरासमक्ष सुमारें दोन तासपर्यंत चमत्कारिक बडबड करून. बुवाजी ह्मणूं लागले, बेटा, आतां रस तर झाला. परंतु हा रस जास्ती होण्यासाठीं ही रक्षा स्मशानांत वेताळापासून मंतरली पाहिजे ह्मणजे काम झालें. माझ्याबरोबर तेथें दुसराही मनुष्य पाहिजे, तरी आह्मीं लवकर मंत्र साधून येतों, तोंपर्यंत आपण या होमाजवळ राखीत बसावें व यास शिंवूंही नये. अशी भूलथाप देऊन, ते दोघेही सोन्यानें भरलेला लोटा घेऊन निघाले, ते फिरून नीरेश्वराचे दृष्टीस पडले नाहींत! इकडे नीरेश्वर त्यांची एक दोन दिवसपर्यंत वाट पाहून त्यांनीं केलेली भट्टी विझवून पाहतो, तों त्यांत तांबें, पितळ, शिसें, यांशिवाय त्यास दुसरें कांहीं मिळालें नाहीं! हें पाहून तो मनांत दचकला, आणि आपणास त्यांनीं ठकविलें ह्मणून शोक करूं लागला. तो लोभ्यासही अद्वातद्वा बोलूं लागला, आणि इतके दिवस श्रम करून मिळविलेलें द्रव्य आज लोभामुळें फुकट गेलें ह्मणून पश्चात्ताप करूं लागला.

बुवाजी तेथून जे निघाले ते पळत पळत वीस कोसांची मजल त्यांनीं आटोपली, व तेथून गाडी करून दुसरे दिवशीं एका मोठ्या शहरांत जाऊन पोंचले. तेथें त्यांनीं आपला बुवांचा वेष टाकून गृहस्थी पोशाक चढविला,

व लेण्यांतील सोनें काढून तें बाजारांत सराफाचे दुकानीं विकायास घेऊन गेले. यविळेस त्यांनीं एकमेकांस विठ्ठलराव व खंडेराव या नांवानें हांक मारण्याचें ठरविलें होतें.

---

## भाग सातवा.

( गुजराथी सराफांचीं दुकानें. वेष बदललेले बुवाजी गृहस्थ. )

विठ्ठलराव–( सराफास ) केम सेठिआ, शी खबर छे? सारी पेठे तो छो? अमारे थोडूं वणूं सोनूं खरीद करवानूं छे, पण हमणा सोनानुं शूं भाव हशेवारूं?

सराफ–भले. शेट, पधारो, तमे कई घणे दाहडे जोवामा आव्या! आटला दाहडा क्या गया हता? आ दुकान तमारी छे, जेटलूं जोईए तेटलूं सोनुं खरीद करो. तमारेपासेथी कई वधारे थोडूंज लेवानूं छे. भाव कई घणो तेजीपर नथी.

खंडेराव–एवुं अमारा सांभळवामाछे, पण भाव तो जाणिए, हिसाबना काममा चोखूं रहेवूं ए ठीक, नहीं तो पछीथी पंचात कोण करवा जाय?

सराफ–अरे शेट, एमा पंचात शानी? जरा बिडी तो पिओ पछी वात थशे.

विठ्ठलराव–नहीं साहेब, अमारे बिडी पिवानो बिलकुल वखत नथी. बिजूं वणूं जरूरनूं काम छे, सो कोहो जलदी, सोनानो शूं भाव छे?

सराफ–आवी उतावळमां कई सोदो थाय, वारूं तमने चोखां सोनांनो भाव वीस रुपया पडशे. सोनुं सो नंबरनुं, बेनाकरता नरसनो भाव १९।१८।१७ एवो छे, जेटलूं

जोइए तेटलूं आमारेपासेथी लईजाओ, पण याद राखजो हो हमारेपासे दगानूं काम नथी.

खंडेराव–विठ्ठलराव, चालो. बिजो पेलो, मारकीट-नी सामे मारवाडी बाजार छे त्यां जईशुं, पछी आ शेठिआनी-पासेथी खरेदी करिशुं.

सराफ– केम शेट, भाव ह्मोंगो लाग्यो? तमे मारवाडी बजारमां, ने गमइए ते बजारमां जाओ, एना करता कोय ओछो भाव लेशे तो हात कलम करी आपशि, उलटुं ओछा भावथी नरस माल मलशे. फरो बधो बजार, मर्जी तमारी.

विठ्ठलराव–मारा मेहरवान शेट, तेम नथी, अमुने कई घडेला तयार घरेणा वेचता लेवाना छे, पछी सोनुं तो अहींथीज लइशुं.

सराफ–वारूं साहेब, मेहरबानी राखजो, जरूर आवजो हो, दुकान तमारी छे, मारूं नाम हेमराज सराफ.

(याप्रमाणें बोलून ते मारवाडी बाजारांत गेले व तेथें आपल्या-जवळील सोनें विकण्याचा त्यांनीं बेत केला.)

खंडेराव–राम राम मारवाडी शेठ, केम छे? गरीबनापर मेहरबानी तो छे?

मारवाडी–अरे मारा हेट एम तमे हूं बोलोश? तमने जे जोइए ते दागिनो लई जाओ हमारीपासेथी.

विठ्ठलराव–शेठ साहेब, अमारे दागिना नथी जोइता, उलटूं थोडूं सोनूं वेचवानूं छे, राखशो के?

मारवाडी–हाजी, अलबत, केम नहीं लइशुं! पण भाव ठिक करीने आपसो तो हो. होनुं जुनूं हशे नहीं वारूं?

खंडेराव–अबे तूं गांडो तो नथी थयो! अमे बे जणा

मळीनें गया वरसमा सो ना टचनुं सोनुं खेरदी करेलूं हतूं पण हमणा रूपयानी अडचण पडवाथी वेचवानी जरूर पडी. ए तो अमारी बइरीना घरेणा बनावासारूं लिधेलूं, पण नशीब तेमनुं.

मारवाडी—हमज्यो, हमज्यो, पण हेटीआ पेहलूं होनूं तो देखडावशो ?

विठ्ठलराव—आ बे कांडी—पांच पांच हजारनी एक. केम पसंत पडेछ ?

खंडेराव—सूं विठ्ठलराव ! कई वात छे पसंत नहीं पडे; पैसा हरामना नथी आपेला.

मारवाडी—ओ मारा बाप !! आटलूं होनूं ते तमे क्यांथी लायवा हशे !!!

खंडेराव—तने वधारे बोलवानी जरूर नथी, लेवूं होय तो भाव करजे, नहीं तो आ चाल्या. कई चोरीनो माल बोल धारेछे, गांडा.

मारवाडी—मारा हेट, तमे घुसो नहीं करशो वारूं, आ होनूं तमे सूं भावे आपशो ?

विठ्ठलराव—घडी घडी भाव सूं पूछया करेछ, जे बजारभाव हशे ते. केम खंडेराव शेट बोलता नथी !

खंडेराव—हाजतो वरी.

मारवाडी—( सोनें कसोटीस लावून ) होनूं तो चोखूं छे, पण आटला बधा रूपया हूं क्यांथी लावूं ?

विठ्ठलराव—बजारमां दुकान मांडीनें सराफी धंदो करवा सूं काम बेठोछे! माथूं बोडवानो धंदो करते होत तो ठीक लागत दिवाना.

मारवाडी—अरे हेव्या, जरा मारी वात तो

हांवळो, हूं एना हात हजार रुपिया आपिश, खुशी होय तो चालो पटावी देईशूं.

खंडेराव–विठ्ठलराव, तूं कईं दिवानो तो नथी थयो ! अरे एने कईं शरम छे दस हजारनो माल सात हजारमां मांगेछ ! ! चलो आप बिजा ठेकाणे जईये.

मारवाडी–हेटिया, बिजी कई वात करूंछ, आओ, आठ हजार रुपिया लेवाना छे ?

विठ्ठलराव व खंडेराव–चाल नऊ हजार रुपया आप, हमणा अमुने गरज छे आटला वास्ते खोट खाईशूं, शूं करिये ?

मारवाडी–नारे बा, आपणेपासे नऊ हजार मळवाना नथी, हाडा आठ हजार नक्की होय तो आपो, पण सोना उपर शेंकडा एक टक्को दलालीना कापी लेईशूं.

विठ्ठराव व खंडेराव– ( आपणाशीं ) कोठें कटकट करावयास जा, जें मिळेल तें खरें.(उघड) वारूं चाल तूं आपणो शेट छे, अने अमुने हजार वखत तारे पासे काम छे, ए जाणीने आपीश, काढ क्यां छे हाडा आठ हजार रुपिया ?

मारवाडी–दलालीना पचाशी थया ते कोण आपशे ?

खंडेराव–वारूं ते बधा बाद करीने आप.

मारवाडी–पण तमारूं नाम, ठेकाणो, ने धंदो मारा चोपडीपर लखवो जोईये, नहीं तो काले वखते सरकारनो हीपाई आवीने मने पकडी लेई जाय तो गरीबना पुरे पुरे बार वागे.

विठ्ठलराव–तारी हद्द छे, तारा जेवो निगु अने चोकस माणस में जनममां जोयो नथी.

खंडेराव–रुपया काढ जलदी, चल, नाम ठेकाणूं हुं बधो आपीश पछी थयूं.

मारवाडी–होना होर जेवी वात, तारे बोलो तमारूं नाम ने ठेकाणो.

खंडेराव–मारूं नाम खंडेराव अने पेला शेठनुं विठ्ठलराव. ठेकाणो सावकार गल्लीने सामने.

मारवाडी–ठीक, वारूं तमे धंदो सावकारनो करोश त्यारे?

खंडेराव–अलबत, एमा शूं शक?

मारवाडी–लाव, होनानी लगडीओ, क्यां छे ते, ने आपणा रूपया लेई जा.

विठ्ठलराव व खंडेराव–( लगड्या देऊन व रुपये मोजून ) अरे आ तो आठ हजारने चारसो पंधर रूपया छे.

मारवाडी–तारे पछी तमे केटला मांगोछ? तमुने कई हिसाब बीसाब आवडेछ के नहीं! थया सावकार! पेला दलालीना हेंसी ने पांच कापी लेईने बाकी केटला रह्या? करो हिसाब, हिसाबी काममां एक पै अहींया छोडवाना नथी.

खंडेराव–विठ्ठलराव, रूपया बराबर छे, पेला पचायशी रूपयानी मने यादच नहीं हती.

विठ्ठलराव व खंडेराव–( मारवाड्यास ) रूपया तो बराबर छे शेठ्या, तमे आप्या ते खरा. तमारे पासे वधारे वात अमे करवाना नथी; वारूं हमने रजा छे!

मारवाडी–आवजो, मेहरबानी राखजो, दुकान तमारी छे, जे गोपाल.

विठ्ठलराव व खंडेराव–जे गोपाल, जे गोपाल.

याप्रमाणें ते दोघे वेषधारी गृहस्थ रुपये घेऊन चालते झाले.

---

## भाग आठवा.

### शिखरिणी.

सुमायेच्या मोहा, लघुहि न तमोहानि अवडे ॥
भवाब्धीच्या मोहा, नयमति गमो हा न निवडे ॥
न जाणे संदेहा, क्षितिधर, विदेहादि तरले ॥
अशा मोहीं देहा, कधिंहि नच देहानि वरिलें ॥ १ ॥

अर्थ—ह्या भगवन्मायेच्या मोहाला आपल्या संसाराची किंचित् हानीही आवडत नाहीं; यास्तव, तुझी मति या संसारमोहांत न रमो, हें नीतीचें वचन होय; हा संशय धृतराष्ट्रादिकांस नसून तो त्यांत बुडाला आणि जनकासारखे तरले; तर अशा प्रकारच्या ह्या तुझ्या नाशिवंत देहाला मोहपाशांत कधींही गुंतवूं नको.

झालेल्या गोष्टीस उपाय नाहीं, व आतां फार शोक केल्यानें आपली वस्तु परत मिळते असेंही नाहीं, मग उगीच त्याची हळहळ करून काय उपयोग? असा विचार करून नीरेश्वर आपल्या मनांत चुरमुरे खात स्वस्थ बसला. त्यानें आंतून त्यांची चौकशी करण्याचें काम सुरू ठेविलें होतें, परंतु हें वर्तमान राजास व दुसऱ्या दरबारच्या लोकांस कळूं दिलें नाहीं. कारण आपण फार लोभ केल्यामुळें आपली फजिती करण्यास लोक मागें पुढें पहाणार नाहींत, हें त्यास पक्कें ठाऊक होतें. त्याच्या मनांत आपल्या कुटुंबास आणण्याचें होतें तें तसेंच राहिलें, आणि दरबारांत जें काम पडेल तें करून तो आपले दिवस लोटूं लागला.

राजानें नीरेश्वरास गाण्याकरितां तीन वेळा नेमून दिल्या होत्या–प्रातःकाळीं भगवतीचे देवळांत, संध्याकाळीं दरबारांत, व रात्रीस खुद्द राजाचे महालांत. भगवतीच्या देवळा समोर मोहसेन नांवाच्या राजसेनापतीचें घर होतें. त्यास मोहना व मोहक या नांवाचीं दोन अपत्यें होतीं. मोहना ही रूपानें सुंदर असून चौदा वर्षांची ऐन तारुण्यांत आली होती. तिला गाण्याचा फार छंद असे. तिनें हिंदुस्थानी भाषेचा थोडा अभ्यासही केला होता. ज्यावेळेस नीरेश्वर देवळांत गाण्यास जाई, त्यावेळेस ती आपल्या घराच्या गच्चीवर येऊन लक्ष लावून त्याचें गाणें व वाजविणें ऐकत बसे. तिनें बहुत वेळां त्यास जातांना पाहून तिचें मन त्याजवर अगदीं लुब्ध होऊन जाई, परंतु तिच्यानें आपल्या बापाजवळ त्याजविषयीं गोष्ट काढवेना; ह्मणून तिनें ती गोष्ट आपल्या भावास कळविली. हा तिजपेक्षां दोन तीन वर्षांनीं मोठा असून रूपानें तिजसारखाच सुंदर होता. स्वभावानें सदाचरणी व धाडस होता. मोहक व मोहना या दोघां बहीण भावंडांची एकमेकांवर प्रीति फार असे; ह्मणूनच मोहनेनें आपल्या मनांतील गोष्ट भावास कळविली. मोहक तें ऐकून जरासा विचारांत पडला व थोड्या अवकाशानें त्याविषयीं बापाचें मन वळविण्याचें त्यानें बहिणीस आश्वासन दिलें.

नीरेश्वराचें मन स्थीर नव्हतें. नानातऱ्हेचे विचार येऊन त्याचें मन वरचेवर गोंधळून जाई. सरदारकन्या मोहना ही देवळांत जातांना कधीं कधीं आगाशीवर त्याच्या दृष्टीस पडे. तीस पाहिलें ह्मणजे कामिलेची आठवण होऊन त्यास दुःख होऊन तो ते दुःखाचे उद्गार मनांतल्या मनांत

गिळी. मोहनेचें जरी त्याजवर प्रेम होतें तरी त्याच्या मनावर प्रेमाचे अंकुर फुटेनांत. तो गाण्याविषयींच दरबारांत प्रसिद्ध होता असें नाहीं, विद्येमध्यें व हरएक कामांतही त्याचें नांव प्रमुख असे. त्यामुळें त्याजवर दरबारांतील सर्व लोकांची मर्जी सुप्रसन्न असे. मोहक व त्याचा बाप मोहसेन हे दोघे एके दिवशीं आपल्या घरगुती कामाविषयीं कांहीं गोष्टी बोलत असतां, मोहनेविषयीं गोष्ट निघाली. मोहसेन ह्मणाला, बाळा, काय करूं, मी आजकाल मोठ्या विवंचनेंत आहें. तुझ्या बहिणीस चौदा वर्षं पुरीं होऊन आतां पंधरावें लागेल. जरकरतां एवढ्यांतच, तिचें लग्न झालें नाहीं तर पुढें परिणाम फार वाईट होईल. तीस बऱ्याच सरदारांच्या मागण्या आल्या आहेत, परंतु त्या प्रत्येकांत कांहींना कांहीं असे दुर्गुण आहेत कीं तेणेंकरून त्यांचे सर्व गुण लोपले जातात. काय करावें, मला तर अगदीं सुचत नाहीं. तुला कसें वाटतें सांग पाहूं.

मोहक ह्मणाला, बाबा, खरी गोष्ट. माझ्या बहिणीस योग्य असा वर मिळणें कठीण, परंतु तुह्मांस राग येणार नाहीं तर एक गोष्ट सुचवितों. ती ही कीं, आपल्या राजदरबारांत नीरेश्वर ह्मणून एक गवई आहे, तो सर्व गुणसंपन्न असून थोर कुळांतला आहे, असें मला बाहेरील खात्रीच्या बातमीवरून समजलें आहे. गाण्याचा धंदा कांहीं त्याचा पूर्वापार नाहीं. मला वाटतें, त्यासच माझी बहीण दिली असतां फार चांगलें होईल. मग बाबा तुमच्या मनास येईल तें खरें. मोहसेन याच्याही मनांत तेंच होतें, कारण तो दरबारांत त्याच्या गुणांविषयीं नेहमीं ऐकत असे. परंतु तो आपल्यापेक्षां नीच कुलांतील (गवई)

असल्याकारणानें त्याच्यानें त्याविषयीं कोणाजवळ बोलवत नव्हतें. आपल्या मुलाच्या मनांतही तीच गोष्ट आहे असें जाणून तो ह्मणाला, बाळा, तूं ह्मणतोस तें मलाही बरें दिसतें; पण असें केल्यानें लोक आपणांस नांव ठेवणार नाहींत काय? तो किती झाला तरी गवई आणि आपण सरदार. तो जरी रूपानें, गुणानें, व विद्येनें चांगला आहे तरी लोक आपणांस हंसतील यांत संशय नाहीं. ह्मणून या गोष्टीस माझ्यानें रुकार देववत नाहीं. असें त्यांचें बोलणें झाल्यावर, मोहकानें बहिणीस जाऊन सर्व वर्तमान सांगितलें. मोहना हें ऐकून फार खिन्न झाली, ती ह्मणाली, दादा, ज्यास मी एकदां आपल्या मनांतून वरिलें त्यास सोडून मी दुसऱ्याला कधींही माळ घालणार नाहीं. तो गरीब, अविद्वान अथवा नीच असो; जो मनास आवडला तो या शरीरास आवडलाच पाहिजे. याप्रमाणें बोलून ती आपणाशींच शोक करीत बसली.

इकडे एके दिवशीं राजाचे अमलांतील एका मांडलिक राजानें वर्षाचा नियमित कर न चुकविल्यामुळें, त्याचें व राजाचे वैमनस्य पडून दोघेही युद्धास तयार झाले. मांडलिक राजानें आपल्या फौजेची अगोदरपासून कडेकोट तयारी केली होती, व कोठून तरी तो युद्धास निमित्त पहात होता. यांच्या फौजेची तयारी तशी नसून आपण शूर या घमेंडींतच ऐशआरामांत गुंग होऊन गेले होते. आपल्या सत्तेखालील राजा हुकूम मोडून खंडणी देत नाहीं, असें ऐकून राजा संतापानें अगदीं भडकून गेला, व आतांच्या आतां जाऊन त्याचें राज्य खालसा करावें ह्मणून सेनापतीस हुकूम दिला. हुकमाप्रमाणें सेनापति फौज जम-

वून लढाई देण्याकरितां निघाला. शहराच्या वेशी बाहेर शत्रूचें सैन्य वेढा देऊन बसलें होतेंच, तेथें त्या दोघां सैन्यांची गांठ पडली. रणवाद्यें वाजून जिकडे तिकडे तरवारी चमकूं लागल्या. घोडे खिंकाळूं लागले. अशा वेळेस एकच धांदल होऊन, राजाकडील लोक बरेच पडून शत्रूस जय मिळण्याची संधि आली. राजाच्या व मांडलिक राजाच्या–दोघांही–सेनापतींच्या हातांतील तरवारी मोडून गेल्याकारणानें ते हातघाईवर येऊन मल्लयुद्ध करावयास लागले. मल्लयुद्धांत राजाच्या सेनापतीस हरवून शत्रु आपला विजयी झेंडा फडकावणार. तोंच कोणी एक महातेजस्वी पुरुष त्या गर्दीतून येऊन त्या मांडलिक राजाच्या सेनापतीस उचलून वाऱ्याप्रमाणें वर फेंकून दिला, व राजाचा विजयी झेंडा लावून, त्या बंडखोर अन्यायी राजास सेनापतीसह कैद करून रणवाद्यांचा विजयघोष करीत उरलेल्या लोकांनिशीं शहरांत परत आला. शत्रूच्या सैन्यांत राजा व सेनापति कैद झाल्याची बातमी पसरतांच त्यांची दाणादाण होऊन जिकडे ज्यास वाट मिळाली तिकडे ते पळून गेले.

आमचे चतुर वाचक, हा तेजस्वी पुरुष कोण असावा याविषयीं साशंकीत असतील. तो आपला नीरेश्वर होय. त्या दोघांचें मल्लयुद्ध होत असतांना राजाचा सेनापति डावपेंच करण्यास चुकला, असें नीरेश्वरानें पाहून त्यानें ताडलें कीं आपल्या बाजूस हार येते. ह्मणून तत्काळ त्या गर्दींत शिरून आपल्या पक्षाकडील सेनापतीस सोडवून शत्रूच्या सेनापतीस असा एक पेंच मारला कीं तेणेंकरून तो वर उडून पुनः खालीं पडला. राजास जय मिळाल्यामुळें

फार संतोष झाला व दरबार भरून ज्याच्या त्याच्या शौर्यानुरूप बक्षिसें व किताब द्यावेत ह्मणून प्रधानास हुकूम केला. हुकमाप्रमाणें सभा भरली व हा जय कोणी मिळविला ह्मणून चौकशी चालली. ज्या सेनापतीस नीरेश्वरानें वांचविलें तो मोहसेन होता. त्यानें पुढें होऊन राजास लवून तीनदां मुजरा केला, आणि ह्मणाला, महाराज, मी आज जिवंत राहण्यास व आपलें राज्य बचाविण्यास कारण आपला गवई नीरेश्वर हा होय. ह्यानेंच आपली शक्ति व तरवार गाजवून राज्यास व मला काळाच्या तोंडांतून सोडविलें. तर आपणास जो मान व जें बक्षीस द्यावयाचें असेल तें यास द्यावें. राजास हें ऐकून फार आश्चर्य वाटलें, आणि प्रधानास नीरेश्वराला सरदारी पोशाख घालून सभेंत आपणापुढें उभें करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें प्रधानानें त्यास आणल्यावर राजा त्याजकडे बोट करून सर्व सभासदांस ह्मणाला, सभासद हो! या मनुष्याकडे अवलोकन करा, आणि धैर्याचें व शौर्याचें उत्कृष्ट उदाहरण लक्षांत ठेवा. याची पदवी पूर्वी कोण होती व आतां मी यास कोणत्या पदवीस चढवणार, हें तुह्मी जाणतच असाल. कोणताही मनुष्य दैवयोगानें नीच स्थितींत जरी असला तरी तो आपल्या सद्गुणांनीं प्रसिद्धीस आल्यावांचून राहात नाहीं. आंगांत धैर्य धरून प्रसंगवशात् शौर्यानें त्याचा उपयोग करणें हा तरी एक सद्गुणच समजला पाहिजे. असो. त्या बंडखोराची आज यानें बरीच खोड मोडून आपणास सुदिन दाखविला ह्मणून मी यास आपल्या मोहसेनाच्या बरोबरीच्या पदवीस चढवितों. ह्यास आजपासून 'समशेरबाहदर सेनापति' हा किताब दिला आहे. तर ह्या किताबाशिवाय जो

कोणी पूर्वीचें " गवैया " हें विशेषण नामाभिधानास लावील त्यास कडक शिक्षा दिली जाईल. राजानें याप्रमाणें भाषण करून एक उत्तम तरवार स्वत: नीरेश्वराचे हातांत दिली, आणि त्याचा हात मोहसेनाच्या हातांत मिळवून देऊन, उत्तरोत्तर नवीन मिळविलेल्या हुद्यांत हुशारी दाखविण्याविषयीं नीरेश्वरास सांगितलें, व दुसऱ्या कित्येक सरदारांस त्यांच्या कामाप्रमाणें पदव्या व इनामें देऊन कचेरी बरखास्त केली.

याप्रमाणें नीरेश्वराची सेनापति या नांवानें जिकडेतिकडे प्रख्याति झाली, व तो नेहमीं सरदारांत वागूं लागला. मोहसेन याच्या मनांतून त्यास आपली मुलगी देण्याचें असल्यामुळें जी त्यास नड होती ती आतां दूर झाली आणि तो याबद्दल त्याच्याशीं गोष्ट काढण्याची संधि पाहूं लागला. मोहसेनाचा पुत्र मोहक यानें तर नीरेश्वराशीं फारच सलगी करून त्यास एक दिवस आपल्या घरीं जेवणास बोलाविलें. या जेवणास नीरेश्वर, मोहसेन व मोहक या तिघांवांचून दुसरें कोणी नव्हतें. भोजनास उत्तम प्रकारचीं पक्वान्नें केलीं असून अनेक प्रकारच्या शाक भाज्या व स्वादिष्ट कोशिंबिरी केल्या होत्या. जेवण चाललें असतां नीरेश्वरानें सहज आज मला एकट्यालाच जेवावयास बोलावण्याचें कारण काय ह्मणून विचारिलें. त्यावर मोहकानें असें उत्तर दिलें कीं, सेनापतिसाहेब, आपण बरोबर अनुमान केलेंत; तसेंच कांहीं नाजुक काम आहे ह्मणून आपणास आज तसदी घ्यावी लागली; जर आपण करण्यास राजी असाल तर निवेदन करितों.

नीरेश्वर ह्मणाला, वः, हें काय विचारावें! एकादें काम मजकडून होण्याजोगें असल्यास तें मी कां करणार नाहीं?

बोलाल तर खरे अगोदर, मग काय तें सांगतां येईल.

मोहसेन ह्मणाला, सेनापति साहेब, काम कांहीं मोठेंसें अवघड आहे असें नाहीं. तें पुढें केव्हां तरी होणारच, मग त्याविषयीं भीड ती कशास पाहिजे? काम एवढेंच कीं, माझी मुलगी मोहना हल्लीं उपवर झाली असून तिच्या मनांतून आपणाला वरावें असें फार आहे. तर द्या पाहूं ह्या गोष्टीस आपला रुकार; आणि करा सर्वांचें तोंड गोड!

हें ऐकतांच नीरेश्वर मनांत जरासा चरकला, आणि ह्मणाला, अहो, तुह्मी हें बोलतां तरी काय! माझें एकदां लग्न झालें असून, पहिली बायको जिवंत असतांना मी दुसरें लग्न कसें करूं? माझे हातून ही गोष्ट कदापि व्हावयाची नाहीं.

मोहना ही एका खोलीच्या आड उभी राहून यांचें सर्व बोलणें ऐकत होती. तिनें नीरेश्वराचे हे शेवटचे शब्द ऐकतांच तिला मूर्छा येऊन ती धाडकन् जमिनीवर पडली. आवाज कशाचा झाला तें पाहण्यासाठीं मोहसेन लवकर लवकर जेवण आटपून खोलीकडे गेला; पहातो तों आपली मुलगी मोहना जमिनीवर मूर्छित होऊन पडली आहे असें नजरेस पडलें. इतक्यांत घरांतील दुसरीं मनुष्यें धांवून येऊन तीस सावध करूं लागलीं: कोणी तिला पाणी पाजताहेत, कोणी माथ्यावर थंड औषधें घालताहेत, कोणी कांदा नाकाशीं धरून हुंगविताहेत; तें पाहून नीरेश्वर व मोहक हेही तेथें येऊन त्यांनीं थोडेंसें गुलाबाचें पाणी घेऊन तें तिच्या डोळ्यांस लावूं लागले.

पहा! काय स्त्रीजात धूर्त व कपटी आहे ती! सर्व जणांनीं तिला इतके उपचार केले तरी सावध झाली नाहीं, परंतु तिच्या भावी प्रियानें थोडें पाणी घेऊन नुसतें तिच्या

डोळ्यांस लावलें न लावलें तोंच ती जराशी शुद्धीवर येऊन अस्ताव्यस्त झालेलें आपलें लुगडें सांवरूं लागली ! नीरेश्वरासही तिचें अस्ताव्यस्त झालेलें शरीर पाहून, कामिला आपल्या दृष्टीसमोर मूर्तिमंत उभी राहिली आहे कीं काय असा भास झाला.

मोहना जरा सावध झालेली पाहून मोहसेन तीस ह्मणाला, बाळे, तुला काय बरें झालें ? तूं अशी बेशुद्ध कां झालीस ? मोहना ह्मणाली, खरेंच बाबा, माझी अशी अवस्था कां झाली हें माझ्यानें सांगवत नाहीं, तरी मी कांहीं भयंकर शब्द ऐकले त्याबरोबर घाबरून खालीं पडल्यें, दुसरें मला कांहीं आठवत नाहीं. रास्तच आहे. " माझे हातून अशी गोष्ट कदापि घडावयाची नाहीं " हे नीरेश्वराचे शब्द तिला भयंकर वाटले यांत नवल तें कोणतें ? मोहसेनानें आपल्या दासींस तिला बिछान्यावर निजविण्यास सांगितलें, आणि मोठ्यानें दुःखाचा सुस्कारा टाकून नीरेश्वरास ह्मणाला, आज मजकरितां आपणास एवढी तसदी पडली याची माफी असावी.

नीरेश्वर ह्मणाला, वः आपण हें काय बोलतां ? यांत तसदी ती कशाची ? एकमेकांनीं एकमेकांस उपयोगी पडावें, हें योग्यच होय. असो. आतां रात्र फार झाली; आपण फार श्रमलां आहांत, यास्तव स्वस्थ जाऊन जरा झोंप घ्या. आह्मींही आपली रजा घेऊन निजावयास जातों. असें ह्मणून नीरेश्वर व मोहक हे दोघेही एका खोलींत निजावयास गेले. निजण्याचे पूर्वी पुढीलप्रमाणें त्या दोघांचें भाषण झालें.

नीरेश्वर—मोहका, तुझ्या बहिणीस असें एकाएकीं काय बरें झालें असावें ?

मोहक–आपण गरिबाची पंचाईत कशास करितां ! कांहीं का होईना ?

नीरेश्वर–असें काय बोलतोस ! तूं माझा मित्र ना, मग तुझ्या माणसाच्या जिवास जो धक्का तो मला नाहीं का ?

मोहक–होय; ह्मणूनच हा धक्का दिलात वाटतें !

नीरेश्वर–तूं बोलतोस तरी काय ? मी धक्का कसला दिला ? तुला शपथ आहे; असें अन्योक्तीनें न बोलतां स्पष्ट एकदां सांग पाहूं काय तें.

मोहक–अहो, स्पष्ट काय सांगावयाचें ? जर आपण जाणत नसाल तर सांगतों. माझ्या बहिणीची प्रीति आपणावर बसली असून, तिच्या मनांतून तुमच्यावांचून दुसऱ्यास वरावयाचें नाहीं; आणि बाबानें त्याविषयीं आपल्याजवळ गोष्ट काढली, ती तुह्मी साफ नाकारलेली माझ्या बहिणीनें ऐकल्यामुळें तिची अशी अवस्था झाली. आतां ती आपल्या जिवाचें काय करील याचा विश्वास देववत नाहीं; कारण तिचा निश्चय तसाच झाला आहे.

नीरेश्वर मोहका, तूं बोलतोस याचें मला मोठें नवल वाटतें. अरे एक वेळ माझें लग्न झालें असतां दुसरें करण्याविषयीं सांगणें हें तुला तरी शोभतें काय ?

मोहक–तें सर्व खरें; आपलें लग्न झाल्याविषयीं जरी आह्मांस संशय आहे, तरी तुमच्या बोलण्यावर आमचा विश्वास असल्यानें तें कबूल करितों. यद्यपि आपणावर ज्या स्त्रीची खरोखर प्रीति आहे, तीस अंतर देणें हें आपणासारख्या थोर मनुष्यास बिलकुल शोभत नाहीं. कारण ज्या प्रीतीचा ओघ हट्टानें आपणाकडे वळला, तो कदापि दुसरीकडे वळला जाणार नाहीं. कुलीन स्त्रिया एक वेळ

मनांतून ज्यास वरावयाचें इच्छितील त्यासच त्या वरतील. ज्या अर्थी माझ्या बहिणीचें पूर्ण प्रेम आपणावर आहे, त्या अर्थी आपण तिची विनंती ऐकावी हे मला योग्य दिसतें. जरी आपलें लग्न झालें आहे तरी त्या अभागी स्त्रीची व तुमची भेट लवकर होईल असें दिसत नाहीं; कारण "मी आपल्या देशीं परत जावयाचा नाहीं व तेथील मंडळीस-ही मी कोठें आहें हें कळविणार नाहीं" असें तुह्मी बोलतांना मी पुष्कळ वेळां ऐकलें आहे. तर मग आपल्यासारख्यानें लग्न केल्याशिवाय अशा स्थितींत गोंसाव्याप्रमाणें राहावें हें मला तर नीट दिसत नाहीं, या उपर आपली मर्जी.

नीरेश्वर–(मनांत) स्त्री तर सुंदर असून तिनें मला वरण्याविषयीं निश्चय केला आहे. तिच्या बापाच्या व भावाच्या मनांतही तसेंच आहे; व मलाही सध्यां येथें कोणी नसून परत स्वदेशीं जाण्याची इच्छा नाहीं, मग यास रुकार देण्यास आपलें काय जातें? (उघड) मित्रा, जर माझ्यासाठीं तुझी बहीण इतकी जिवावर उदार झाली आहे व तिनें मलाच वरण्याचा निश्चय केला आहे, तर निरुपायास्तव मी रुकार देतों, परंतु दोन लग्नें केल्यापासून एकादा वाईट परिणाम पुढें न होवो ह्मणजे झालें.

मोहक–वा: आतां मात्र खासें बोललेत. ही बातमी मी उद्यां सकाळीं बाबास व बहिणीस कळवितों, ह्मणजे पहा कसा जिकडे तिकडे आनंदी आनंद होऊन जाईल तो! वाईट परिणामाविषयीं तर धास्तीच नको; कारण आपली पहिली स्त्री सुशिक्षित असेलच, मग दोघींमध्यें तंटा होण्याची भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. आतां आपण स्वस्थपणें

निद्रा घ्यावी. उद्यां सकाळीं उजाडल्याबरोबर पहा कशी मजा उडवून देतों ती!

यांप्रमाणें ते दोघे बोलतां बोलतां झोंपीं गेले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मोहकानें तें सर्व वर्तमान आपल्या पित्यास व बहिणीस कळविलें. मग त्यांच्या आनंदास काय विचारावें! मोहसेनास फार आनंद झाला, व मोहना तर कमलाप्रमाणें प्रफुल्लित होऊन तिच्या गालांवर गुलाबाच्या फुलाप्रमाणें टवटवी दिसूं लागली. ती मोहकास ह्मणाली, दादा, मी तुझी फार उपकारी आहें व हे उपकार माझ्या हातून कधींही फिटावयाचे नाहींत. पुढें लवकरच मोहसेनानें नीरेश्वराबरोबर मोहनेचें लग्न मोठ्या थाटानें लावून दिलें.

नीरेश्वर आतां सुखानें चैनींत राहूं लागला. मोहनेची नीरेश्वरावर व त्याची मोहनेवर दिवसेंदिवस प्रीति वाढत चालली. कांहीं दिवसांनीं मोहना गरोदर राहिली व नवमास पूर्ण होतांच पुत्र जन्मला. हा पुत्र नीरेश्वरास जिवापेक्षांही प्रिय असे. त्याची त्या पुत्रावर व मोहनेवर इतकी कांहीं माया जडली कीं तेणेंकरून तो अगदीं अंधपणासारिखा वागूं लागला. त्यास त्यांवाचून ह्या जगांत दुसरी कोणतीही वस्तु प्रिय भासेना. ईश्वराची करणी अगाध आहे! तो आह्मां मानवांस कळसूत्री बाहुल्यांप्रमाणें नाचवून अनेक असंभाव्य गोष्टी निमिषमात्रांत घडवून आणवितो. सुखांत दुःख आणि दुःखांत सुख त्याच्याच इच्छामात्रेंकरून मनुष्यास प्राप्त होतें. नीरेश्वरानें एवढीं दुःखें भोगिलीं तरी त्यास कसून पहाण्याचें ईश्वराच्या मनांत होतेंच. नीरेश्वर एवढ्या योग्यतेस चढला, त्यानें दुसरें लग्न केलें व त्याला एक मुलगाही झाला, हें वर्तमान कोणी विघ्नसंतोशानें त्याच्या प-

हिल्या बायकोस कळविल्यामुळें, ती बापास व सासऱ्यास नकळत एकटीच नीरेश्वराकडे निघून आली. आतां तर नीरेश्वर दोघी स्त्रियांच्या संगतीनें काळक्रमणा करूं लागला. स्त्रिया किती जरी सुशिक्षित असल्या तरी त्यांचीं मनें स्वभावतः हलकीं असल्यामुळें लहानसहान गोष्टींचा देखील त्या मोठा बाऊ करून दाखवितात; मग ह्या तर सवती, त्या नीटपणानें एकत्र कोठच्या राहायाला! पहिल्या बायकोनें नीरेश्वराची प्रीति मोहनेवर व तिच्या पुत्रावर फार आहे, असें पाहून तिनें त्याचा नेहमीं छळ मांडिला व कोणत्या तरी रीतीनें त्यांची तुटातूट पडेल अशी संधि ती पाहूं लागली. खरोखर, दोन स्त्रिया असल्यानें केवढे भयंकर परिणाम होतात ते पहा! तिनें त्या दोघां मायलेंकरांच्या खाण्यांत अमली पदार्थ घालून पितापुत्राची व नवराबायकोची ताडातोड करण्याचें योजिलें. एके दिवशीं नीरेश्वर सकाळींच शिकारीस गेला असें पाहून, तिनें मोहना व तिचें लहान बालक यांस दुधांत अमली पदार्थ घालून तें पिण्यास दिलें. तेणेंकरून तीं मेल्यासारखीं होऊन निचेष्ट बिछान्यावर पडलीं. या अमली पदार्थाचा असा गुण होता कीं, तो मनुष्याच्या खाण्यांत आला असतां चोवीस तास पर्यंत देहभान जाऊन शरीर प्रेतवत् दिसावें, परंतु त्यापासून जिवास धक्का बिलकुल नव्हता. दोनप्रहरच्या सुमारास नीरेश्वर शिकारीहून घरीं आला, आणि पाहतो तों जिकडे तिकडे रडारड व आरडाओरड चालली आहे. याचें कारण काय असावें ह्मणून चौकशी करण्याकरितां खोलींत गेला, तों काय विचारावें! तें त्याच्या प्रिय स्त्रीचें व पुत्राचें प्रेत पाहून त्यास मूर्छा येऊन धाडदिशीं जमिनीवर पडला.

डोळ्यांपुढें अंधेरी आली व छाती धडधडूं लागली. बोल- ण्यास वाचा फुटेना !!! मोहसेन, मोहक, व नीरेश्वरा- ची ढोंगी स्त्री हीं तेथें दुःख करीत जवळच बसलीं होतीं, त्यांनीं नीरेश्वरास बेशुद्ध झालेला पाहून धांवत जाऊन त्याच्या डोळ्यांस पाणी वगैरे लावून सावध केलें व त्यास दोन समजुतीच्या गोष्टी सांगूं लागले. मोहसेन ह्मणाला, आतां शोक करून काय उपयोग ? ईश्वराचेच मनांतून आह्मीं तु- मचें सुख पाहूं नये असें होतें तर आपणा यःकश्चित मानवांचें तेथें काय चालणार ? मजसारख्या वृद्धास या वयांत दुःख दाखविण्याचें त्यानें कसें बरें योजिलें !! हाय हाय ! ही माया व्यर्थ होय !!! बाबा तूं आतां सावध हो, तुला चांगलें पाहून आह्मांस जरा बरें वाटेल. आतां आपणास पुढच्या तरतुदीस लागलें पाहिजे. असें ह्मणून त्यांनीं एक चंदनाची मोठी पेटी आणून त्यांत तीं मायलेकरांचीं प्रेतें ठेवून ती पेटी एका लहानशा गलबतांत ठेविली व तें खलाशा शिवाय समुद्रांत सोडिलें. असें करण्याचें कारण त्या देशची चाल तशी होती. सरदारांपैकीं किंवा कोणी मोठा माणूस मरण पावला असतां त्यास वर लिहिल्या- प्रमाणें करीत. प्रेत पुरणें किंवा जाळणें हें ते लोक भयंकर कर्म असें समजत असत.

नीरेश्वराची कांहीं केल्यानें समजूत होईना. तो मोठ्यानें सुस्कारा टाकून शोक करूं लागला. तो ह्मणाला, हे ईश्व- रा ! तुझ्या मनांत असें घडवावयाचें होतें तर त्वां मला अशा मोहपाशांत पडण्याची बुद्धि तरी कां दिलीस? एक पुत्र होता तोही तुला बरा दिसला नाहीं ! हाय हाय ! तुझी करणी अगाध आहे ! कोणाची बायको आणि कोणाचा मुलगा !

सर्वच भ्रांति होय. याप्रमाणें उदासवृत्तीनें तो काळ कंठूं लागला.

इकडे तें गलबत लाटांनीं व वाऱ्यानें वहात वहात एका किनाऱ्यास लागलें. अंधकार जाऊन नुकतींच सूर्याचीं तेजस्वी किरणें दिसण्यास लागलीं होतीं. कोंबड्याचें आरवणें सुरू झालें होतें. अशा समयास त्या पेटींतील प्रेतांचा अमल उतरला. कारण त्या पदार्थाचा अमल चोवीस तासांवर राहण्यासारखा नव्हता. मोहना सावध होऊन पाहत्ये तों सर्व अंधेर असून आपण पेटींत आहों असें तीस वाटलें. पहिल्यानें ती तें स्वप्न समजली, कारण तिला यापैकीं कांहीं माहीत नव्हतें. मग इकडे तिकडे चांचपूं लागली तों वरच्या ढांकणास हात लागून ती पेटी उघडली व उजेड दृष्टीस पडला. नंतर ती पेटींतून बाहेर आली तों आंत मूलही रडूं लागलें. मुलास पाहून तीस फार आनंद झाला. तिनें त्यास उराशीं धरून दूध पाजिलें आणि हा प्रसंग आपणावर कसा आला याचा विचार करूं लागली. मला पुत्रासहित पेटींत घालून गलबतांतून समुद्रांत कां सोडलें, मी आतां कोठें आहें, याचें तिला बिलकुल अनुमान होईना. एका बाजूस समुद्र व दुसऱ्या बाजूस रेती, दगड, झाडें यांशिवाय दुसरें कांहीं दिसत नव्हतें. ती धीर धरून हळू हळू मुलास कडेवर घेऊन गलबतांतून किनाऱ्यावर उतरली. जवळील वृक्षांचीं पक्क फळें खाऊन क्षुधा शांत केली; व झऱ्याचें स्वच्छ पाणी पिऊन, एका झाडाखालीं बसून मोठ्यानें शोक करूं लागली. ती ह्मणाली, हे ईश्वरा, असा मी काय अपराध केला होता कीं मला माझ्या पतीनें याप्रमाणें सोडून द्यावें ! माझी ना-

हीं ती नाहीं, पण ह्या बाळाची देखील त्यांस कींव कशी आली नाहीं !!! एक घटका मी त्यांचे दृष्टीस पडल्यें नाहीं कीं त्यांस कसेंसेंच होई; आतां त्यांना माझा वीट कां बरें आला ? कोणत्या दंपत्याचा मीं पूर्वजन्मीं विजोड केला होता, कीं आज मजवर हा प्रसंग गुदरावा !! मजवांचून त्यांची तिकडे काय बरें स्थिति झाली असेल !!! छे मीच वेडी, दुसरी सवत नाहीं का आहे त्यांना ! स्वत: मी मात्र प्राणपतींस मुकल्यें. याप्रमाणें मोहना विलाप करतां करतां कांहीं वेळानें मुलासह तेथेंच झोंपीं गेली.

---

## भाग ९ वा.

(मोहना निजलेल्या जागीं एक काळा धिप्पाड माणूस झाडींतून बाहेर पडून येतो व तिचें स्वरूप पाहून चकित होऊन ह्मणतो. )

### दोहरा.

होना जैसे हो रहे, इन्सान करे ख्याल ।
लेकिन किसके हाथ नहीं, है नसीबका ताल ॥

ओहोहो ! क्या खुदानें इस औरतका नूर बनाया है !! उस्की शक्ल देखकर मेरा जान उसपरसें खुरबान करना ऐसा दिल होता है. लेकिन ठेर ऐ औरत आपने हातमें है. जंगलमें ए अकेली किस तऱ्हासें आई, और उसका आनेका बायस क्या, ए सब अपनेकूं मालूम होना जरूर है.

ऐसा ओ आदमीनें अपने दिलमें इरादा कर कर जहां ओ मोहना सो रही थी उधर आया और उसके अंगकूं हाथ लगाकर उसकूं उठाया, और बोलने लगा, अए माशुक, तेरा हुश्न देखकर मै ऐसा अजमाता हूं के तूं कोय

खानदानकी बेटी है. ऐसा कौन शक्स था, के जिसनें तुझे सताया, और इस जंगलमें अकेली डाल दिया; तूजकूं लायक है के, अपना सब अहवाल हमे दासें इत्नें हा तख तुझकूं जाहीर करना.

बिचारी मोहना ए आदमीकूं देखकर डरके मारे घबर गई और एकदम उठके बैठी, कहनेलगी, भाई! तूं सच्च बोल, तुम आदमी या सैतान हो. मै गरीब औरत दुःखमे गिरफतार हूं, तूं मुजकूं खाली सताना मत.

आदमी—अए औरत डरो मत. क्यौं के, मै आदमी हुं, सैतान नहीं. तुझकों ये दुःखमेंसे छुडानेका मेरा इरादा है.

मोहना—जब सुन भाई. मै एक शेहरके सरदारकी बेटी हुं. मेरा नाम मोहना. मेरा खाविंद बडा हुशीयार या अकिलमंद है. मै एक दीन फजर दूध पीके सो गई. जब मे नीदमेंसें जाग उठी और देखने लगी, तो दर्याबके बीच, एक किस्तीमें, पेटीके अंदर छोकरेके साथ पडा हुवा है!! अहाहा! क्या इन्सानका ख्याल है, के मै अपना मेहल छोडके अबी इधर जमीनपर पडी है!! ऐसा बोलके सीर पटकके रोने लगी.

आदमी—अये औरत तूं रो मत. तेरा दुःख देखके मेरा कलेजा फाट जाता है. मुझकों मालूम होता है के तेरे मर्दनें तुजकूं मरनेके खातर ऐसा काम किया. लेकिन देख (मोहनाके गलेमें हाथ डालके) मेरी एक बात सुनेगी तो—

मोहना—(आंख फिराके) अरे तूं बावरा तो नहीं हुवा! ये क्या करता! छोड गलेका हाथ!

आदमी—मेरा कुच तुझे कहना है.

मोहना–कहना है सो लंबेसे नहीं कहा जाता! ये क्या तेरी कहनेकी तौर! हट पीछे!

आदमी–अली मोहना मेरा कहना अबतख तेरे ध्यानमें नहीं आया! इस्से क्या तुझे जाहिर करूं!

मोहना–मुझकूं छोड दे पहिले, फिर तेरा कहना मैं सुनेगी. तूं कुच अमल तो नहीं करता? क्या सेहरमें लोग अमल करते, और उसकी निसा तुझकूं आती? चल हट. मुझे दबावो मत, दिवानेके माफिक करता और बोलता मेरा कहना है! ये कुच कहनेकी तौर नहीं. बात चित करनेका तो लंबे बैठके करना.

आदमी–जोरसें मत बोल, कुई सुनेगा. मै तेरे गलेकी कसम खाके कहता हूं कुच कहना है.

मोहना–(खडी होनें चाहती लेकिन वो बिठा था तब) अरे ये क्या करता? छोड मुझे जाना दे, मै ये दर्यावमें अपना जान खर्यात करनें चाहती.

आदमी–अरे जा, क्या ढोंग दिखाती! क्या ढोंग दिखाती! मै पछैानता हूं तेरा दिल; लेकिन मेरे मुसे क्या जुबान निकलती वो देखकर फिर–

. मोहना–क्या कहता रे! मेरा दिल तूं कैसा पछाना? अबीतख तुझकूं मै अपने दिलमें भाईके माफिक जानती थी; लेकिन ये नहीं मै पछानती थी के तेरे पेटमे छुरी है. चल, हट जा पीछे!

आदमी–हो, वस हुवा, जादा जुबान बोलके किसकूं जाहीर करती! इधर तीसरा कौन है के, जो तेरी टकटक सूनके दौडते इधर आवे, और ये हातमेसे तुझकूं छुडावे. तूं अपने दिलमें ऐसा मत समझ के ओ आदमी अपने

दिलकी मसलहत पुरी किया बिना तुझकूं छोडेगा.

मोहना-( बडे घुस्सेसे ) अरे मुए, इस खातर तुने ये सब ढोंग किया और मेरी सब हाल पुछा! मुए कुत्ते, तूं किधर हात लगाता, मे तेरे बेहेनसरीखी हूं.

आदमी-किसकी बेहेन और किसके भाई? मुझे उपरसें बयाना करनेका, पेटमें क्या है वो मै सब जानता हूं. जो तेरे दिलमें ऐसा नहीं था, तो मेरेसाथ तूं पेहेले बात किसवास्ते किया!

मोहना-अरे चंडाळ, जल गया तेरा इरादा और तूंभी जल जा. मेरे गलेका हाथ छोड, नहीं तो तेरे पांवके आगे अपना जान देती हूं. और मेरा सब कपडा लोहीसे भिनाती हूं पिछे तेरा इरादा पुरा होवेगा.

आदमी-बहोत अच्छा, तूं जितनी गाली देती उतनी मुझें बहुत मिठी लगती और जादा देना, गालीमें क्या है? तेरा और मेरा दिल एक है, और जिस्सें मेरा दिल खुषी उस्सें तेरा भी खुषी है. फिर गाली क्या करेंगे, बैठ, उधर तिसरा कोई नहीं, जो कुच है वो तुझकूं और मुझे मालुम, उसमें क्या है! सब लोगोंकी येही तौर है. तू अब छोटी है, दुनियांकी तौर तुझे मालुम नहीं. कहा है,—

## दोहा.

परीसी सूरत देखकें, जो न दिवाना होय।
शक्स जहामें कौन है, ऐसी जिंदगी खोय॥
कंवलका रस लेत है, भंवरे बारोबार।
खूब सूरतकों देखना, है नैनोंको प्यार॥

मोहना-( रोने लगती ) या खुदा! मेरेकूं किसवास्ते

तूं इधर छोड दिया, और कौन्सा षक्स गुजरा है, वो कुत्ता मुझे दुनियांकी येही रीत है ऐसा सिखाता! क्यों रे गध्धे! ऐसा कौन्सा हराम है, के कोई औरतकूं बहेन कहके आखेर उसकेतरफ खराब नझरसें देखता? मैने तेरे सिवाह ऐसा हराम कोई भी न देखा या न सुना. तूंहि पहिले नझर आया.

आदमी—(घुस्सेसें) मोहना, दिल तपासके बात कर. तूं किसकूं गद्धा और हराम बनाता है! कैसा भी होवे तो मै मर्द हूं बुरे लब्जोंसें मेरा दिल दुखाना ये तुझे लायक नहीं, अच्छा देखलैगा.

जो आदमी एक दफे इष्कके नादमें पडा वो कैसाभी अकिलमंद और हुषियार हो, तो भी अंधेके माफिक होके अपना खानदानी डुबा देता है. फिर, ये तो एक जंगलका आदमी वो कितना हुशियारी करेगा! उन्ने एकदम ओ बिचारी औरतकूं फसानेका बिचार किया, उत्नेमें दो तीन हत्यारबंद शिपाई आके पीछेसे उस आदमीकूं एकदम पकडा. अपनेकूं शिपाई पकडा ये देखकर ओ आदमी छुटनेके वास्ते ओ लोगोंकी बहोत बिनंती चारोरी करने लगा पन शिपाई किधर छोडनेवाले? ओ लोगनें उसकूं पकडकर मोहनाकूं पालखीमें बैठनेकूं होकम किया.

बिचारी मोहना बहोत दुःखमें बेहोष हो गई थी, और ये आदमी जुलूम करके आबरू खराब करेगा उस्सें बेहत्तर अपना जान देना ऐसे बिचारमें होती, उत्नेमें ये सब तमासा देखके और सीपाहीका कहना सुनके जरा घबर गई और उस्कूं बोलने लगी, भाई आप क्या कहते हो? मेरी लाचारीकी ठठा नहीं करना, क्यों के अब मेरा जी

जानेकूं थोडी मुदत रह गई है. खुदाके पास क्या मैंने हरामखोरी कियी थी, उसके सबबसे में ए हालतमें आके पडा हूं, वास्ते आपकूं इस वख्त ये लायक है के सच्ची बात कहकर आप किस वास्ते ये पालखीमें मे गरीबकूं बैठनेकूं बोलते हो ये सच्च सच्च कह देना.

सीपाही—अरे दिवानी डरती क्यौं? मैं कहता हूं के तेरेपर खुदाकी मेहर है, वास्ते अबतख तेरा बचाव हो गया है. उस्सेभी तेरी डर न जाती! अबि फेर कहता हूं के तेरा जान और तेरी आबरू बच गई; थोडे मुदतसें तेरा सब कुच अच्छा हो जावेगा. अब तो हुवा?

मोहना—साहेब, ऐसा छुपाके मत बोलो, उसमें मेरी समझ होती नहीं, वास्ते उसका खुलासा करके लाचारीकूं कहना.

सीपाही—अरे खुलासा इतना है के सरकारके दिलमें ए चोरकूं नशियत करकर तेरी आबरू बचाना.

मोहना—ए आपकुं किसपरसे मालूम हुवा?

सीपाही—ओ कहनेका हमकूं हुकूम नहीं, चलो जलदी, बैठो, बख्त बहोत हो गया.

मोहना—भाई, जादा नहीं कहनेका तो नहीं, लेकिन इतनी खबर करना के, मेरा जी और आबरू बचेगा या नहीं?

सीपाही—तूं मरनेकी नहीं, ना तेरी आबरू बी खो जायगी, वे मै पक्का तुजकूं कहता, किसपरसें के मैं अपना सरकारका बडे भरोंसेका नौकर हूं वास्ते, और दूसरा ऐसा है के, जिसकूं वे मुपारेमें रखा जाता उसकूं डर नहीं ऐसा समजना.

मोहना—या भगवान. तूमारेपर भगवत मेहर करेंगा और हमारे जैसे लाचारोंका बचाव तुमारें हातसे हो जावेगा. देखो भाई मै भगवानकी याद करके कहता हूं मेरे हातसें बिलकूल गुन्हा हुवा नहीं, और मै तौर छोडके चलीही नहीं, तो भी मेरी मौत नजीक आके मुझकूं खाने चाहती थी, लेकिन आज अपनेसें हमारा बचाव हो गया, महाराज, इस माफिक थोडे देरतख मोहना ओ सिपाही लोगोंके पास बाता किये बाद पालखीमें बैठी नें ओ पालखी और कैद कियेला आदमी वे दोनोंकूं लेके सिपाही लोग अपने मालिकके वहां चलने लगा.

---

## भाग दहावा.

### शिखरिणी.

मदाचें हें ठाणें, तनुप्रति उठाणें करितसे ॥
मदें श्रीचें जाणें, जयकृति विजाणें गमतसे ॥
मदा योगें जाणें खगपतिच जाणें त्रिभुवनीं ॥
नरी जीवा,वाणें,मदन;फल बाणें स्वभवनीं ॥

अर्थ—अभिमानाचें सान्निध्य, हें तुझ्या देहाला क्षणांत नष्ट करणारें आहे; अभिमानानें लक्ष्मी आणि कीर्तीची शोभा ही लवकर लय पावतात; अभिमानाचें वर्तन हें प्रत्यक्ष स्वत: गरुडही जाणत आहे; यासाठीं, हे जीवा ! या अहंकाराचा त्याग कर, तो तुला फलप्रद होणार नाहीं.

याप्रमाणें त्या दुष्ट मनुष्यास कैद करून व मोहनेस तिच्या लहान बालकासह पालखींत घालून ते शिपाई लोक त्यांस आपल्या वरिष्ठाकडे घेऊन गेले.

आतां आपण नीरेश्वराकडे वळूं. तो बिचारा मोहने-

च्या विरहानें चिंताग्रस्त होऊन, रात्रंदिवस झुरणीस लागला. झोंप कशी ती त्यास बिलकुल येईना. अशावेळेस मादक नांवाच्या एका मनुष्यानें नीरेश्वराची मर्जी संपादन करून त्याची मैत्री जमविली. हा स्वभावानें जरी गर्विष्ट असून दारूबाज होता, तरी नीरेश्वरास यांपैकीं त्याचें कांहींएक माहीत नव्हतें. दुःखामध्यें असलेल्या मनुष्याजवळ जसे त्याचे मित्र अथवा सोयरे जाऊन त्यास उपदेश करतात, त्याप्रमाणेंच मादक हा नीरेश्वराजवळ जाऊन त्यास समजावूं लागला. तो ह्मणाला, महाराज, तुह्मीं असेच सदासर्वकाळ दुःख करीत बसल्यास कसें बरें होईल? जीवास मात्र व्यर्थ क्लेश करून घ्याल. आपण कसेंही करून मोहनेविषयींचे विचार मनांतून काढून टाका. विचार जात नसल्यास मी एक उपाय सांगतों तो करून पहा, ह्मणजे तिचा विसर पडेल यांत संशय नाहीं. आपण उत्तम प्रतीचें मद्य आणून तें घ्यावें ह्मणजे तिच्या निशेंत तुह्मीं सर्व विसराल, व जीवासही सौख्य होईल. ही इतकी गुणकारी आहे ह्मणून आदिमाया देवी हीस तिचा नैवेद्यही दाखवितात. पुराणांतरींही हिचें वर्णन केलें आहे. फार लांब कशाला, आपण घेतल्यावर अनुभव कळेल. तिचा अमल असे तोंपर्यंत सर्व दुःख विसरून जाऊन तुह्मी प्रत्यक्ष काळाचीही पर्वा करणार नाहीं. आपणास वाईट ह्मणण्याची तर कोणाचीही माय व्याली नाहीं, कारण राजाचें प्रेम तुमच्या गायनविद्येनें व शुरत्वानें तुह्मांवर फारच बसलें आहे. चला तर माझ्याबरोबर. असें ह्मणून त्यास खोलींत नेऊन मादकानें बरेंच मद्य पाजिलें, तें घेण्यास पहिल्यानें त्यास जरी जड गेलें, तरी दिवसेंदिवस त्यास त्याची

अगदीं संवय पडत चालली. याप्रमाणें मादकानें नीरेश्वराच्या दु:खाचा विसर पाडण्याकरतां त्यास आपल्याप्रमाणें दारूबाज बनवून टाकिला. त्या नादानें नीरेश्वर नेहमीं कैफांत गुंग राहून कोणासही जुमानीनासा झाला. आपल्यासारखा शूर व गाणारा कोणी नाहीं ह्मणून त्यास गर्व फार झाला, आणि आपणच आपणा स्वतःला वाखाणूं लागला. याचा परिणाम असा झाला कीं, एकेदिवशीं राजाकडे सणानिमित्त मोठा जलसा झाला, त्यांत नीरेश्वर गावयास बसला; तों त्याचा आवाज चांगला न येतां त्याचें तें गाणें कमी प्रतीचें ठरून दुसऱ्याचें गाणें पसंत ठरलें. दारू पिण्यानें नीरेश्वराचे आवाजास अपाय झाला, आणि तेणेंकरून त्यास स्वर पहिल्याप्रमाणें आळवितां येईनात. आपली अशी फजिती झाली हें पाहून नीरेश्वरास फारच वाईट वाटलें, पण काय उपयोग ! त्याचा जिवलग मित्र मादक येऊन त्याची समजूत करूं लागला कीं अहो, तुह्मांस याच्यांत वाईट वाटण्याजोगें तें काय झालें ! त्यावेळेस तुमचा आवाज कोंवळा असल्याकारणानें चांगलें गातां येत होतें, ह्मणून तो नेहमीं तसाच का राहणार आहे ? दिवसेंदिवस तुमचा आवाज जून होणारच, मग उगाच खंती होण्यांत हांशील नाहीं. चला आपण उत्तम मद्याचे दोन तीन घोट घेऊं ह्मणजे सर्वांची विस्मृति होईल. इतकी फजिती झाली तरी नीरेश्वराचा गर्व कांहीं कमी झाला नाहीं. मादकाचा उपदेश त्याच्या मनावर बळकट उमटला व तो स्वतः आपली समजूत करून घेऊं लागला कीं, मादकानें सांगितलेली गोष्ठ खरी आहे; मनुष्य जसजसा मोठा होतो ( वयांत येतो ) तसतसा त्याचा

कंठ बिघडतो; पण आपण त्याची कां पर्वा करावी? माझ्या समोर लढण्यास तर कोणाची छाती होणार नाहीं; अशा घमंडींत अभिमानानें तो राहूं लागला. दुर्दैवानें एके दिवशीं असें झालें कीं, राजपुत्र शूरसेन यानें नीरेश्वरास कांहीं कामाकरितां दोन तीन बोलावणीं पाठविलीं, परंतु तो गेला नाहीं, ह्मणून स्वतः नीरेश्वरास बोलवण्याकरितां आला, तरी त्यास जसा मान द्यावा तसा न देतां, मला यावेळेस फावत नाहीं असा उलट जबाब दिला. हें ऐकून राजपुत्रास फार संताप येऊन त्यानें आपल्या पित्यास जाऊन सर्व वर्तमान कळविलें, आणि त्यास सांगितलें कीं ह्या त्याच्या कृत्याबद्दल मी त्याजबरोबर द्वंद्व युद्ध खेळणार. जर मी नीरेश्वरास त्यांत हरविलें तर सेनेचें आधिपत्य मला देऊन त्याला माझ्या हाताखालीं ठेवावें. राजानें आपल्या पुत्रास नीरेश्वराच्या शूरपणाविषयीं पुष्कळ सांगितलें, व ह्मणाला, बाळा, त्याजपुढें तुझ्यानें टिकाव धरवणार नाहीं. व्यर्थ तूं अशा खटपटींत कां पडतोस? पाहिजे असल्यास दंडाची वगैरे दुसरी शिक्षा मी त्यास करतों.

शूरसेनास नुकतेंच अठरावें वर्ष संपून एकोणिसावें लागलें होतें. डावपेंच वगैरे त्यास सर्व अवगत होते. नवें रक्त असल्याकारणानें त्याचा जो अपमान झाला तो त्यास असह्य होता. आपणापेक्षां कोणी शूर नाहीं अशा घमंडीनें आपला अपमान केला हें तो पक्कें जाणत होता. त्याची कशी तरी एकदां खोड मोडावी ह्मणून बापाजवळ राजपुत्रानें त्याजबरोबर द्वंद्व युद्ध करण्याचाच हट्ट घेतला. निरुपायास्तव नीरेश्वरास राजानें आपल्या पुत्राबरोबर द्वंद्व युद्ध करण्याचा हुकूम पाठविला, तेव्हां त्यास येणें भाग पडलें. युद्धाची

जागा राजवाड्याच्या अंगणाबाहेर केली होती. सर्व शहरांत ही बातमी पसरल्यामुळें हजारो लोक तेथें जमले. नीरेश्वरास हुकूम मिळाल्याबरोबर त्यानें मद्याचे दोन तीन पेले झोंकून तो नेमलेल्या ठिकाणीं युद्धास गेला. नीरेश्वराचे डोळे रागानें लाल होऊन गेले होते. याची काय बिशाद, यास आपण तेव्हांच हरवून टाकूं अशी त्याची खात्री होती. राजपुत्राचीही तशीच स्थिति झाली. त्यासही अपमान सहन न होऊन केव्हां याजबरोबर युद्ध जुंपून याचा पाडाव करून यास खालीं पाहायास लावीन असें त्यास झालें होतें. नेमलेल्या वेळीं दोघांचें युद्ध सुरू झालें. पट्टयांचे दोन हात होऊन बऱ्याच झटपटी झाल्या, पण कोणी कोणास आटपेना. शेवटीं शूरसेनास मोठा आवेश येऊन लढतां लढतां एक पेंच असा मारला कीं त्यासरशीं नीरेश्वराला भुईवर आदळलें, आणि जमलेले सर्व लोक शाबास शाबास ह्मणून मोठ्यानें गर्जना करूं लागले. याप्रमाणें शूरसेनानें नीरेश्वराच्या गर्वाचें हरण करून सेनापतीची जागा मिळविली; कारण द्वंद्व युद्ध लागण्याच्या अगोदर जो जिंकील त्यास ती जागा देण्याचें ठरलें होतें. ठरावाप्रमाणें राजानें मुख्य सेनापतीची जागा आपल्या पुत्रास देऊन नीरेश्वरास त्याचे हाताखालीं ठेविलें. आतां मात्र नीरेश्वराची मद्याची निशा अगदीं उतरली व मादकांच्या संगतीस लागून असा वाईट परिणाम झाला, अशी त्याची खात्री झाली. त्यास आपण राजपुत्राच्या हाताखालीं राहिलों ह्मणून फार वाईट वाटून याचा सूड कसा उगवावा ह्मणून विचार करूं लागला. या मसलतींत त्याचा एक द्वेषक नांवाचा शिपाई त्यास साह्य झाला. त्यानें नीरेश्वरास

या कामांत उत्तेजन दिलें. तो ह्मणाला, महाराज, ज्या जागीं तुमचें एकदां आधिपत्य होतें त्या जागीं परक्यानें येऊन त्याच्या हाताखालीं आपण राहणें हें मोठें लांछनास्पद होय. मी ह्याचा कांटाच मोडून टाकला असता परंतु तो आपल्या सरकारचा एकुलता एक पुत्र असल्याकारणानें तसें करवत नाहीं. तरी मला एक युक्ति सुचली आहे ती अशी कीं या शहरांत एक मोठा देव भगत आहे तो असा कांहीं मंत्र करून देईल कीं तेणेंकरून त्या जागेवरून त्यास पळावेंच लागेल. चला उठा आतां, लांबणीवर टाकून उपयोग नाहीं. आपणच त्याजकडे जाऊं.

## भाग अकरावा.

( अनूत्या, देवभगत, नीरेश्वराचा शिपाई आणि इतर शहरवासी लोक. )

अनूत्या एका पाटावर सर्व आंगास राख लावून एक भगवी लंगोटी नेसून व तसेंच एक भगवें वस्त्र आंगावर पांघरून बसला होता; त्याच्या समोर एक चौरंग असून त्यावर तांब्याच्या चित्रविचित्र मूर्ति शेंदरांनीं भरून ठेवल्या होत्या; भिंतीवर वेताळ, शंखिनी, डंखिनी यांचीं चित्रें काढलीं होतीं; एका बाजूस खिळ्यावर काळे दोरे व ताइती ठेवल्या होत्या; जवळच एक शेगडी असून त्यांतून उदाचा वास येत होता; आजुबाजूस निरनिराळ्या जातींचे पुरुष असून बायका पुष्कळच होत्या; अशावेळीं एक एक मनुष्य पुढें येऊन त्या भगताबरोबर बोलूं लागला.

रामा—देवऋषी, तुमच्या मी पायां पडतया, माझ्या गळ्याच्यान्, असलो देव मी खंयसरपन बगीतलो नाय; गुन पन कसो ढीकाक तेल लावल्यांसारखो. कालचो अंगारो

लय सरस. माझ्या वयनीचं दुखणंबिखणं संमदं पार झालं. पन बाबा मी गरीब आसयहो. संभालुनशेनी ध्या.

अनृत्या भगत–अरे पण तुला कसा गुग हटकून दिला? तूं गरीब आहेस ह्मणून थोडक्यांतच सांगतों, एक कोंबडा, पांच नारळ, दोन लिंबें, व सवाशेर दारू ही त्या देवास दिल्याशिवाय चालणार नाहीं. उद्यां संध्याकाळीं अमावास्ये-चे दिवशीं जरूर घेऊन ये. तुला ताईत भारून देईन, ह्मणजे कधीं तुझ्या वयनीला भय नाहीं.

कृष्णराव–रामराम हो, बावा, रामराम. काल आपली ताईत नेली, आंगारा लावला, व आपण सांगितल्याप्रमाणें सवा रुपया पण मुंजाच्या नांवानें उचलून ठेवला पण अझून कांहीं माझ्या भावजईच्या आंगांतलें भूत गेलें नाहीं. आतां बावा काय सांगतां?

अनृत्या–अरे बावा, तें साधारण भूत नाहीं, तो एक जबरा खापरी आहे. त्यास त्याचें खाणें मिळाल्याशिवाय तो उगी राहावयाचा नाहीं. कशी काय तुमची मर्जी आहे! देण्यास कबूल होतां ?

कृष्णराव–असलं खाणं तरी कसलं तें मला कळूं द्या.

अनृत्या–कांहीं फार नाहीं. एक बकरा, एक कोंबडा, दोन पांव, आणि एक बाटली दारू इतके जिन्नस अमावा-स्येचे दिवशीं मजकडे आणा, आणि मग बगा, मी त्याची कशी खोड मोडतों ती !

गचाळशेट वाणी–रामराम बावाजी, मने पेलो साव-कार हजी पण गांठतो नथी. में पेली आपेली बभूति तेना धोतीआने लगाडी, पण हजी कंई वळतूं नथी. हवे बोलो महाराज तमे हवे सूं कहोछ ?

अनृत्या–शेट साहेब, ह्याचा गुण एक दाडांत येणार नाहीं, त्याला जरा वखत जोये. बे दाडा पछी बगा कसा तुह्माला गुण दाखवतो. पण मग हमारे देवीने एक साडी, बे चोळी, आणि एक पुतळी देयाला पाहिजे हो !

गचाळशेट–हो, हो, अलबत आपीशूं, तेनी शी फिकर छे?

कनैयासिंग–राम राम बुवाजी, हमारे भाईकूं ताप बिलकूल छोडता नहीं, उसका क्या सबब है? अपनेपास कल आया था तो तुम थोडा बभूत दिया पन, उस्सें कुच फायदा नहीं जानता.

अनृत्या–महाराज, तुम समजण्या नहीं, तुमारा कोणी जात बरादरीनें ए अंगवण करण्या, उसकू जो तुम पांच रूपयांचा देवकेपास मांड भरण्या तो मग तुम देखो तुमच्या भाईकूं कैसा गुण येण्या.

सटवीबाई–बुवाजी, तुह्मी सांगितल्याप्रमाणें मी ती चिठी नवऱ्याच्या खाण्यांत घातली, आतांशीं ते बाहेर जात नाहींत, त्यांचं बाहेर जाणं अगदीं बंद झालं ह्मणजे नवस केलेला जोड्यानं येऊन फेडीन.

बुवांचा शिष्य–( तेथील राहिलेल्या मंडळीस ) सर्व लोक चूप बसा, आतां बुवाचे आंगांत देवाचें वारें येणार आहे, कोणास कांहीं विचारायाचें असल्यास विचारून घ्या.

बुवाजी आपल्या समोर धूप घालून, आंगास पीळ घालूं लागले, डोकें हालवूं लागले, आणि हुंहुं-हुंहु ह्मणून पाटावर बसून हात हालवूं लागले.

इतक्यांत एक बाई आपल्या सुनेस घेऊन आली. तिनें

तिला बुवाच्या पायां पडण्यास सांगून आपण त्याजजवळ बोलूं लागली. देवा महाराज्या, मी तुझी कीर्ति ऐकून तुझ्या चरणांजवळ आल्यें आहें. ह्या माझ्या सुनेस न्हाण येऊन दोन वर्षे झालीं, ही अझून गरवार राहत नाहीं, तर याचें कारण काय हें कृपा करून सांगा.

बुवाजी–मी–मी–मी, हुंहुं–हुंहुं, तु–तुला स–स–सांगतों कीं, तुझ्या सु–सु–सुनेला हुंहुं–हुंहुं एक पिंपळावरचा मु–मु–मुंजा लागला आहे, तो तु–तु–तुमची संतती वाढूं देत नाहीं, हुंहुं–हुंहुं–हुंहुं.

बाई–मग ह्यास उपाय काय करावा तो सांगाल किं नाहीं?

बुवाजी–त्याचा उपाय म–म–माझ्या झ–झ–झाडाला हुंहुं–हुंहुं विचार, ह्मणजे स–स–सांगेल, सध्यां हा आंगारा तिला प–प–पाण्यांत पिण्यास दे, म–म–ह्मणजे थोडा गुण येईल.

द्वेषक–जयदेवा महाराज्या, या चाकराचा एक अर्ज आहे, कृपाकरून सांगण्याची आज्ञा होईल तर सांगतों.

अनृत्या–तु–तु–तुझा काय अर्ज आहे स–स–सांग पाहूं.

द्वेषक–महाराज्या, माझ्या धन्याची चाकरी दुसऱ्यानें विश्वासघातानें बळकावून घेतली, आणि त्याच्या हाताखालीं आमचे धनीसाहेब आतां काम करतात; व हल्लीं त्यांच्या जिवास बरें नाहीं; कधीं कधीं तोंडावाटें रक्त पडत असतें; तर देवाजवळ माझें एवढेंच मागणें आहे कीं दुष्टाचें पारिपत्य करून त्याची जागा त्यास परत मिळावी व जिवास बरें वाटावें.

अनृत्या–हुं हुं–हुं हुं, अरे, त्याला कोणी मूठ मारली

आहे, आणि त्याला आ–आ–आंगवण करून त्याची चा–चा–चाकरी पण घेतली स–समजलास? तूं म–म–म–ला शरण आलास हुं हुं–हुं हुं ह्मणून आतांच ती मूठ परतवतों, याचा अनुभव बगा. हुं हुं–हुं हुं–जा लौकर दोन लिंबु, नारळ, सुपारी आणि हुं हुं–हुं हुं चांदीचें नाणें इतकें आण, हुं हुं– हुं हुं मग माझा चमत्कार बघ.

द्वेषक–( सामान अगोदर आणलेंच होतें तें पुढें ठेवून ) महाराज्या, आपल्या सांगण्याप्रमाणें जिन्नस तयार आहेत.

अनृत्या– हुं हुं–हुं हुं, सर्व सावध असा. असें ह्मणून चाऱ्ही बाजूंस–चार दिशेस–तांदूळ मारतो व हातांत दोन लिंबें घेऊन त्यांस धूप दाखवून तोंडानें वेडेवांकडे मंत्र उच्चारून एक दोन मोठ्यानें किंकाळ्याही मारल्या, व तीं दोन्ही लिंबें त्या द्वेषकाच्या हातांत देऊन कापण्यास सांगितलीं. तों त्या लिंबांतून रसाच्या मोबदला रक्त येऊं लागलें. हें पाहून सर्वांस मोठा चमत्कार वाटला, व देवाच्या खरेपणाविषयीं त्याची खात्री झाली.

द्वेषक–जयदेवा महाराज्या, खरोखर कोणी दुष्टानें माझ्या धन्यास मूठ मारली यांत संशय नाहीं, त्याचा गुण तर दिलात, परंतु माझ्या धन्यास पूर्वीचा हुद्दा परत केव्हां मिळेल?

अनृत्या–हुं हुं–हुं हुं तें माझ्या झाडाला विचार ह्मणजे तो स–स–सांगेल. हुं हुं–हु हुं; आतां मी येतों. असें ह्मणून अनृत्यानें आंग सोडलें ( ह्मणजे जमिनीवर पडला ) व पांच मिनिटांनीं जसें झोंपेंतून उठावें तसा उठून बसला. भोंवतालची द्वेषक शिवाय सर्व मंडळी निघून गेली. अनृत्या पहिल्याप्रमाणें शुद्धीवर येऊन तो द्वेषकास देवानें

काय सांगितलें ह्मणून विचारूं लागला. द्वेषकानें सर्व वर्तमान सांगून आतां राजपुत्र सेनापतीच्या जागेवरून दूर होण्यास कोणता उपाय करावा, तो देवानें तुह्मांस सांगण्यास सांगितलें आहे, याकरतां कृपा करून एकदांचें सांगा; ह्मणून विनवण्या करूं लागला.

अनृत्या–माझ्या देवानें लिंबांतून रक्त काढलें, त्यावरून असें समजा कीं मूठ तर फिरवली परंतु राजपुत्रास त्या जाग्यावरून दूर करण्यास दोन युक्त्या आहेत. एक त्यास वेड लाववें, किंवा आजारी पाडावें ह्मणजे आपोआप ती जागा परत तुझ्या धन्यास मिळेल. यास खर्च फार नाहीं. मी सांगतों तेवढ्या जिनसा आणून दे ह्मणजे झालें.

द्वेषक–त्या कोणत्या ?

अनृत्या–पांच शेर पांच तऱ्हेचे दाणें, पांच बकरीं, पांच कोंबड्या, पांच शेर शेंदूर, पांच शेर सुपारी, पांच फळें, पांच लिंबें, पांच खिळे, पांच शेर दारू आणि पांच रुपये इतकें घेऊन ये ह्मणजे मांड भरून तुझें काम पक्कें करतों.

द्वेषक–बरें तर, हें सामान आतां बाजारांतून जाऊन आणतों, मग आपलें काम पक्कें ना !

अनृत्या–हो हो, तें विचारूंच नका. चल झटपट कर.

[ याप्रमाणें सामान आणण्याकरितां द्वेषक बाजारांत जाण्यास बाहेर पडला, आणि अनृत्यानेंही आपली कचेरी बरखास्त केली. ]

---

## भाग बारावा.

### श्लोक ( शिखरिणी. )

मनद्वेषामाजी, सखपण यमाजीस घडतें ॥
जगद्रोही राजी, रिपुसम विराजीत घडतें ॥
हिरण्याक्ष स्वाजी शिशुपहि कसा जीव मुकला ॥
तरी हे षड्वाजी, त्यजिं असू भवा जीण. विकला ॥

अर्थ–जें मन द्वेषवुद्धींत सर्वदा निमग्न राहतें, त्याचें यमाकडे दर्शन होतें; जगाचा द्रोह करण्याला जें प्रवृत्त असतें तें रिपुप्रमाणें मानिलें आहे; पहा, हिरण्याक्ष, हिरण्यकशिपु, शिशुपाळ हे राज्याला अंतरून प्राणासही मुकले; तर ह्या अश्वरूप षड्रिपूंचा तूं त्याग कर, कारण तुझा प्राण ह्या संसारालाच आपलें जिणें विकला.

याप्रमाणें द्वेषक त्या भगतास सांगून जो निघाला तो थेट नीरेश्वराकडे आला. आणि देवानें सांगितलेलें सर्व वर्तमान त्यास कळविलें आणि ह्मणाला, दादा, जर देवानें ती मूठ लिंबांतून उतरली नसती, तर आज आपली काय अवस्था झाली असती तें सांगवत नाहीं. मी त्या सर्वांचा आतां पक्का बंदोबस्त करून आलों आहें, व तुह्मांस या दशेस आणणाराचें पारिपत्य करण्याकरितां व तुमचा हुद्दा परत मिळण्याकरितां थोडासा खर्च सांगितलेला आहे तितका आपण दिलात कीं आपलें काम पक्कें झालें. नीरेश्वरानें जेवढा पैसा खर्चास लागेल तेवढा दिला. द्वेषक बाजारांतून सांगितल्याप्रमाणें सामान घेऊन भगताकडे गेला. भगतानें तें सर्व सामान घेऊन, एक ताईत नीरेश्वराचे गळ्यांत बांधण्यास, चार लिंबें चार दिशेस फेंकण्यास, आणि

चार खिळे चार रस्त्यांस ठोकण्यास द्वेषकाजवळ दिले, आणि, आजपासून नीरेश्वरास बरें वाटून, त्याचा प्रतिस्पर्धी असेल त्यास वेड लागल्यासारखें होईल आणि मग अर्थातच त्याची जागा त्यास परत मिळेल असें सांगितलें. भोळे व देवेवेडे लोक जसे अशा पोटभरू भगतांवर विश्वास ठेवून आपल्या वाईट व बऱ्या इच्छा तृप्त करून घेण्यास इच्छितात त्याप्रमाणें द्वेषक व नीरेश्वर यांस त्यांच्या मर्जीनुरूप कामें होण्याकरितां ताईत मिळाली, तरी राजपुत्राविषयीं त्यांचा द्वेष फारच असल्याकारणानें, त्याच्या दुष्टपणाची व आपणास भगताकडून गुण मिळाल्याची बातमी ज्यास त्यास ते मोठेपणानें सांगत; तेणेंकरून नीरेश्वर पूर्वी जितका लोकांस प्रिय होता, तितकाच तो आतां त्यांस अप्रिय झाला. ह्याचें कारण निरूपद्रवी राजपुत्राचा द्वेष हें होय. नीरेश्वरानें लोकांस सांगितलेल्या गोष्टींचा जिकडेतिकडे गवगवा झाला, व त्या गोष्टी थेट राजा व राजपुत्र यांच्या कानापर्यंत पोंहोचल्या. मग काय विचारावें? त्या ढोंगी भगतास एकदम चतुर्भूज करून आणिलें; व तसेंच नीरेश्वरास जरूर बोलावणें पाठवून त्यास व त्याचा शिपाई द्वेषक यास दरबारांत आणविलें. राजानें भगतास पुष्कळ धमकी देऊन खरी हकीकत सांगण्यास सांगितलें. त्यामुळें त्याचा नाइलाज होऊन तो ह्मणाला, महाराज, हा सर्व आमचा देवभोळे लोकांस फसवून पोट भरण्याचा धंदा आहे. कांहीं तरी बनावट लोकांस सांगून त्यांजजवळून पैसे उपटावे याशिवाय याच्यांत खरेपणा किंवा देवपणा कांहींच नाहीं. द्वेषकास जास्त विश्वास पटावा ह्मणून अगोदर कापशीचा रस लावून ठे-

वलेल्या चाकूनें त्यास लिंबें कापून दाखविलीं तेणेंकरून त्यांतून लाल रस आला, तें त्यास रक्त असें भासलें. मूठ-बीठ वगैरे कांहीं नाहीं. शंखिणी डंखिणी तर मुळींच नाहींत. हा सर्व संशय आहे. मी आपलें पोट भरण्यासाठीं कांहीं तरी नीरेश्वराचे चाकरास सांगून थोडेंसें द्रव्य व लागलेल्या जिनसा घेतल्या. नीरेश्वर दादा माझे घरीं कधींही आले नाहींत, परंतु त्यांचा चाकर द्वेषक मात्र मज-कडे येऊन धाकटे सरकारास भूत लागावें किंवा वेड लागावें ह्मणून माझ्या देवाची मदत मागे. माझ्या मनांत आपले धाकटे सरकारच्या वाइटाविषयीं बिलकुल हेतु नाहीं हें शपथ घेऊन सांगतों. नीरेश्वर व द्वेषक हे मान खालीं घालून, दरबारांत जें कांहीं बोलणें चाललें होतें तें निमूट-पणें ऐकत होते. राजानें नीरेश्वरास कांहींएक न विचारतां त्यास कडक शिक्षा देण्याचें मनांत योजिलें, परंतु मोहसे-नाच्या मध्यस्थीवरून, व त्याच्या पूर्वींच्या हुशारीवरून फक्त ४ महिन्यांची हद्दपार जाण्याची शिक्षा त्यास दिली, आणि अनृत्या भगत यानें फिरून देवभोळे लोकांस फसवून असें बंड माजवूं नये ह्मणून त्यासही सहा महिन्यांची कैदेची शिक्षा दिली. द्वेषक ह्यास एक महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा देऊन त्यास पुनः असें काम केल्यास याहूनही जास्त शिक्षा मिळेल, ह्मणून सांगितलें. याप्रमाणें त्रिवर्गांची त-जवीज करून राजानें कचेरी बरखास्त केली.

---

## भाग तेरावा.

ह्या जगांत ईश्वरानें अशा कांहीं चमत्कारिक घडामोडी बनाविल्या आहेत कीं त्या पाहिल्या किंवा ऐकिल्या असतां

मनुष्यमात्राची मति थक्क होते. हरएक वाईट आणि चांगल्या वस्तूही त्यानेंच बनविल्या आहेत. परंतु सोनें ज्याप्रमाणें कसास लावून परीक्षक त्याचे खरेपणाविषयीं खात्री करून घेतो, तद्वत् ईश्वरानें मानवी प्राण्यांस कसोटीस लावून पाहण्याकरितांच वाईट वस्तु किंवा चांगले गुण उत्पन्न केले असावेत, असा कांहीं लोकांचा समज आहे. कारण सर्वच चांगल्या वस्तु बनविल्या असत्या व सर्वांसच चांगले गुण दिले असते, तर एवढा सृष्टीचा अवाढव्य व्यापार न वाढून सर्वच सज्जन अथवा साधु ह्मणजे प्रति ईश्वरच बनले असते. आतां जन्मतः सर्व मनुष्यप्राण्यांस चांगले गुण किंवा चांगल्या वस्तु समजणें हें अशक्य होय; तरी त्या समजण्यास साधनें करून ठेविलीं आहेत. एक वडिलांनीं किंवा साधूंनीं सांगितल्याप्रमाणें चाललें असतां, अथवा दुसरें स्वतः वाईट गोष्टी अनुभवून त्याच्या नुकसानाच्या योगें पश्चात्ताप झाला असतां. पहिला प्रकार या संसारांत क्वचित् आढळतो; परंतु दुसरा प्रकार सर्वत्र जारी आहे. या दोहोंतून एकाही प्रकारानें जो मनुष्य शुद्धीवर आला नाहीं, तो ईश्वरकृपेस मुकला असें समजावें.

नीरेश्वरास यावेळेस हद्दपार केल्यामें जसा पश्चात्ताप झाला तसा पूर्वीं कधींच झाला नव्हता; कारण तो अनुभवसिद्ध होता. त्याला सर्व सोबत्यांनीं सोडून दिलें. तो एकटाच आपली पूर्वीपासून सर्व स्थिति मनांत आणून रडूं लागला. त्यास सर्व संसार दुःखकारक व भयंकर दिसूं लागला; ह्मणून राहिलेले आयुष्याचे दिवस त्यानें एकादे अरण्यांत काढण्याचें योजिलें. मनांत आल्याप्रमाणें नीरेश्वर एके दिवशीं अरण्यांतून भटकत असतां, एका नदीवर कोणी एक

महंत साधु स्नान करतांना त्यानें पाहिला. त्यास पाहिल्या-बरोबर त्याच्या मनाची स्थिति अगदीं बदलून जाऊन त्यास नमन करावें व त्याच्या तोंडचीं दोन वचनें ऐकावीं असें त्यास वाटलें. ह्मणून त्यानें पुढें जाऊन त्या साधूचे चरणावर मस्तक ठेवून नमस्कार केला. त्या वृद्ध साधूनें त्यास पाहून आशीर्वाद दिला, आणि " मुला, तुला या अरण्यांत येण्याचें कारण काय व तूं कोणीकडे चाललास ?" ह्मणून प्रश्न केला. हा प्रश्न ऐकून नीरेश्वरास रडें कोसळलें, व मोठा कळवळा येऊन त्यानें आपली पूर्वीची सर्व हकीकत सांगितली. तो ह्मणाला, मी एका सावकाराचा मुलगा आहें. मी वयांत आल्यावर या संसारांत कोणी तरी माझ्या बरोबरीचा आपला जिवलग मित्र असावा ह्मणून मदन, कोपेश्वर, लोभेश्वर, मोहक, मादक, आणि द्वेषक यांची संगत केली, परंतु त्यांनीं नांवाप्रमाणें आपल्या गुणांचें जाळें मजवर घालून, मला त्यांत गुंतवून फसविलें. हाय ! हाय !! जरकरतां मी त्यांच्या जाळ्यांत फसलों गेलों नसतों, तर आज माझी अशी स्थिति कां झाली असती ! मी त्यांच्या संगतीस लागून अविचारानें कामी, क्रोधी, लोभी, आशेखोर, गर्विष्ट, मद्यपी, द्वेषी, असा बनून गेलों. हाय ! हाय !! तेणेंकरून माझ्या वृद्ध मातापितरांचे नांवास व कुलास बट्टा मात्र लाविला. माझ्या प्राणाहून जास्त अशी जी माझी प्रिया व एकुलता एक पुत्र त्यांसही अंतरलों. आतां मला या संसारांत राहून काय करावयाचें आहे? मी त्यास अगदीं त्रासून गेलों, व हा सर्व मला स्वप्नवत् भासत आहे. यावेळेस तुह्मी मला ईश्वरच भेटलां असें मी समजतों. तर कृपाकरून मला या संसार-

रूपी सागरांतून तारा, आणि माझें मन त्या सर्वव्यापी परमेश्वराकडे वळेल असें करा ह्मणजे तुमचे उपकार मी जन्मोजन्म विसरणार नाहीं.

नीरेश्वराची ही स्थिति व त्यास पुरा पश्चात्ताप झालेला पाहून साधूसही वाईट वाटलें. त्याचें हृदय सद्गदित होऊन तो नीरेश्वरास ह्मणाला, बाळा, तुला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला हें ऐकून मला चांगलें वाटतें. परंतु अशा पश्चात्तापानें वैराग्य किंवा ईश्वरप्राप्ति करून घेण्यापेक्षां, गृहस्थानें प्रपंचामध्यें राहूनच ईश्वरप्राप्ति करून घ्यावी हा उत्तम पक्ष होय. कारण तुझीं वृद्ध मातापितरें अझून जिवंत असून त्यांनीं तुजपासून इच्छिलेलें प्रपंचसुख अनुभविलें नाहीं, तुझ्या पत्नीस व इष्टमित्रांस तुजपासून जसा योग्य उपयोग व्हावा तसा झाला नाहीं, व तुझें बहुतेक तारुण्य षड्रिपूंच्या सहवासांत गेलें. असें असतां, सर्वांस दुःख देऊन वैराग्य घेतल्यानें ईश्वर प्राप्त होणार नाहीं, कारण असें ह्मटलें आहे कीं "प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ज्याणें केला। तो नर भला भला" ह्मणून हे नीरेश्वरा, तुला मी उपदेश करतों हा लक्ष देऊन ऐक.

ही सर्व सृष्टि ईश्वराचे इच्छामात्रेंकरून निर्माण झाली आणि तिजमध्यें मायादेवतेस कुलअखत्यार मिळून नानातऱ्हेचे खेळ करण्यास त्याची आज्ञा झाली. मायादेवी अधिकारंनात्यानें प्रत्यक्ष ईश्वराची कन्या असून, जगत्सूत्र तिच्या हातीं येऊन राहिलें, त्यामुळें ती सृष्ट जगाची कार्यापुरती अधिकारपरत्वें स्वामीण झाली. मायादेवीचा अमल जमिनीच्या पृष्ठभागावर चालत नाहीं असें एकही स्थळ सांपडणें दुर्मिळ. जगाची स्वामीण माया आहे आणि ती

सर्वाकार, निर्विकार, निराकार परमेश्वराची शक्तिरूप कन्या सर्वाधिकारसंपन्न व निराकारत्वानें सर्वत्र व्यापली आहे. ह्मणून जगाचे कारभार सुरळीतपणें चालून त्यांत नेहमीं मोठमोठाल्या वडामोडी होत असतात. मायेनें मोह उत्पन्न होतो, आणि मोहाचें इच्छारूप देहावर जाळें पसरतें, आणि त्या जाळ्याच्या भारानें देहेंद्रियें ज्ञानशून्य होऊन नेत्र असतां अंध होतात व कर्ण असतां बधिर होतात. अशा मोहपटलेंकरून अंध व बधिर झालेल्या देहांत देवीचें पूर्ण तेज प्रगट होतें. त्या तेजेंकरून एक वार देह भुलला अशी मायादेवीची खात्री होण्याबरोबर ती आपलें तेज काढून घेते, आणि त्या देहास सोडून देते. मायारूप देहांतून नाहींसें होण्याबरोबर देह फिक्का पडून जातो, आणि मोहजालाचा भार नाहींसा होऊन पश्चात्तापरूपानें अज्ञानांधत्व नाहींसें झाल्यासारखें होतें. मग मात्र अशा प्रकारें एकाएकीं आपली स्थिति कां झाली या गोष्टीच्या विचारात तो देह लागतो. अशा प्रकारच्या विचारांत तो गुंतला असतां ईश्वरी अगाध लीलेची कल्पना त्याच्या मनांत उद्भवून त्यांत त्याला मायेची आठवण होते आणि तीसरसा हरहर शब्दाचा उच्चार करून मायेनें फसलों रे फसलों असें तो ह्मणतो. तस्मात् माया ही अनिवार आहे, असा त्याला पहिल्यानें भास होतो. परंतु व्यवहारांत मायेवांचून चालणारा एकही प्राणी आढळत नसून जगतांत जिकडेतिकडे मायाच पसरलेली दिसते.

माया ही शक्तिरूप असल्यानें पदार्थाप्रमाणें प्रत्यक्ष दाखवितां येण्यासारखी नाहीं. तिचें स्वरूप आणि शक्ति हीं फक्त अनुभवानंतर विचारानें ओळखून घेतलीं पाहिजेत.

सर्व माया आहे अशा विचारानें अनुभव घेण्यास जीव समर्थ नाहीं. जितकें जितकें वेळेपुरतें दिसतें तितक्या तितक्यालाच माया ह्मणतात. ह्मणून माया ह्या शब्दाचा व्यवहारांत एकच अर्थ नाहीं, पाहिजे तिकडे या शब्दाचा उपयोग करतां येतो. पुत्र किंवा कन्या मेली असतां आईबाप, दाईज व गोत्रज रडतात, त्या रडण्यास माया ह्मणतात. एकादा पुरुष किंवा स्त्री एकमेकांवर लंपट होऊन गेलीं असतां अनेक अनर्थ घडून येतात परंतु त्यांचें मूळ लंपटपणा मायाच होय. द्रव्यलोभानें जो चोरी करितो, दरवडा घालतो, खून करतो, अभक्ष्य भक्ष्य विचार सोडतो, व धर्मांतर करतो, त्या ठिकाणीं द्रव्यलोभास माया ह्मणतात. एकादी गोष्ट अकस्मात् घडून आल्यास त्या गोष्टीच्या घडण्यास माया ह्मणतात. सारांश, काम, क्रोध, मोहादि विकार उत्पन्न होण्याचे बीजास माया असें ह्मणण्याची व्यवहारांत रूढी पडली आहे.

ईश्वराच्या स्वरूपाविषयीं किंवा त्याच्या आस्तित्वाविषयीं एकंदर जगाला काय अनुभव आहे या गोष्टीचा विचार करूं लागलें असतां, जग ईश्वराविषयीं अगदीं अज्ञान आहे असें निरभिमानपणें कबूल करणें भाग पडतें. जगाचा उत्पन्नकर्ता कोणी तरी आहे इतकाच काय तो जगाला कल्पनेचा अनुभव आहे, परंतु जगतांतच असणाऱ्या संतमंडळास त्याच्या पूर्ण स्वरूपाविषयीं व लीलेविषयीं अनुभवसिद्ध माहिती आहे. या परस्पर विरुद्ध व अनुभवसिद्ध गोष्टीवरून लोकभ्रम मात्र उत्पन्न झाला. कारण जगाचा पक्ष वाद करण्यापुरता असून अनुभव घेणारास वाट दाखविणारा आहे. जगांत वाक्पांडित्य करणारे

पुष्कळ असून प्रत्यक्षानुभव घेणारे विरळा असल्यानें ईश्वराविषयीं व ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं एकंदर लोकांचीं मनें भ्रमित झालीं आहेत. हा भ्रम सर्वत्र असल्या कारणानें याला लोकभ्रम ह्मणतात. परंतु कांहीं लोक हल्लीं लोकभ्रम कशाला ह्मणतात हें पाहूं गेलें असतां मूर्तिपूजा, पुराणें, भूत, पिशाच, ब्रह्मराक्षस इत्यादिकांवर विश्वास ठेवणें यालाच लोकभ्रम ह्मणतात. तथापि वास्तविक रीतीनें पहातां हा लोकभ्रम नाहीं. कारण जग हें केवळ विश्वासानें चाललें आहे; त्यामुळें ज्याचा ज्याजवर विश्वास त्याच्यावरच्या विश्वासानें त्याचें कार्य होतें; ह्मणून ज्याचा ज्यावर विश्वास नसल्यानें व त्याचा त्याला निरंतर अनुभव येत असल्यानें खोटा ह्मणतां येत नाहीं. एक गोष्ट एकाचे दृष्टीनें एका प्रकारची दिसणें, तीच गोष्ट दुसऱ्यास दुसऱ्या प्रकारची वाटणें, आणि तीच गोष्ट तिसऱ्यास निराळ्या प्रकारची दिसणें, ह्मणजे एकच गोष्ट तिघांस तीन प्रकारची भासणें, हा खेळ केवळ विश्वासाचा आहे. संसारांत राहून सर्व गोष्टींचा अनुभव घेणारा एकादा विरळाच देहाभिमानी उपजला असेल. जे कोणी दुसऱ्याचे विश्वास खोटे ह्मणण्याचें साहस करितात ते बहुधा एखाद्या वर्गांतील लोकांची प्रीति संपादन करण्याकरितांच करितात. कारण दुसऱ्याचा खरोखर असलेला विश्वास खोटा ह्मणण्याचें साहस करितांना जे पुष्कळांच्या दृष्टीस पडत असत तेच लोक त्यांच्या स्वतःवर प्रसंग गुदरला असतां त्या विश्वासांत निमग्न होतांना व घडलेल्या अपराधाबद्दल नाक दोऱ्या काढतांना दृष्टीस पडतात. साधारणपणें पहातां जगतामध्यें थोर कोण असा प्रश्न झाला असतां लागलेंच

उत्तर येतें कीं, साधु हे थोर पुरुष होत. साधु थोर असल्याकारणानें पृथ्वीपति जो राजा तो देखील साधूंच्या ठायीं सदासर्वकाळ लीन झालेला असतो. जगतामध्यें साधूंना सर्वश्रेष्ठपणा असण्यापुरतें त्यांच्याजवळ कोणतें ऐश्वर्य असतें, कीं जेणेंकरून हा सर्वश्रेष्ठपणा पाहिजे त्यांस ओळखितां येईल, अशी एकादी ठळक खूण पाहूं गेल्यास कांहींच नाहीं. लौकिकरीत्या साधु हे कदाचित् श्रीमान अगर भिकारी दिसतील; शांत किंवा कडक भासतील; झळक किंवा मैले दिसतील; झकपक पोषाकी अगर नंगे असतील; शहाणे दिसतील किंवा पिशाचवत् भासतील; सारांश, अमक्या एका प्रकारच्या खुणेनें साधुत्व ओळखतां येईल असें नाहीं. पूर्वपुण्याईच्या योगानें ह्मणा अगर अतिशय सहवासाच्या योगानें ह्मणा, हा योग जमून आला पाहिजे तरच साधुसमागमाचा अपूर्व लाभ होणारा आहे. कित्येक प्रपंच कार्यार्थ अन्य मार्गानें द्रव्य संपादन होईनासें झाल्यावर त्वरित उपायांनीं साध्य होणारा जो बुवापणा तो एखाद्या मोठ्या साधूच्या अगर देवाच्या नांवावर चालवितात. कोणी जटा राखून व अंगास राख फांसून नाटकी वैराग्य धारण करतात आणि साधुपणाच्या झोंकावर घरोघर भीक मागत हिंडत असतात. अशा बनावट सोंगांनीं व वेषांनीं साधु बनून फिरणारे पुष्कळ झाले असल्याकारणानें, खऱ्या साधुपणाचा प्रकार काय आहे, याचें मात्र सर्व लोकांस भुरळ पडून साधु ह्मणजे भिकारी व देशाचा नाश करण्यास मुख्य प्रवर्तक ते, असा बहुतेकांचा समज झाला. एवढा मात्र याजपासून उलट परिणाम घडून आला.

हें सर्व ईश्वर ओळखण्याचें व ज्याच्या साह्यानें त्यास

ओळखतां येतें त्यांविषयींचें झालें. आतां संसारांत राहून कोणकोणत्या गोष्टी जाणल्या पाहिजेत हें सांगतों.

१ कोणताही मनुष्य सज्जन कशावरून ओळखावा ?—

## आर्या.

वदनं प्रसाद सदनं, सदयं हृदयं सुधामुचो वाचः ॥
करणं परोपकरणं, येषां केषां न ते वंद्याः ॥

अर्थ—ज्याचें मुख नेहमीं प्रफुल्लित, हृदय कोमळ, वाणी अमृत स्रवणारी, शरीर परोपकारार्थ सतत झिजणारें, असे जे पुरुष असतील ते कोणास वंद्य नव्हेत ? सर्वांस वंद्य होत. व हेच सज्जन जाणावे.

२ मूर्ख कोणास ह्मणावें?—

## श्लोक.

मूर्खस्य पंच चिन्हानि, गर्वी दुर्वचनी तथा ॥
हठीचाप्रियवादी च परोक्तं नैव मन्यते ॥

अर्थ—मूर्खाचीं हीं पांच चिन्हें आहेत—गर्व, दुर्भाषण, हटवाद, कटु प्रलाप आणि कोणाचें ऐकायाचें ह्मणून नाहीं.

३ चतुर कोणास ह्मणावें ?—

## श्लोक.

मौने मौनी गुणिनि गुणवान्, पण्डिते पण्डिताऽसौ—
दीने दीनः सुखिनि सुखवान्, भोगिनि प्राप्त भोगः॥
मूर्खे मूर्खो युवतिषु युवा, वाग्मिषु प्रौढ वाग्मि—
धन्यः कोऽपि त्रिभुवन जयी, योऽवधूतेऽवधूतः ॥

अर्थ—मुनिसमुदायांत मौन धारण करणारा, गुणिजनांशीं समागम झाला असतां गुण प्रगट करणारा, पंडित-

मंडळींत पंडित, दीनाचे ठायीं दीन, सुखी असणारांशीं सुखी, विलासी जनांशीं विलासी, मूर्खांशीं मूर्ख, तरुण स्त्रियांशीं तरुण, वक्त्यांशीं वक्ता, वैराग्यांशीं विरागी—याप्रमाणें जो सर्वांशीं रंग पाहून वर्तणारा तो त्रिभुवनजयी चतुर पुरुष जाणावा.

४ कोणाजवळ कांहीं कामाकरितां गेलें असतां तें होईल किंवा नाहीं हें त्याच्या मुखचर्येवरून कसें जाणावें?—

श्लोक.

मौनं काल विलंबश्च प्रयाणं भूमि दर्शनम् ॥
भृकुट्यन्यमुखी वार्ता, नकारः षड्विधः स्मृतः ॥

अर्थ—आपलें कोणापाशीं कांहीं काम असलें आणि त्यानें बळकट मौन धरलें, किंवा कामास उशीर लावला, अगर न भेटतां चालता झाला, किंवा गांठ पडली असतां भुईकडे पाहूं लागला; अथवा त्याच्या कपाळावर आठी दिसली, किंवा मुद्दाम दुसऱ्याकडे पाहून बोलूं लागला ह्मणजे नन्नाचा पाढा समजावा. नकाराचे हे सहा प्रकार आहेत.

५ कोणाबरोबर मैत्री करणें असल्यास कोणत्या गोष्टी वर्ज कराव्यात?—

श्लोक.

वाग्वादश्चार्थ संबंधः परोक्षे दार भाषणं ॥
यदिच्छेद्विपुलां मैत्रीं, त्रीणि तत्र नकारयेत् ॥

अर्थ—ज्यास कोणाशीं निरंतर स्नेह ठेवावयाचा असेल त्यानें त्याशीं पुढील तीन गोष्टी करूं नयेत. एक वाग्वाद ह्मणजे वाद घेऊन भांडत बसणें; दुसरी अर्थसंबंध ह्मण-

जे पैशाचें देणें घेणें करणें; आणि तिसरी त्याच्या अपरोक्ष त्याच्या बायकोशीं बोलणें.

६ कशाचीहि आशा करूं नये, कारण तेणेंकरून यातायात भोगावी लागते.

श्लोक.

आशानां मनुष्याणां, काचिदाश्चर्य शृंखला ॥
यया बद्धाः प्रधावन्ती मुक्तास्तिष्ठंति पंगुवत् ॥

अर्थ—आशा ही कोणी आश्चर्यकारक शृंखला होय. कशी? तर तिनें जे बद्ध होतात ते धांवूं लागतात; आणि तिजपासून मुक्त जे झाले ते पांगळ्यासारखे जागच्या जागीं बसतात, ह्मणजे जे आशेला गुंतलेले असतात त्यांस नेहमीं यातायात करावी लागते; आणि जे निरिच्छ असतात ते खुशाल स्वातंत्र्यानें वागतात.

७ स्त्री, पुत्र, कन्या, इ० आपल्या हुकुमांत कोठपर्यंत राहतात?—

श्लोक.

स्वाधीना दयिता सुतावधिसुतोऽसौ षोडशाब्दावधि ॥
स्यात्कन्या करपीडनावधि, सुतस्त्रीस्तद्वशत्वावधि ॥
जामाता बहुलार्पितावधि सखा साधुप्रलापावधि ॥
शिष्यो गुह्य निरूपणावधिपरे चैते धनित्वावधि ॥

अर्थ—जोंपर्यंत मुलगा झाला नाहीं तोंपर्यंत बायको आपल्या स्वाधीन, मुलगा सोळा वर्षांपर्यंत, मुलगी लग्न होईपर्यंत, सून तीस यौवनदशा प्राप्त होईपर्यंत, जांवई पुष्कळ जों पर्यंत पोंचतें आहे तोंपर्यंत, मित्र लोक आपणास बरें ह्मणतात तोंपर्यंत, शिष्य गुरुकिल्ली सांगून

दिली नाहीं तोंवर, आणि सामान्यतः इतर लोक द्रव्य जवळ आहे तोंपर्यंत.

८ संसारांत कोणत्या गोष्टी जाणण्यास कठीण ?—

श्लोक.

राष्ट्रस्य चित्तं कृपणस्य वित्तं, मनोरथं दुर्जन मानुषाणां॥
स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः

अर्थ—राष्ट्राची चित्तवृत्ति, कृपणाचें धन, दुर्जनाचें मनोप्सित, स्त्रियांचें कामचरित आणि पुरुषाचा भाग्योदय या पांचांचा देवांसही थांग लागत नाहीं, मग माणसांचा काय पाड !

९ मान कोणास कोठें मिळतो ?—

श्लोक.

स्वगृहे पूज्यते मूर्खः स्वग्रामे पूज्यते प्रभुः ॥
स्वदेशे पूज्यते राजा, विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥

अर्थ— मूर्खास मान ह्मटला ह्मणजे त्याच्या घरांतल्या घरांत, अधिकाऱ्यास त्याच्या गांवांत, राजास त्याच्या देशांत, परंतु विद्वानास तो जिकडे जाईल तिकडे.

१० लोकांत मानमान्यता होण्यास वस्त्र हें कारणीभूत होय.

श्लोक.

वासः प्रधानं खलु योग्यतायाः,
वासो विहीनं विजहाति लक्ष्मीः ॥
पीतांबरं वीक्ष्य ददौ तनूजां,
दिगंबरं वीक्ष्य विषं समुद्रः ॥

अर्थ—लोकांत मानमान्यता होण्यास वस्त्र हें प्रधान आहे. जो वस्त्रकळाहीन आहे त्याला लक्ष्मीचा लाभ दुराप्रास्त होय. पहा कीं, पीतांबर जो विष्णु त्याला समुद्रानें आपली कन्या अर्पण केली; आणि शिव हा केवळ दिगंबर, यास्तव त्यास विष दिलें.

११ खाणें व बोलणें मर्यादेबाहेर असूं नये.

श्लोक.

जिव्हे प्रमाणं जानीहि, भोजने भाषणेऽपि च ।
अति भुक्ति रति वोक्तिः सद्यः प्राणापहारिणी ॥

अर्थ—हे जिव्हे ! भोजन व भाषण या दोहोंतही परिमित असत जा; कां कीं, अति भोजन व अति भाषण हीं दोन्ही तात्काळ प्राणहरण करणारीं होत. ह्मणजे मर्यादा सोडून दोन्हीपैकीं एकादें केलें असतां घात होतो.

१२ ज्या धर्मांत आपण आहों त्याजवर श्रद्धा ठेवून त्याप्रमाणें चालावें. धड हिंदु ना धड मुसलमान याप्रमाणें धरसोडीची वर्तणूक करूं नये.

श्लोक.

न संध्या संधत्ते नियमित निमाजा न कुरुते ।
न वा मौंजीबंधं कलयति न वा सौनत विधिम् ॥
न रोजां जानीते, व्रतमपिहरेर्नैव कुरुते ।
न काशी मक्का वा, शिव शिव न हिंदुर्नयवनः ॥

अर्थ—संध्या करीत नाहीं, व निमाजही पढत नाहीं; ज्याला मुंजही नको, व सुंतेचीही गरज नाहीं; रोजा माहीत नाहीं, व एकादशीही करीत नाहीं; जो काशीलाही मानीत नाहीं, आणि मक्केलाही विचारीत नाहीं; एकूण

हरहर ! जो धड हिंदुही नाहीं, आणि मुसलमानही नाहीं, त्याचें जिणें व्यर्थ होय.

नीरेश्वरा, याप्रमाणें वर सांगितलेलीं बारा वाक्यें लक्षांत ठेव, व शेवटीं तुला मी एक महासमर्थ जे रामदास स्वामी त्यांचा श्लोक सांगतों त्याप्रमाणें नेहमीं वागत जा, ह्मणजे या संसाररूपी तुफानास न भितां त्यांतून सुखरूपपणें पार पडशील.

श्लोक.

बरें सत्य बोला यथा तथ्य चाला ॥
बहू मानिती लोक येणें तुह्माला ॥ १ ॥
धरा बुद्धि पोटीं विवेकें तुह्मीं हो ॥
बरा गुण तो अंतरामाजि राहो ॥ २ ॥
गुण श्रेष्ठ ऊपास्य त्याचें करावें ॥
बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ॥ ३ ॥
दिवसामाजी कांहीं तरी तें लिहावें ॥
प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें. ॥ ४ ॥
बहु खेळ खोटा सदालस्य खोटा ॥
समस्तांसि भांडेलची तो करंटा ॥ ५ ॥
बहुता जनालागिं जीवीं भी जावें ॥
भल्या संगतीं न्याय तेथें भजावें ॥ ६ ॥
हिशोबीं सदा न्याय सांडू नये रे ॥
कदाचित अन्याय होतां धका रे ॥ ७ ॥
जनीं सोडतां न्याय रे दुःख होतें ॥
महासुख तेंही अकस्मात जातें ॥ ८ ॥
प्रचीतिविणें बोलणें व्यर्थ वांया ॥
विवेकाविणें सर्वही दंभ जाया ॥ ९ ॥

बहू सज्जला नेटका साज केला ॥
विचाराविणें सर्वही व्यर्थ गेला ॥ १० ॥
वरी चांगला अंतरीं गोड नाहीं ॥
तया मानवाचें जिणें व्यर्थ पाहीं ॥ ११ ॥
वरी चांगला अंतरीं गोड आहे ॥
तयालागिं कोणी तरी शोधिताहे ॥ १२ ॥
सदा अंतरीं गोड तें सांडवेना ॥
कदां अंतरीं वोखटें देखवेना ॥ १३ ॥
ह्मणूनि बरा गुण आधीं धरावा ॥
महा घोर संसार हा नीरसावा ॥ १४ ॥
भला रे भला बोलती तें करावें ॥
बहुता जनांचे मुखें यश घ्यावें ॥ १५ ॥
परी शेवटीं सर्व सोडूनि द्यावें ॥
मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ १६ ॥
बरा वोखटा सर्व संसार झाला ॥
अकस्मात येईल रे काळ घाला ॥ १७ ॥
ह्मणोनि भले संगती सत्य चाला ॥
जनीं दास तो बोधिताहे तुह्माला ॥ १८ ॥

नीरेश्वरा ! हा सर्व उपदेश त्वां ध्यानांत ठेवून, गृहस्थाश्रमामध्यें राहून, संसाररूपी गाडा हांकण्यास धैर्य धर. कधीं खोटें बोलूं नको, सर्वांशीं नम्रतेनें वाग, मातापितरांस जेणेंकरून सुख होईल तें कर, आणि कामक्रोधादिक षड्रिपूंच्या कचाट्यांत न सांपडतां विचारानें वर्तन कर, व ईश्वराचें नेहमीं चिंतन कर ह्मणजे या संसारांत नेहमीं सुख होऊन शेवटीं तुला उत्तम गति मिळेल.

याप्रमाणें त्या साधूनें नीरेश्वरास उपदेश करून आपला वरदहस्त त्याच्या मस्तकीं ठेविला, आणि आपण यात्रेस पुढें निघोन गेला. नीरेश्वरास ह्या उपदेशानें जसें समाधान झालें तसें पूर्वीं कधींच झालें नव्हतें. साधु आपणास सोडून गेले ह्मणून त्यास फार दुःख झालें, आणि एकटांच त्या तळ्याच्या कांठीं, पुढें आपण कसें करावें या विचारांत स्तब्ध बसला.

माझे प्रिय वाचकहो, तुह्मांस या गोष्टीच्या अनुसंधानार्थ जरा मार्गे वळलें पाहिजे. मोहनेस तिच्या पुत्रासह गाडींत बसवून, व तिजवर बलात्कार करणाऱ्या दुष्टास कैद करून शिपाई आपल्या वरिष्ठाकडे घेऊन गेले हें तुह्मांस आठवत असेल. तर हे शिपाई आले कसे, व त्यांनीं मोहनेस ओळखिलें कसें हें ऐका.

नीरेश्वराच्या पहिल्या स्त्रीनें जेव्हां आपला पति, मादक व द्वेषक यांच्या नादीं लागून त्यास हद्दपार झालेली शिक्षा ऐकिली, तेव्हां तिनें आपण केलेल्या व झालेल्या सर्व हकीकतीचें एक खासगी पत्र सासऱ्यास ह्मणजे नीरेश्वराचे बापास पाठविलें. तेणेंकरून त्यास फार वाईट वाटून त्यानें राजाचें आर्जव करून त्याची शिक्षा माफ करविली, व शहरांत येऊन नीरेश्वरानें खुशाल रहावें असा हुकूम मिळविला. हा हुकूम सर्वांस कळविला होता. ज्या गांवीं मोहना एकटी निराश्रित पडली होती तो गांव नीरेश्वराचे राजाचाच होता व त्याच्याच शिपायांनीं मोहनेस ओळखून आपल्या वरिष्ठाकडे घेऊन गेले. वरिष्ठांनीं तिचा मान राखून त्या दुष्टास जन्मभर कैदेची शिक्षा दिली. कारण किमया करून बुवाच्या संगानें नीरेश्वराचें द्रव्य लुटण्या-

या अपराधही त्यानें कबूल केला होता. मोहनेस नीरेश्वराविषयींची सर्व हकीकत विचारून, तो अमलदार तीस तिच्या बापाच्या घरीं घेऊन गेला. मोहसेनास व त्याच्या स्त्रीस आपल्या मुलीस नात्वासह पाहतांच जो आनंद झाला तो येथें लिहितां येत नाहीं. त्याचें अनुमान वाचकांनींच करावें. कारण तीं मेलीं असें सर्व समजत असून आतां प्रत्यक्ष जिवंत दृष्टीस पडलीं, मग त्या आनंदास काय विचारावें !! या सुमारास नीरेश्वराच्या हद्दपारच्या शिक्षेची मुद्दत संपत आली. मोहनेस आणणारा अमलदार शूरसेनाच्या बापास जाऊन भेटला व माझ्या राजानें मेहरबानी करून आपणाकरितां त्याची शिक्षा माफ करून त्यास माझ्या स्वाधीन करण्यास सांगितलें आहे ह्मणून कळविलें. मोहसेनानें ही राजाच्या बऱ्याच विनवण्या केल्या होत्या. अर्थातच त्यानेंही त्याची बाकी राहिलेली शिक्षा माफ केली, व त्यास धुंडून आणण्याकरितां गांवोगांवीं शिपाई पाठविले. त्यांतील कांहीं शिपाई शोधतां शोधतां जेथें नीरेश्वर तळ्याच्या कांठीं बसला होता तेथें आले, आणि पहातात तों तो आपला नीरेश्वर सेनापति होय. शिपायांनीं लवून त्यास सलाम करून मोहनेविषयींची वगैरे सर्व हकीकत त्यास कळविली. मग काय विचारावें ! ज्याप्रमाणें एकाद्या मनुष्यास अमृत मिळावें त्याप्रमाणें त्यास झालें. तो लागलाच त्यांजबरोबर निघाला आणि थोड्या दिवसांनीं ते मोहसेनाच्या घरीं येऊन पोंचले.

नीरेश्वर शहरांत आल्याबरोबर पहिल्यानें राजास व राजपुत्रास भेटून, नंतर मोहसेन, मोहना व त्याची पहिली स्त्री यांस भेटला, आणि जिकडे तिकडे आनंदी आनंद दिसूं लागला.

शूरसेनानें, नीरेश्वराची वर्तणूक फार नम्र व सुधारलेली पाहून आपल्या बापाकरवीं त्यास दुय्यम सेनापतीची जागा देवविली. कांहीं दिवसांनीं त्याच्या मानमरातबीप्रमाणें त्याजबरोबर लवाजमा देऊन त्यास स्वदेशीं जाण्यास राजानें रजा दिली. आज्ञा होतांच त्याची पहिली स्त्री, मोहना व तिचा पुत्र, मोहसेन, मोहसेनाची स्त्री, तिकडून आलेला अमलदार वगैरे सर्व आपल्या बरोबर जितकीं पाहिजेत तितकीं मनुष्यें घेऊन मोठ्या थाटानें शहरांत सुरक्षीतपणें येऊन पोहोंचलीं. नीरेश्वराचीं वृद्ध मातापितरें व इष्टमित्र त्यास आणण्याकरितां सामोरे गेले होते. नीरेश्वरानें जेव्हां तो पुत्र, दोन सुना, नातू, व्याही, वगैरेंस पाहिलें, तेव्हां त्यास अतिशयच हर्ष होऊन, मी जागा आहें किंवा स्वप्न पाहत आहें, याची त्यास भ्रांती पडली, नंतर नीरेश्वरानें गरीबांस पुष्कळ दानधर्म केला. देवपूजा. अभिषेक, ब्राह्मणभोजनेंही केलीं, आणि नीरेश्वर आल्यामुळें गरीबापासून तों थोरापर्यंत सर्वांस आनंद झाला. कारण तो त्यांचें हित इच्छिणाराचा पुत्र होता.

नीरेश्वराच्या आईनें शहरच्या सर्व सुवासिनींस हळदकुंकू देऊन सर्वांकडून त्यांचे पतीचीं नांवें उखाण्यानें घेवविलीं व त्यांचे बरोबर आपल्या सुनांसही नांव घेण्यास सांगितलें. मग काय विचारावें ! जरी त्यांचे मनांत आपल्या पतीचें नांव घेण्यास उल्हास वाटत होता तरी त्या फार लाजल्यासारखें दाखवून सासूनें अगोदर नांव घ्यावें म्हणून हट्ट घेऊन बसल्या.

नीरेश्वराचे आईचे मनांत आपल्या पुत्राचें नांव सुनांनीं घेतलेलें ऐकण्याचें फार होतें म्हणून त्यांनीं प्रत्येकीनें दोन

वेळां नांव घेतल्यास आपण एक वेळ घेण्याचें कबूल केलें. हें सर्व सुवासिनींसही मान्य झाल्यावर नीरेश्वराची आई नांव घेऊं लागली----

सोन्याची काठी, सदरेला दाटी; नीरेश्वर बसले पेढीवर, तेथें राजा आला भेटी.

आतां मोहना व नीरेश्वराची पहिली स्त्री यांची नांव घेण्याची पाळी आली, ह्मणून त्यांचा पहिल्यानें कोणी नांव घ्यावें याविषयीं वाद चालला. मोहना ह्मणे पहिल्यानें तूं घे, दुसरी ह्मणे तूंच अगोदर घे, याप्रमाणें भांडतां भांडतां शेवटीं नीरेश्वराच्या पहिल्या स्त्रीनें अगोदर नांव घेण्याचें ठरून ती नांव घेऊं लागली:-

१ सुंदर गांवीं जन्मल्यें, गंगेंत न्हालें; आणि नीरेश्वराचे जीवासाठीं मानस शहरांत आल्यें.

२ आरशांची खोली, सोन्याची दिवली; नीरेश्वराला पाहून माझी तहानभूक निवाली.

नंतर मोहना नांव घेऊं लागली:-

१ दारीं होती तुळस, तिला घालीत होतें पळी पळी पाणी; आधीं होत्यें आईबापांची तानी, मग झाल्यें नीरेश्वराची पट्टराणी.

२ सोन्याचा चौफुला, त्यांत एलची जायपत्रीचा सांठा, नीरेश्वर बसले खायाला; त्यांत माझा अर्धा वांटा.

याप्रमाणें सुनांनीं नांवें घेतलेलीं ऐकून नीरेश्वराच्या आईस फार आनंद झाला. तेथील राजानेंही नीरेश्वराकरितां एक मोठा दरबार भरवून सर्व लोकांस त्याची षड्रिपूंनीं जी दशा केली होती तिचा इतिहास वाचून दाखविला, व अशांच्या कचाटापासून सावध राहण्याविषयीं त्यास

महान् साधूनें जो उपदेश केला होता तोही लोकांस कळविला आणि त्याप्रमाणें नेहमीं प्रत्येक मनुष्यानें वागण्यास झटावें ह्मणून सांगितलें. ईश्वरानें नीरेश्वरास दिलेली शिक्षा फार झाली ह्मणून पूर्वी कायद्यानें केलेली शिक्षा सर्वानुमतें रद्द केली आहे व अतःपर नीरेश्वरानें आपल्या पित्याप्रमाणें कीर्ति मिळवून सुखानें संसारोपभोग घ्यावा असें मी इच्छितों " असें ह्मणून राजानें नीरेश्वरास मंदिल वगैरे देऊन दरबार बरखास्त केला, व त्या दिवसापासून नीरेश्वर आपल्या सर्व कुटुंबासह सुखानें काळ क्रमूं लागला.

श्लोक ( शिखरिणी )

जरी या जन्मींचें सुख अनुभवायासि वघसी ॥
जरी लोकांमाजी, बरि सुजनता घेऊं टपसी ॥
तरी सन्मार्गाला धरुनि बरवा चाल मनुजा ॥
स्वतांला, आप्तांला सुखावें बहुधा देश अनुजा ॥

---

## भाग चवदावा.

( शंकर शास्त्री, नारायणशास्त्री, परशुरामभट, सखारामभट आणि रामभट.)

रामभट–( हातांत पळी पंचपात्री घेऊन घाईनें रस्त्यांतून आपल्या मनांत पुटपुटत चालले आहेत ) मला लवकर गेलें पाहिजे–शिंदळीचेस लवकर उठविण्यास सांगितलें, पण तिचा आपला बेत आहे तो आहेच. मोठी दक्षणा मिळाली ह्मणजे बरी येईल कंबर शोधायाला !

शंकरशास्त्री–रामभट, अहो रामभट, जरा थांबा तरी, येवढी घाई कसली लागली आहे, मला तुह्माला कांहीं विचारायाचें आहे.

रामभट—मला जाऊं द्या हो लवकर, यजमानास उशीर झाला. ( मनांत ) ही कोठली पीडा आली आणखी कोणास ठाऊक !

शंकर शा०—अहो, अझून पुष्कळ अवकाश आहे, दोन मिनिटें तरी थांबा.

रामभट—( घाईनें चालत असतां कांसोटा सुटतो ) लाभ आहे, पण हा शास्त्री मजबरोबर येण्यास पाहतो असें दिसतें, ह्याला साफ जबाब दिला पाहिजे. शास्त्रीबोवा, आतां मला दोन तीन यजमानांचीं घरें आटोपायाचीं आहेत, आपण दोनप्रहरीं बोलूं.

नारायण शा०—( रामभटाच्या समोरून येतास ) नमो नमः, रामभटजी, बरी भेट झाली. आपणांस एक गोष्ट विचारावयाची आहे,

रामभट-(मनांत)नशीब माझें.एका कटकटींतून सुटण्यास पाहतों तों दुसरे शास्त्रीबोवा पुढें आहेतच तयार ! अहो नारायण शास्त्री, मला आतां कांहीं सुचत नाहीं, जाऊं द्या लौकर एकदां, यजमानास उशीर झाला तर माझें एक गिऱ्हाईक मात्र बुडेल.

सखारामभट व परशुरामभट—नमस्कार हो नारायण शास्त्री, आज काल रामभटजींची व तुमची लाट आहे! व: पाठीमागून शंकर शास्त्री देखील येताहेत ! आज कोठें हल्ला करण्याचा बेत चालला आहे कोणास ठाऊक !

( यांचें असें बोलणें चाललें आहे तों शंकर शास्त्री येऊन त्यांत मिसळतात व सर्व जण मिळून रामभटजीस थांबवितात. )

रामभट—छे बुवा, तुह्मास तर पिसें नाहीं ना लागलें !

यजमानास उशीर झाला ह्मणजे माझी पूजा मात्र होईल !

सखा० व परशुरामभट–आहे ठाऊक हो, आह्मांस दडवितां कशास ! काल गीरेश्वराचे घरीं भोजनाचें व दक्षणेचें संधान लावण्याकरितां गेले होतेत, तेथें जात असाल, दुसरें काय ! यजमान कोठला एवढे सकाळीं तुमची वाट पहात बसायाला !

शंकर शा० व नारायण शा०–रामभटजी, खुप आहेस बुवा, अरे बिलकूल थांगच लावूं देत नाहींस ना. आतां तुला सोडायाचें नाहीं सांग लौकर, सरीपुरती तजवीज केलीस ना !

रामभट–( लाजून ) हे बेटे जबरे आहेत, यांनीं कसें जाणलें कोण जाणे. असो. आतां दडवून उपयोग नाहीं. ( उघड ) अहो, तुह्मी जबरे कपाळकूट दिसतां, मला यजमानाचे घरीं खरोखर जायाचें आहे, आणि गीरेश्वराकडेही जायाचें आहे. आमच्यासारख्या भटाची कोठली सरीपुरती संभावना होयाला, बुगड्यांपुरती झाली तर नशीबच समजावयाचें !

शंकर व नारायण शा०–असें पहिल्यानेंच सांगतेत तर नाहीं का झालें असतें! पण नाहीं, एकट्यानेंच गिळावयास पहावयाचें! अरे, आम्ही पण तिकडेसच चाललों आहों !

परशुराम व सखाराम०–आम्ही कालपासून जेवलों देखील नाहीं, कारण आज आह्मांस भोजनाचें आमंत्रण आहे. घेवर, बुंदी, बासुंदी यांवर सपाटा मारायाचा, आणि उद्यांची देखील बाकी काढून घ्यायाची, कमी कां करा !

रामभट–हात् बेट्यांनो, मला असें पूर्वींच सांगितलें असतें तर नाहींका झालें असतें ! पण नाहीं. गरीबाची थट्टा करायाची! भोजनदक्षणा काय बरें मिळेल?

शंकर शास्त्री—भटांस दोन रुपये व शास्त्र्यांस चार रुपयेपर्यंत मिळणार अशी वदंता आहे. (इतक्यांत रामभट, परशुरामभट व सखारामभट यांचे कासोटे आपोआप सुटतात, व ते परत खोंवतात.)

नारायण शा०—वा: आज तुह्मांस लाभ तर खूपच दिसतो. तुमचे कासोटे देखील तुह्मास सुचवितात!

रामभट व परशुरामभट—शास्त्रीबोवा, असें काय बोलतां, आह्मांस कोठें तुमच्यासारखीं धोतरें मिळतात, दोन हात पंचे नेसायाचे ते शिंदळीचे कासोट्यास पुरत नाहींत ह्मणून वरचेवर सुटतात, दुसरें काय! पण शास्त्रीबोवा, काय हो, गीरेश्वरानें जो हा एवढा अतोनात दानधर्म चालविला आहे हा कशा प्रीत्यर्थ बरें?

शंकरशा०—तुह्मांस अझून ठाऊकच नाहीं का? भोजनाचें आणि दक्षिणा घ्यायाचें बरें समजतें! अहो, त्या आपल्या गीरेश्वर सावकाराचा नीरेश्वर ह्मणून एक मुलगा आहे, तो १३ वर्षांचे वयांत आल्यावर त्यास मित्राचें वेड लागलें, ह्मणजे या संसारांत आपणास कोणी तरी चांगला मित्र असावा ह्मणून शोधूं लागला, त्याप्रमाणें त्याला अनुक्रमें मदन, कोपेश्वर, लोभेश्वर, मोहक, मादक व द्वेषक असे मित्र मिळाले. त्यांच्या संगतीनें तो कामांध, माथेफिरू, लोभी, आशेखोर, गर्विष्ठ, मद्यपी, द्वेषी होऊन नानातऱ्हेचीं दुर्व्यसनें त्यास लागलीं, व त्या प्रत्येक व्यसनाचें त्याला योग्य पारिपत्यही मिळत गेलें. आपल्या पत्नीस व वृद्ध मातापितरांसही अंतरला. नंतर कोणा एका महान् साधूनें त्यास प्रपंच कसा चालवावा, ईश्वरप्राप्ति कशी करून घ्यावी, याविषयीं उपदेश करून वरदहस्त त्याचे मस्त-

कीं ठेवला, तेणेंकरून तो ते छंद व संगति सोडून परत सुमारें ६।७ वर्षांनीं दोन स्त्रिया व पुत्र यांसह भेटीस आला आहे. त्यास दुसऱ्या राज्यांत सेनापतीचा हुद्दाही मिळाला आहे. मग असें वैभव प्राप्त झालें असतां गीरेश्वरानें दानधर्म व आनंद कां करूं नये ?

रामभट—रास्तच आहे, असें करणें हें त्यास योग्य होय. ईश्वर करो आणि त्या सर्वांस दिर्घायुष्य देवो.

शंकरशा०, नारायणशा०, सखारामभट व परशुरामभट—तथास्तु, तथास्तु.

सर्वजण—चला आपण सर्व मिळून तिकडे लौकर जाऊं, नाहीं तर दक्षणा बुडेल. ( जाऊं लागतात. )

---

## शेवटची विनंती.

### शार्दूलविक्रीडित.

श्रीमद्ब्रह्मशिवस्वभागिरिसुता अंकीं गणी शारदा ॥
श्रीचें दैवत सत्यशी जननी जे वाराणशी वारिदा ॥
सुज्ञ ब्राह्मण चिज्ज्ञ साधु बुध हृद्दुःखापह स्वांत जें ॥
यां साष्टांग महोत्सहें नमितसे लक्षोत हा दास जें॥१॥

अर्थ—श्रीमान् ब्रह्मस्वरूप जो शंकर, पार्वती ज्याची कांता, ज्याच्या अंकावर गणपति, शारदा, श्रीसम देवता केवळ वाराणसी नदी जी तीर्थरूप माझी मातोश्री, सूज्ञ ब्राह्मण, चिद्ब्रह्मज्ञाते साधु, बुध, ज्यांचें अंतःकरण हृदीय दुःखाला दुरितें अशा सकलांला मी महानंदानें नमस्कार करितों, कीं ह्या गणपतीला केवळ दास लक्षोत.

समाप्त.

# आश्रय देणारांचीं नांवें.

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| रा. रा. काशिनाथ त्रिंबक तेलंग ॲडव्हाकेट ॲाट लॉ. | १ |
| ,, आत्माराम शिवशंकर | १ |
| ,, एकनाथ रघुनाथ खोटे | १ |
| ,, कृष्णनाथ काशीनाथ | १ |
| ,, नारायण विठ्ठल वैद्य पुरंदरे | १ |
| ,, हरिश्चंद्र शामराव हायकोर्ट मुंबई, ......... | १ |
| ,, सोकर बापूजी ... ... | १ |
| ,, शामराव गणपत ...... | १ |
| ,, बापूजी हरिश्चंद्रजी ... | १ |
| ,, माहादेव बी. वकील हा. | १ |
| ,, गंगाराम बी. रेले वकील हा, | १ |
| ,, विष्णु मोरेश्वर मराटे ... | १ |
| ,, लक्ष्मण यशवंत ...... | १ |
| ,, बाळकृष्ण रघुनाथजी ... | १ |
| ,, माधवराव नारायण कोठारे | १ |
| ,, धनाजी बाबुराव भानगल | १ |
| ,, मोरोबा बाळबा ... ... | १ |
| ,, दादाभाई नारायण ... | १ |
| ,, सखाराम कान्होबा... | १ |
| ,, बी. बी. कोठारे. स्मालकाज कोर्ट ......... | १ |
| ,, केशवराव भाई...... | १ |
| ,, काशीनाथ विठोबा ... | १ |
| ,, आशान्ना शिवाजी ...... | १ |
| ,, धोंडू दामोदरजी ...... | १ |
| ,, जी. ए. रंजीत ... ... | १ |
| ,, आत्माराम यादवजी ... | १ |
| ,, श्रीधर भास्कर ... ... | १ |
| ,, दामोदर पुतळाजी चवाथे सेक्रेटरी आफिस ... ... | १ |

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| रा.रा. मोरेश्वर विश्वनाथ नाईक | १ |
| ,, दिनानाथ भाई वर्वे ... | १ |
| ,, तुकाराम महादेव भिंगे ... | १ |
| ,, विनायक भोजजी कोठारे | १ |
| ,, वासुदेव बापूजी मंत्री ... | १ |
| ,, बाळकृष्ण महादेव नवलकर ... ... ... ... | १ |
| ,, पांडुरंग मकुंद भिंगे ... | १ |
| ,, लक्षुमण रामचंद्र उपासनी | १ |
| ,, गोपिनाथ काशिनाथ नवलकर ... ... ... ... | १ |
| ,, रामचंद्र रावजी जोगळेकर | १ |
| ,, पुरुशोत्तम गणेश दाते ... | २ |
| ,, बाळकृष्ण हरिश्चंद्र शाळनकर ...... ...... | १ |
| ,, शामराव बाळकृष्ण वेलकर | १ |
| ,, बाळाजी कृष्णराव व्यवहारकर ............... | १ |
| ,, बाळकृष्ण रामचंद्र सारटे | १ |
| ,, नारायण बाळाजी भागासकर ... ... ... ... | १ |
| ,, सुंदर भंतोबा कोरकर... | २ |
| ,, हरिश्चंद्र दामोदर वाडिया | १ |
| ,, बाळकृष्ण पांडुरंग कोवरे | १ |
| ,, विनायक राघोबा गोरक... | १ |
| ,, विनायक माणिक वगळ... | १ |
| ,, शिवशंकर नारायण फोटोग्राफर ... ...... ... | १ |
| ,, बाबाजी कृष्णाजी सावंत | १ |
| ,, मोरेश्वर हरिश्चंद्र ठाकोर | १ |
| ,, विनायकराव नारायण... | १ |
| ,, रामजी नागुजी ... ... | १ |

# आश्रय देणारांचीं नांवें.

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| रा.रा.आनंदराव केरोबा...... | १ |
| ,, माधवराव भास्कर साने | १ |
| ,, रघुनाथ गोविंद चेंबुरकर | १ |
| ,, गणपतराव बाळकृष्ण एकबोटे | १ |
| ,, वासुदेव मोरेश्वर पोतदार स्कूलमास्तर ......... | १ |
| ,, गंगाधर बाळकृष्ण गद्रे | १ |
| ,, लक्ष्मण बाबा सोनाजी | १ |
| ,, रघुनाथराव जीवनजी लोको. फोर. क्लार्क... ... | २ |
| ,, विनायक दिनाजी ... ... | १ |
| ,, दादाजी रघुनाथजी ... | १ |
| ,, वसंतराव जनार्दन ...... | १ |
| ,, गजानन रामचंद ...... | १ |
| ,, मोरेश्वर महादेव ... ... | १ |
| ,, नारायण आपाजी ... | १ |
| ,, विनायकराव गोपाळराव एक्झामिनर ......... | १ |
| ,, मोतिराम जगन्नाथ ... | १ |
| मे. जे. आब्राहाम ... ...... | १ |
| रा.रा. रामकृष्ण गोविंद आर्थने | १ |
| ,, गोपिनाथ दादाजी शारंगधर | १ |
| ,, काशिनाथ मकुंदजी ... | १ |
| ,, विनायक केशव......... | १ |
| ,, बाळाराम पांडुरंग वगळ | १ |
| ,, बी. जी. पिंगळे ... ... | १ |
| ,, दामोदर दिनाजी ...... | १ |
| ,, वसंतराव जनार्दन काळे. | १ |
| ,, आनंदराव भास्कर ... | १ |
| ,, यशवंत बळवंत ... ... | १ |
| ,, बी. मुनासिंग ......... | १ |
| ,, आत्माराम अनंत ...... | १ |

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| रा.रा.रामचंद गोविंद ......... | १ |
| ,, दाजी हरी लिमये एक्झामिनर ... ........ ... | १ |
| ,, जयराम जनार्दन मंत्री... | १ |
| ,, सदाशिव नारायण भेंडे... | १ |
| ,, सुंदर पांडुरंग ......... | १ |
| ,, अनंदराव आत्माराम त्रिलोकेकर ... ... ...... | १ |
| ,, भास्कर बाळकृष्ण ...... | १ |
| ,, जयराम विमाजी ... ... | १ |
| ,, रामचंद्र नारायण ...... | १ |
| ,, वि. ना. बी. कोठारे...... | १ |
| ,, लक्ष्मण बापूजी ... ... | १ |
| ,, सखाराम सदाशिव येवलेकर बी. ए. ... .... | १ |
| ,, मुकुंद रामचंद......... | १ |
| ,, विनायकराव रामचंद्र ... | १ |
| ,, शामराव त्रिंबक ... ... | १ |
| ,, नानाभाई रघुनाथ ...... | १ |
| ,, परशराम भाऊ प. व. डिपार्टमेंट............ | १ |
| ,, गोपाळ आनंदराव ... | १ |
| ,, लक्ष्मण गणपत बी. बी. रेलवे ऑफिस ... ... | १ |
| ,, हरिश्चंद्र पांडुरंगजी ... | १ |
| ,, एम. व्ही. विजयकर ... | १ |
| ,, बाळकृष्ण पुरुषोत्तमजी ... | १ |
| ,, हरी भिकाजी इंजीनीयर | १ |
| ,, नानाभाई रघुनाथ...... | १ |
| ,, सुंदरराव पांडुरंग, पेनगॉलवर्ट ऑन्ड सयानी ... | १ |
| ,, सदाशिव रघुनाथ दळवी. | १ |

# आश्रय देणारांचीं नांवें.

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| रा.रा. पी. मकुंदजी... ... | १ |
| ,, केशवराव माधवराव ... | १ |
| ,, लिंगु नरसु. ... ... | १ |
| ,, मोरेश्वर विठोबा साखरदांडे ... ... ... | १ |
| ,, चिंतामण नरहर जोशी.. | १ |
| ,, सदानंद मदन... ... | १ |
| ,, कृष्णराव नारायण माहाळी ... ... ... | १ |
| ,, गोपिनाथ सदानंदजी... | १ |
| ,, रामचंद्र विनायक...... | १ |
| ,, नारायण रावजी... ... | १ |
| ,, अमृतराव शिवराम. ... | १ |
| ,, पांडुरंग केशवजी... ... | १ |
| मी. स्यामुएल बेंजामिन... ... | १ |
| रा.रा. रामचंद्र नारायण पिळगांवकर.. ... ... | १ |
| ,, कृष्णराव नारायण कोठारे | १ |
| ,, विठोबा रामचंद्र... ... | १ |
| ,, गणपतराव वाजीराव राव | १ |
| ,, पांडुरंग भीमराव... ... | १ |
| ,, नारायण बाळाजी...... | १ |
| ,, रावजी काशिनाथ...... | १ |
| ,, वामन महादेव पटवर्धन.. | १ |
| ,, हरीशंकर बी. टनक जी. आय. पी. ... ... | १ |
| ,, गोपाळ गोविंद सब इन्स्पेक्टर ... ... ... | १ |
| ,, मधुसूदन जयराम...... | १ |
| ,, गणपतराव इन्जीनीयर्स क्लार्क ... ... ... | १ |
| ,, केशव रामचंद्रजी ... | १ |

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| रा.रा. जी. के. टिपनीस...... | १ |
| ,, गोविंदराव रामजी कान्ट्राक्टर... ... ..... | १ |
| ,, बाबाजी गोपाळ... ... | १ |
| ,, गणपत हरीबा शेट नोनार | १ |
| ,, त्रिंबक बाळकृष्ण... ... | १ |
| ,, सूर्याजीराव गोविंदराव क्लूलप स्टेशन मास्तर.... | १ |
| ,, परशराम गंगाधर पंडीत | १ |
| ,, खंडेराव मानिकराव .... | १ |
| ,, गणपत दामोदर... ... | १ |
| ,, फकीर केरोबा परेळ वर्कस जी. आय. पी. ... | १ |
| ,, गोविंद महादेव ... ... | १ |
| ,, हरिश्चंद्र एकनाथ...... | १ |
| ,, शिवजी गोविंद... ... | १ |
| ,, बाळकृष्ण त्रिंबक टाईमकीपर ... ... ... | १ |
| ,, दादाजी जगन्नाथ हजारी | १ |
| ,, दामोदर आनाजी. ... | १ |
| ,, नानाभाई रामचंद्र ... | १ |
| ,, गणपत हरीबा... ... | १ |
| ,, दामोदर आबाजी...... | १ |
| ,, कीसन वामनराव....... | १ |
| ,, गणपत विठोबा टाईमकीपर ... ... ... | १ |
| ,, गणेश टाईमकीपर. ... | १ |
| ,, वामन मुकुंद पोतनीस... | १ |
| ,, परशराम काशिनाथ ... | १ |
| मि. मानाजी आरॉन ... ... | १ |
| रा.रा. विनायक दिनानाथ पाठारे | १ |
| ,, गणपत सखारामजी ... | १ |

| | नांवें. | प्रती. |
|---|---|---|
| रा.रा. | गणपतराव रामचंद्र ... | १ |
| ,, | कलकराम नंदराम. ... | १ |
| ,, | नारायण बाबाजी नगरकर... ... ... ... | १ |
| ,, | नारायण बापुराव... ... | १ |
| ,, | वामन आत्माराम...... | १ |
| ,, | महादेव सीताराम...... | १ |
| ,, | वामन शिवराम... ... | १ |
| ,, | परशराम रामचंद्र ... | १ |
| ,, | अनंत नारायण दळवी... | १ |
| ,, | गजानन रामचंद्र. ... | १ |
| ,, | लक्ष्मण माणकोजी ... | १ |
| ,, | आत्माराम विनायक ... | १ |
| ,, | गंगाधर आत्माराम जोशी | १ |
| ,, | परशराम केशव... ... | १ |
| ,, | श्रीकृष्ण दिनानाथजी ... | १ |
| ,, | नारायण भडागा... ... | १ |
| ,, | काशिनाथ विठोबा. ... | १ |
| ,, | रामचंद्र विठ्ठल आमोनकर ... ... ... | १ |
| ,, | नारायण केरोबा... ... | १ |
| ,, | कृष्णराव उपेंद्र ... ... | १ |
| ,, | एम. बी रेडकर ... ... | १ |
| ,, | सीताराम जनार्दन. ... | १ |
| ,, | नारायण गंगाधर वालावलीकर... ... ... | १ |
| ,, | काशिनाथराव दाजिबा रेगे ... ... ... | १ |
| ,, | वासुदेव नारायण बायंगकर ... ... ... | १ |
| ,, | नारायण रामचंद्र राउत. | १ |
| ,, | जनार्दन रामचंद्रजी ... | १ |

| | नांवें. | प्रती. |
|---|---|---|
| रा.रा. | आनंदराव दामोदर पागळे | १ |
| ,, | बाप. के. विजयकर ... | १ |
| ,, | मोठाभाई रघुनाथजी... | १ |
| ,, | गणपतराव सदानंदजी... | १ |
| ,, | भाई गोपाळराव... ... | १ |
| ,, | सुंदरराव रावजी... ... | १ |
| ,, | बाळकृष्ण बापूजी... ... | १ |
| ,, | गणेश सदानंद ... ... | १ |
| ,, | लक्ष्मण पद्माकर... ... | १ |
| ,, | जगन्नाथ अंतोबा...... | १ |
| ,, | बापुजी नारायण...... | १ |
| ,, | जनार्दन त्रिंबक ऑडीट ऑफिस जी. आय. पी. | १ |
| ,, | बाळकृष्ण सदाशिव जी. आय. पी. ... ... | १ |
| ,, | बाळकृष्ण रामशेट जी. आय. पी. ... ... | १ |
| ,, | बाळकृष्ण दामोदरजी जी. आय. पी.... ... ... | १ |
| ,, | रघुनाथ बंदुजी ... ... | १ |
| ,, | कृष्णराव रामचंद्र..... | १ |
| ,, | बाळाजी नारायण कोळवणकर... ... ... | १ |
| ,, | सदानंद भास्कर तर्खडकर... ... ... | १ |
| ,, | भवानीशंकर ... ... | १ |
| ,, | सुंदर दामोदर ... ... | १ |
| ,, | अनंदराव जनार्दन. ... | १ |
| ,, | दामोदर पांडुरंगजी ... | १ |
| ,, | नारायण रामचंद्र ... | १ |
| ,, | भास्कर बाळकृष्ण ... | १ |
| ,, | गजानन बाबाजी वासुदेव | १ |

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| रा.रा. भावाजी भास्कर... ... | १ |
| ,, कृष्णाजी गणेश... ... | १ |
| ,, भाई गणबा ... ... | १ |
| ,, भगवंतराव रघोत्तम ... | १ |
| ,, तातोबा आत्माराम मुंगरे | १ |
| ,, रखबदास. रा.... ... | १ |
| ,, गंगाधर जगन्नाथ ... | १ |
| ,, सिताराम भाऊजी वासलेकर... ... ... | १ |
| ,, पांडुरंग विठोबा मार्केटकर | १ |
| ,, पुरशोत्तम येसोबा नाईक | १ |
| ,, मोरेश्वर एच. जोशी... | |
| ,, पांडुरंग विठोबा... ... | १ |
| ,, गणपतराव आनंदराव पालेकर... ... ... | १ |
| ,, रामचंद्र बाळकृष्ण ... | १ |
| ,, परशराम बाळकृष्ण खारकर ने. आ. कलेक्टर. | १ |
| ,, लक्षुमण दौलतराम आ. | १ |
| जनरल ऑफिस... ... | १ |
| ,, विश्वनाथ भाऊ खेडकर. | १ |
| ,, अनंत जगन्नाथ ... ... | १ |
| ,, धर्माजी नरसु जी. आय. पी. लोको ऑफिस ... | १ |
| ,, परशोत्तम बापुजी. ... | १ |
| ,, अनंदराव खंडेराव. ... | १ |
| ,, रघुनाथ हरीश्चंद्रजी ... | १ |
| ,, सिताराम बाबाजी लोटलीकर... ... ... | १ |
| ,, सखाराम मंगेश वागळे. | १ |
| ,, माधवराव दिनकर लोटलीकर... ... ... | १ |
| रा.रा. नारायणरांव उपेंद्र शानभाग ओ. स्पी. डि. मील. | १ |
| ,, आपा बाजी जोशी उपाध्या ... ... ... | १ |
| ,, गणेश रामचंद्र केणी... | १ |
| ,, सदाशिव वामन दिवाडकर... ... ... | १ |
| ,, गोविंद लक्षुमण मराठे .. | १ |
| ,, रघुनाथ बळवंत नाईक. | १ |
| ,, रघुनाथ हरीश्चंद्र... ... | १ |
| ,, खंडू पांडुरंग ... ... | १ |
| ,, पद्मनाभ उपेंद्र शानभाग ओ. सि. व्ही. मिल.... | १ |
| ,, भिकू जानकोजी हि. मास्तर... ... ... | १ |
| ,, रामचंद्र बाबाजी ...... | १ |
| ,, चिंतामण नारायण ... | १ |
| ,, हरिबा कृष्णाजी कासार. | १ |
| मि. जहांगिरजी फ्रामजी...... | १ |
| ,, जेकब सालोमन ... ... | १ |
| ,, हुसन मिया उजबुदिन व्हीजाबर... ... ... | १ |
| रा. रा. लक्षुमण सदाशिव शेविडी | १ |
| रा. रा जनार्दन नानाभाई ... | १ |
| ,, रणछोड भानाजी नाईक. | १ |
| ,, रामचंद्र गजानन ताह्मणें | १ |
| ,, एम. पी. गुरू ... ... | १ |
| ,, मकुंदराव काशिनाथजी. | १ |
| रा, रा. रघुनाथ बाबासाहेब मालप... ... ...... | १ |
| ,, लक्षुमण रामचंद्र...... | १ |
| ,, नारायण अडाणा... ... | १ |

# आश्रय देणारांचीं नांवें.

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| रा.रा. आत्माराम अनंत...... | १ |
| ,, नारायण बाबाजी जाधव. | १ |
| ,, वी. रंगाश स्वामी...... | १ |
| ,, सदाशिव पुंडलिक. ... | १ |
| ,, पुरशोत्तम पांडुरंग. ... | १ |
| ,, एल. एम. डी. सुझा... | १ |
| ,, आत्माराम वसंतराम ... | १ |
| ,, गोविंद मोरेश्वर ... ... | १ |
| ,, मंगेश नारायण वागळे.. | १ |
| ,, सिताराम बापु ... ... | १ |
| ,, काशिनाथ बळवंत...... | १ |
| ,, पांडुरंग बाळकृष्ण. ... | १ |
| ,, बाळाजी विठोबा कोंड्यर | १ |
| ,, धोंडु सखाराम ... ... | १ |
| ,, भाऊ मोरोबा दाशी.... | १ |
| ,, मोरोबा विश्वनाथ...... | १ |
| ,, महादेव सखाराम...... | १ |
| ,, रामचंद्र बी. परभ ... | १ |
| ,, नानाभाई रामचंद्र ... | १ |
| रा.रा. वासुदेव नारायण... ... | १ |
| ,, अर्जुन महादेव ... ... | १ |
| ,, रामचंद्र नारायण. ... | १ |
| ,, रघुनाथ महादेव... ... | १ |
| ,, एस. बी. दाशी ... ... | १ |
| ,, रामचरन बलदेव...... | १ |
| ,, गणपत बापूजी ... ... | १ |
| ,, हरिश्चंद्र दामोदर...... | १ |
| ,, रावजी भाई ... ... | १ |
| ,, रघुनाथ कृष्णाजी... ... | १ |
| ,, भाऊ हरिश्चंद्र ... ... | १ |
| ,, रामचंद्र नारायण. ... | १ |
| ,, विश्वनाथ भवानी... ... | १ |
| ,, दादाभाई मोरोबा. ... | १ |
| ,, गोविंद रामचंद्र... ... | १ |
| ,, माधवराव मुकुंदराव पै .. | १ |
| ,, हरिबा धोंडिबा चिलेकर | १ |
| ,, विठ्ठल रवळोजी आमोनेकर | १ |

## षड्रिपु प्रहसन पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें.

आर्यन् ट्रॅक्ट बुक डिपो.

राधाबाई आणि कं. वुइडो आफ लेट

आत्माराम सगुण.

आत्माराम सगुण आणि कं.

गोपाळ नारायण आणि कं.

दीनबंधु ऑफिस.

किंवा इतर सर्व पुस्तकें विकणारांच्या दुकानीं विकत मिळेल. बाहेरगांवच्या वर्गणीदारांस टपालहांशील २ आणे जास्त पडेल.

---

## "परिकथा."

वरील नांवाचें पुस्तक थोड्या दिवसांनीं ह्या पुस्तकाचे मालक काढणार आहेत. यांत गोष्टी निरनिराळ्या येऊन त्या फारच मनोरंजक असतील. ज्यांची घेण्याची खुशी असेल त्यांनीं आपलीं नांवें ह्या पुस्तक कर्त्यांच्या पत्त्यावर पाठवावीं. किंमत माफक ठेवली जाईल.

ग. वि. देसाई,

मुंबई, गांवदेवी, नवी चाळ.

# "अहिंसा धर्म प्रकाश."

हें पुस्तक पंडित बाळाजी विठ्ठल गांवसकर यांनीं तयार केलें असून त्यांत शास्त्रसिद्ध हिंसा न करण्या विषयीं निषेध केला आहे. किंमत १ रुपया.

पुस्तकें मुंबईंत आर्यन् ट्राक्ट मध्यें विकत मिळतील.

---

विक्रीस तयार.



उत्तम टाइपावर.

प्रत्येक खेड्यांतील व शहरांतील लोकांस संग्रह करण्यास योग्य



# विषदंशपरिहार.

अर्थात्

## विषदंशापासून जीवाचें रक्षण करणारा मित्र.

या पुस्तकांत सर्प, विंचू, घोण, उंदीर, विषारी कुत्रें, कोल्हा, पाल व अशाच आणखी विषारी प्राण्यांच्या दंशावर साधे व स्वल्प असे उपाय सांगितले आहेत. याखेरीज सोमल, अफू, बचनाग, रसकापूर, इत्यादि प्रकारचे विषारी पदार्थ सेवनापासून अपघात होतात ते न व्हावेत ह्मणून ह्यांवरही साधे व सोपे उपाय सांगितले आहेत.

हें पुस्तक सर्वांस घेण्यास सुलभ पडावें ह्मणून पुस्तकाच्या योग्यतेच्या मानानें किंमत फक्त दीड आणा ठेविली आहे. बाहेरगांवच्या लोकांस टपालहांशिलाबद्दल अर्धा आणा जास्त पडेल. पुस्तकें मुंबईंत काळकादेवीच्या रस्त्यावर आर्यन् ट्राक्ट अॅन्ड बुक डिपोंत अगर भायखळ्यास दीनबंधु छापखान्याचे मालक यांजकडे मिळतील.

पुस्तक कर्ता.

## श्री पांडवप्रताप ग्रंथ.

ह्या ओवीबद्ध ग्रंथाची नवी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. ओव्यांची संख्या १४,००० ( चवदा हजार ) आहे. याचे अध्याय ६४ असून दर एक अध्यायास सुंदर चित्र घातलेलें आहे, आणि दरएक पानावर कठिण शब्दांच्या टीपा दिलेल्या आहेत. ग्रंथ सुंदर मोठ्या टैपांनीं जाड कागदावर शुद्ध रीतीनें छापला असून किंमत अवघी ४ रुपये ठेविली आहे. बाहेरगांवच्या लोकांस टपालखर्चाबद्दल दर प्रतीस ८ आणे जास्त पडतील. एकदम १२ प्रती मागविल्यास टपालहांशील न पडतां एक प्रत कमिशन दाखल जास्त देण्यांत येईल. खालीं सही करणाराकडे रोख पैसा पाठविला असतां ग्रंथ रवाना करण्यांत येईल. प्रती थोड्या शिल्लक आहेत व किंमतही इतरत्र मिळणाऱ्या ग्रंथांहून दोन रुपयांनीं कमी ठेविलेली आहे; सबब स्वस्तांत ग्रंथसंग्रह करूं इच्छिणारांनीं घेण्याची त्वरा करावी.

व्यापारी लोकांस व्यापारी भावानें प्रती देण्यांत येतात.

म्यानेजर, इंडियन प्रिंटिंग प्रेस,

कांदेवाडी, मुंबई.